साप्ताहिक
# माणूस
७ एप्रिल ८४/२ रुपये

## जादू हे शास्त्र, परामानसशास्त्र मात्र भोंदूगिरी आहे.



आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादुगार श्री. तायडे यांची खास मुलाखत

साप्ताहिक

माणूस

वर्ष : तेविसावे
अंक : पंचेचाळीसावा

७ एप्रिल १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार

# शेल्टीचे हत्याकांड आणि नंतर

धुळे जिल्ह्यातील शहाद्यापासून १०-१२ कि. मि. अंतरावरच्या शेल्टी व ससदे गावात दि. १६च्या रात्री पेटलेली होळी अद्याप विझली नाही. लाकडांनी नव्हे तर प्रत्यक्ष पाच आदिवासींचे बळी घेऊन त्यांच्या रक्ताने भडकलेली ही होळी एका दिवसाची राहिली नसून आता ती मना-मनात पेटली आहे. हा वणवा शहादे व तळोदे ह्या तालुक्यांचे शांततामय जीवन भस्मसात केल्याशिवाय शांत होऊ द्यायचा नाही, असे वातावरण दिसत आहे.

शेल्टी गावात शाहु म्हणजे बिगरआदिवासी आणि आदिवासी यांची एकच होळी आहे. सायंकाळी ७ वाजता विधिवत होळी पेटवली; पण थोडा वेळ गेला तरी होळीचा दांडा पडत नव्हता, तो पडला पाहिजे अशी मान्यता आहे. म्हणून विजय राजाराम भिल व त्याच्या मित्रांनी रामू गोपाळ पाटील या गुजर पाटलाच्या दारातून कापसाच्या वाळलेल्या पळकाठ्या, ज्या फक्त जाळण्याच्याच कामी येतात, त्या घेऊन होळीत टाकल्या. त्यावरून बाचाबाची झाली; पण दोन्ही बाजूंच्या मंडळींनी समजूत काढून भांडण मिटविले. ही घटना रात्री ८च्या सुमाराची.

भांडण मिटले म्हणून आदिवासी घरोघरी जाऊन निवांत झोपले. पण इकडे युद्धाची तयारी सुरू झाली होती. श्री. नरोत्तम जटू पाटील यांची ट्रक, त्यांच्या भावाची— तुकाराम जटूची जीप त्या दोघांच्या मुलांच्या मोटारसायकली पळू लागल्या, गावोगावी निरोप पोहोचले आणि ट्रॅक्टर्स व ट्रॉल्या भरून लाठ्या-काठ्या घेऊन लोक निघाले शेल्टीच्या दिशेने. 'जय शिवाजी— जय भवानी'चा घोष करीत, 'पी. के. अण्णा की जय' म्हणत ते आले असे तेथील आदिवासी बांधवांनीच मुख्यमंत्र्यांना आणि विरोधी पक्षनेत्यांना सांगितले.

हे बहाद्दर ससदे गावावरून जात असताना त्या गावच्या लोकांनी त्यांना अडविले. (असे अडवण्याचे त्यांना कोणी सांगितले, कोणी ठरविले माहीत नाही.) आणि पहिला बळी तेथेच पडला—झीपा मानसिंग भील याचा! तोही स्वतःच्या घरीच. आणि शेजारच्या झींगीबाई या महिलेवरही सशस्त्र हल्ला झाला. बाकीचे पळून गेल्यावर सेना पुढे सरसावली आणि शेल्टी गावाच्या आदिवासी वस्तीवर—वैतागवाडीवर—त्यांनी हल्ला केला!

आदिवासी जीव घेऊन पळत सुटले. शेजारच्या तापीनदीतून पलीकडच्या कोपर्ली, ओसर्ली, हाटमोहिदे या नंदुरबार तालुक्यातील गावापर्यंत त्यांनी पळ काढला; पण जे सापडले त्यांना तापीच्या पात्रातच रक्तस्नान घडविले गेले. देवजी कुमान्या भिल, ठाणसिंग मान्या भिल या दोघांना तीक्ष्ण हत्यारांनी मारण्यात आले, तर त्यांच्याकडे पाहुणा म्हणून आलेला कनसई गावचा झोलु भिलजी वळवी हा भारतीय कष्टकरी संघटनेचा सदस्य देखील बळी ठरला.

रायसिंग कार्यसिंग भिल याला मारहाण झाल्यानंतर तो अर्धमेला असतानाच एका खड्डयात त्याला पुरून वरून वाळू माती ढकलून देण्यात आली. जिवंत समाधी अवस्थेतच तो पाणी-पाणी ओरडत होता. हल्लेखोर परतल्यावर त्याला बाहेर काढून धुळ्याच्या दवाखान्यात आणले; पण तो वाचू शकला नाही व मृतांची संख्या ५ झाली. हल्लेखोरांनी सारी वस्ती उध्वस्त केली, झोपड्या पाडल्या, दरवाजे तोडले, भांडी फेकली, धान्य लुटले इतकेच नव्हे तर पाण्याचे माठ देखील फोडून टाकले. कारण त्यांना काहीच शिल्लक ठेवायचे नव्हते.

रात्री साडेबारा ते अडीच या काळात हे हत्याकांड घडले. 'जय भवानी जय शिवाजी'चे नाव घेत गोरगरीब मावळ्यांचाच बळी हल्लेखोरांनी घेतला आणि इतिहासाचे चाक उलटे फिरविले.

तंग वातावरणात, गोळीबारात, गर्दीत

माणसे मृत्युमुखी पडतात; पण एका सशस्त्र संघटित समूहाने दीनदुबळ्या निःशस्त्र व निरपराध आदिवासींवर हल्ला करून इतके क्रूर बळी घेण्याचा प्रकार महाराष्ट्रात तरी नवाच. उत्तरप्रदेश आणि बिहारच्या घटना आपण वाचतो; पण फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रातही अखेर आदिवासींचे हत्याकांड घडले.

हा सारा प्रकार माणुसकीला काळिमा फासणारा आहे अशी प्रतिक्रिया अनेक नेत्यांनी व्यक्त केली; पण हत्याकांडानंतर झालेल्या चहापार्टीचे वृत्त तर पशुतेलादेखील लाजवणारे आहे. सरपंच व साखरकारखान्याचे संचालक श्री. नरोतम जटू पाटील यांचे घरी ५ मृत्यूंचा आनंदोत्सव साजरा होत होता. हल्लेखोरांचे चहापान सुरू होते. तेवढ्यात पोलीस पोचले आणि त्यांनी हा सारा समुदाय रंगेहाथ पकडला. दूध-उकळलेला चहा, भांडी कपबशा आदी साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. तेथे असलेल्या आणि आसपास लपलेल्या १३४ लोकांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यात जनता नेते, संचालक व सरपंच नरोत्तम जटू पाटील, त्यांचा भाऊ तुकाराम जटू या दोघांची मुले यांचा समावेश आहे.

ट्रक पोलिसांच्या हाती लागला नाही; पण ट्रॅक्टर्स-ट्रॉल्या, जीप, मोटारसायकली, त्यात असलेली शस्त्रे, कांब्या, लाठ्या आदी साहित्य मात्र पोलिसांनी जप्त केले आहे.

शेजारच्या शिरूड, बिलाडी, मामाचे मोहिदे, अनरद, परिवर्धे वरूळ कानडी आदी गावांतल्या लोकांचाही त्यात समावेश आहे. ३०२,३०७,४२७,१४७,१४८,१४९ आदी कलमांखाली त्यांना पकडण्यात आले आहे.

एवढा अमानुष हल्ला कशासाठी हा प्रश्न मात्र अजूनही शिल्लकच आहे. गेल्या अनेक वर्षांत या गावात भांडण नाही. किमान मजुरी मिळत नव्हती. ३ ते ४ रुपये फक्त मजुरी देऊन तिकिटावर अंगठा मात्र पूर्ण रकमेचा घेतला जायचा; पण या विरुद्ध कोणी ब्र-ही काढला नाही. आदिवासींच्या मोकाट गुरांना कोंडवाड्यात टाकून मनमानेल एवढा दंड केला तरी कोणी तक्रार केली नाही, तरी हा हल्ला मात्र झाला!

याचे तात्कालिक कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर फक्त एकच कारण संभवते. त्याच दिवशी म्हणजे १६ ला सायंकाळी तळोदे तालुक्यातील मोड येथील शेतकऱ्यांवर काही लोकांनी हल्ला केला होता. शहाद्याहून मोडकडे निघालेली बस अडवून काही शेतकऱ्यांना गंभीर जखमी केले गेले. प्रल्हाद नगीन चौधरीच्या पाठीत खुपसलेला भाला त्याची बरगडी (लंघ) छेदून गेला! ओंकार मंगा चौधरी या दूधडेअरीच्या सेक्रेटरीस मारहाण झाल्याची आणि अर्जुन पाटील यांच्या घरातून ५ हजार रुपये व १० तोळे सोने लुटून नेल्याची तक्रार पोलिसांकडे नोंदविण्यात आली आहे. गाव जाळण्याची धमकी दिल्याचेही सांगण्यात आले.

## शेल्टी-मोडची प्रतिक्रिया?

शेल्टी हत्याकांडामुळे मोडचे हल्लाकांड फिके पडले आणि मुख्यमंत्र्यांनी दवाखान्यात जाऊन शेल्टीच्या जखमींची चौकशी केली; पण मोडच्या जखमींना ते भेटले नाहीत. कदाचित शेल्टी ही मोडचीच प्रतिक्रिया असण्याचा संभव आहे.

मोडकडे निघालेली एस. टी. ड्रायव्हरने प्रसंगावधानाने परत शहाद्याला आणली. ही घटना ६-३० ते ८ च्या दरम्यानची आहे. त्यानंतर प्रत्यक्ष माणसे पाठवून, फोनने आणि सहकारी साखर-कारखान्याच्या बिनतारी संदेशव्यवस्थेतून निरोप गेले. 'शेल्टीला नाटक आहे सर्व जण या!'-या सांकेतिक भाषेत आणि; त्यामुळेच खूप कमी वेळात मोठ्या संख्येने गावोगावचे लोक एकत्र आले.

मोड हे तात्कालिक कारण असले तरी तळोदे-शहादे तालुक्यात गेली काही वर्षे हा संघर्ष सतत पेटलेला आहे. या भागातील प्रारंभीचे जनसंघाचे प्रयत्न, मार्क्सवाद्यांची श्रमिक संघटना, भारतीय जनता पार्टीची भारतीय कष्टकरी संघटना आणि गेल्या वर्षापर्यंत काम करत असलेली सर्वोदयवाद्यांची ग्राम स्वराज्य समिती आणि श्रमिक संघटनेतून त्यांच्या छोट्या शेतकरीविरोधी व ब्राह्मणी नेतृत्वाला कंटाळून नुकताच बाहेर पडलेला गुलाब ठाकरे आदींचा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, आदींच्या सातत्याने चाललेल्या चळवळींमुळे आदिवासींमध्ये जागृती निर्माण होत आहे. हक्कांची जाणीव आणि अन्यायाची चीड वाढत आहे.

ह्या चळवळी दडपून टाकण्यासाठीच १९७३ साली श्री. पी. के. पाटील यांनी मोठ्या जमीनदारांच्या शेतीच्या रक्षणार्थ एक सशस्त्र सेनादल 'पुरुषोत्तम सेना' तयार केली होती; पण त्या वेळी गोरगरीब जनतेचा आवाज बुलंद झाल्यामुळे, संसद आणि विधिमंडळात दडपण आल्यामुळे त्या वेळी सत्ताधारी काँग्रेस पक्षात असलेल्या पी. के. पाटलांना माघार घ्यावी लागली. कागदोपत्री पुरुषोत्तम सेना बारगळली तरी ती प्रवृत्ती मात्र कायम होती आणि आहे. पी. के. पाटलांच्या प्रभावक्षेत्रातच संघर्ष उद्‌भवतात ते त्यामुळेच.

सध्या पतितपावन संघटने (पीपीएस) ची जोरदार चर्चा सुरू आहे. 'जय भवानी जय शिवाजी' ही घोषणा त्यांचीच. ती देऊनच हल्ला झाल्याचे सांगितले जात आहे. ही पतितपावन संघटना शहाद्यात गेल्या वर्षभरात सुरू झाल्याचे समजते. त्याचा अध्यक्ष विजय ऊर्फ गणेश बन्सी गुजर हाही या हत्याकांडात पकडला गेला आहे. तो शहादे शहराचा युवक इं कॉं. चाही उपाध्यक्ष आहे, तर शेल्टी शाखेचा अध्यक्ष नरोत्तम गुजर यांचा पुतण्या राजाराम तुकाराम हाच आहे. बहुतांश मालदार जमीनदारांची मुले त्यात आहेत. ते सर्व किंवा त्यांचे वडील हे जनता पक्षाचे सक्रिय कार्यकर्तेही आहेत. त्यामुळे पतितपावन संघटना म्हणजे पुनर्स्थापित पुरुषोत्तम सेना (पीपीएस) तर नव्हे ना?

पतितपावन संघटना शहादे तालुक्यात इतक्या कमी वेळात कशी फोफावली? त्यात कोण आहेत? त्यांच्या मागे काय आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे.

पी. के. पाटलांच्या हस्तकांनीच पतितपावनच्या नावाचा दुरुपयोग केला आणि आपणास बदनाम केले, आपला हत्याकांडाशी काहीही संबंध नाही व शहादे तालुक्यात अनेक लोक स्वनियुक्त आहेत असे पतितपावनने स्पष्ट केले आहे.

## डावी आघाडी

पतितपावन म्हणजे रा. स्व. संघ आणि भाजप असा खोटा प्रचार मात्र मार्क्सवाद्यांची श्रमिक संघटना आणि डाव्या आघाडीच्या नेत्यांकडून सुरू आहे. ती करणे त्यांना

आवश्यकच आहे. कारण त्यातच त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत.

श्रमिक संघटना आता मार्क्सवादी कम्युनिस्टांची अधिकृत शाखा आणि डाव्या आघाडीची घटक, तर पी. के. पाटलांचा जनता पक्ष हाही डाव्या आघाडीचाच घटक. पी. के. पाटलांच्या विधानसभा निवडणुकीत आणि नंतर झालेल्या नंदुरबार लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त्यांचा आणि त्यांच्या उमेदवारांचा प्रचार श्रमिक संघटनेने केला. ते आदिवासींचे शत्रू म्हणून समोर हल्ला आणि त्यांच्या विजयासाठी आदिवासींच्या झोपडीत जाऊन मतांची भीक अशी कसरत त्या बिचाऱ्यांना करणे भाग पडते.

डाव्या आघाडीचेही तेच. परवा मुख्यमंत्री शहाद्यात आले तेव्हा कुमार शिराळकर यांच्या नेतृत्वात डाव्या आघाडीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना आणि विरोधी पक्षनेत्यांना भेटले. पी. के. पाटील हेच या सर्वांच्या पाठीशी आहेत आणि पतितपावन हे करते अशी त्यांची तक्रार. विशेष म्हणजे या शिष्टमंडळात जनता पक्षाच्या प्रदेश महिला आघाडीप्रमुख विजया चौक आदी समाजवादीपण होते. बिचाऱ्यांचे चेहरे काळवंडले होते. निवडणुकीत शेवटी पैसा-गाड्या पी. के. पाटीलच देणार आणि आता तर त्यांना विरोध करायचा अशी तारेवरची कसरत त्यांना करावी लागत होती.

## अब्दुला हैदराबादींची मागणी

जनता पक्षाचे एक प्रमुख नेते ( जे पूर्वी समाजवादी मंचात होते ) श्री. अब्दुल्ला हैदराबादी यांनी मात्र ही दंगल पुरुषोत्तम सेनेनेच घडविल्याचा व त्याच्या पाठीशी पी. के. पाटील असल्याचाच उघड आरोप केला आहे. इतकेच नव्हे तर शहाद्यात झालेल्या जातीय दंगलीत आणि मामाचे मोहिदे, वावाळे आदी ७–८ प्रकरणात सेनेचाच हात असल्याचा गौप्यस्फोट केला आहे. पक्षाध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांना पत्र पाठवून पी. के. पाटील यांच्या आदिवासी–दलित व मुस्लिमविरोधी धोरणामुळे पक्षाचे नुकसान होत असून त्यांची पक्षातून हकालपट्टी करा अशी मागणीही केली आहे.

पण सर्व हल्लेखोरांत भाजपचा सदस्य तर सोडा, कोणी सहानुभूत देखील नाही. ज्यांचे ट्रॅक्टर्स–ट्रॉल्या, जीप, मोटारसायकली पकडल्या ते सर्वच जनता पक्षाचे, तर काही इं. कॉं. चे आहेत. त्यामुळे सत्याचा किती अपलाप करणार ? आमदार गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत नसः आरोप केला आहे. तो विधानसभेचे संरक्षण न घेता ते बाहेर करतील का ? हा प्रश्न आहे.

गुलाबराव चुकू शकतात, पी. के. पाटलांना चुकण्याचाच लाभ वाटतो. आश्चर्य वाटते ते श्री. नानासाहेब गोरेंचे दि. १६ ला रात्री हे हत्याकांड घडले. दि. १७ ला रात्री धुळ्यात जनता पक्षाच्या वतीने जमनालाल बजाजमार्गावर जाहीर सभा होती. पी. के. पाटील त्या ठिकाणी उपस्थित होते; पण एका शब्दाने नानासाहेब या घटनेवर बोलले नाहीत. निषेध तर सोडा श्रद्धांजलीदेखील नाही. देशातील यच्चयावत विषयांवर बोलणारे नानासाहेब या विषयावर गप्प होते. दि. १८ रोजी दिवसभर ते धुळ्यात होते. शेल्टीला जाऊन आदिवासींचे अश्रू पुसणे त्यांना सहज शक्य होते; पण तसेही त्यांनी केले नाही. केवळ पी. के. पाटलांचे साथीदार त्यात अडकले, म्हणून नानासाहेबांनी गप्प बसावे, ही गोष्ट मनाला सहजासहजी पटत नाही; पण घडले मात्र असेच; आणि सभेत का बोलला नाहीत याचे जे उत्तर पी. के. पाटील यांनी दिले आहे, तो तर बेशरमपणाचा कळसच आहे. ते म्हणतात, ' सभेचा तो विषय नव्हता. ' ज्या सभेत देशातील यच्चयावत विषयांवर भाषणे होतात तेथे ह्या घटनेची साधी माहिती, औपचारिक का होईना निषेध वा श्रद्धांजली बसत नाही म्हणे ! वा. वा ! अरे, ही राजकीय पक्षाची सभा होती की कारखान्याची ? अजेंड्याशिवाय विषयच आणता येत नाही का ? आणि अशा आकस्मिक घटनांना वा श्रद्धांजलीला अजेंडा लागतो का ? याचे उत्तर नानासाहेबांनी दिलेच पाहिजे.

सभेचे जे तेच प्रतिक्रियेचे. स्वतःच्या मतदारसंघात एवढे भीषण हत्याकांड घडूनही चार दिवस पी. के. पाटील यांनी मौन पाळले. त्यांनी, त्यांच्या कारखान्याने, त्या कारखान्याच्या आदिवासी उपाध्यक्षाने, त्यांच्या जिल्हा वा तालुका जनता पक्षाने चार ओळींचे पत्रक काढून साधा निषेध व्यक्त केला नाही, मदत केली नाही, जखमींची विचारपूस केली नाही, विधानसभेत स्थगन प्रस्तावही मांडला नाही. इतकेच नव्हे तर चर्चेत भाग घेण्याचेदेखील टाळले ! कॉ. ल्हानू कोम यांनी त्यांच्यावरच हल्लेखोरांच्या नेतृत्वाचा आरोप केला तेव्हाच त्यांना बोलावेसे वाटले. अन्यथा आदिवासींच्या हत्येने ते भांबावून गेले होते की, आपल्याच मित्रांचे हे पाप म्हणून अपराधीपणाच्या भयाने अबोल झाले होते ?

परंतु त्यांच्या निढावलेल्या स्वभावाचे मात्र कौतुकच केले पाहिजे. आरोपी क्र. १ नरोत्तम जटू पाटील, ज्यांच्या घरी हल्लेखोरांचे चहापान झाले, ज्यांचा भाऊ, मुलगा पुतण्या लोक जमा करत होते, ज्यांच्या वाहनात शस्त्रास्त्रे होती, ते निर्दोष आहेत असा जाहीर दावा त्यांनी केला आहे. हल्लेखोरांच्या सूत्रधारांचे बचावाचेच वकीलपत्र त्यांनी घेतले आहे. त्यांच्याच प्रयत्नाने हा आरोपी अटकेनंतर ४८ तासांत जामिनावर सुटला ! खून, डाका, दंगल असे गुन्हे असून देखील या जामीनप्रकरणाचे गूढ आणि खुले गुपित आता बऱ्याच लोकांना कळले आहे.

## पुढे काय ?

मुख्यमंत्री येऊन गेले. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. आर्थिक मदत दिली. विरोधी पक्षाचे नेतेही येऊन गेले. त्यांनी सारा महाराष्ट्र तुमच्या पाठीशी आहे अशी ग्वाही दिली ! जिल्ह्यातले सर्व पक्ष-संघटना-नेते यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. बहुतांश सर्वांनी हे पुरुषोत्तमसेनेचे पुनरुज्जीवन असल्याचे मत व्यक्त केले. पतितपावनवर दोषारोपण केले. बड्या जमीनदार–सावकारदारांच्या शोषणाविरुद्ध, अन्याय, अत्याचाराविरुद्ध आपली भूमिका व्यक्त केली.

भारतीय कष्टकरीसंघटनेने दि. २७ रोजी काम बंद आणि उपोषण करून अत्याचाराचा निषेध केला तर श्रमिक संघटनेने दि. ३ व ६ एप्रिल रोजी शहादे व तळोदे येथे निषेधसभा घेतल्या .

निषेधाचे हे सत्र चार–आठ दिवसांत संपेल; पण समस्या सुटणार आहेत का ? तळोदे–शहादे भागातील असंतोष शमणार आहे का ? ह्या समस्येच्या मुळाशी जाऊन

तिचा शोध घेणे आणि दूरगामी उपाय योजना करणे आवश्यक आहे.

या भागात दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. एक आहे शेतमजुरांच्या किमान वेतनाचा, त्यांच्या न्यायाचा. विकासात समान संधीचा. आणि दुसरा प्रश्न आहे कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या पिकाच्या रक्षणाचा. पिकाच्या चोऱ्यांपासून संरक्षणाचा.

शेतमजूर हा समाजातील सर्वात शेवटचा व दुर्बल घटक आहे. आज त्याला मिळत असलेले किमान वेतन रु. ६ हे अपुरेच आहे. पण किमान तेवढे तरी त्याला मिळाले पाहिजे व ते वाढवून दिले पाहिजे यात वाद नाही. शेतकऱ्यांनाही आता हळूहळू हे पटत चालले आहे. तरी पण त्यासाठी आग्रह, संघटन व मिळत नसेल तर संघर्षही अपरिहार्य आहे; पण त्यासाठी हिंसाचार आणि दहशतवादाचा प्रयोग मात्र समस्या सोडवू शकणार नाही!

आपल्या देशातला शेतकरी काही अपवाद वगळता नेहमीच कर्जबाजारी असतो. त्यांच्या शेतमालाला भाव न मिळाल्याने त्याचेही शोषण होते आहे. शेतकरी–शेतमजूर आणि शेतीधंद्याचेच शोषण आणि उपेक्षा हा चिंतेचा विषय आहे आणि या ग्रामीण भागाच्या आणि शेतीच्या शोषणाविरुद्धही दोघांनी मिळून लढण्याची गरज आहे. भारतीय कष्टकरी संघटनेचे श्री. लक्ष्मण कदम यांनी हीच भूमिका मांडली आहे.

अशा अवस्थेत वर्षभर कर्ज काढून, काबाडकष्ट करून शेतीत पिकविलेल्या पिकाची जर चोरी झाली तर शेतकरी रागावणे, त्याचा संताप अनावर होणे हेही स्वाभाविकच आहे. अशा पीकचोऱ्यांचे समर्थन आणि त्याला प्रोत्साहन देण्याचे काम डावी मंडळी करीत आहेत. 'तुम्ही राबलात, तुम्ही कष्ट केले मग हे तुमचेच, ते लुटा' हे त्यांच्या वर्गसंघर्षाच्या तत्त्वज्ञानातही बसते आणि त्या दोघांमध्ये कायमचा संघर्ष हेच त्यांच्या संघटनेच्या वाढीस पोषक असल्यामुळे ते आगीत तेल ओतत असतात.

या हिंसक कारवाया रोखण्यास इं. कॉं. शासनही इच्छुक नाही. कारण यामुळे त्यांना काहीही न करता पी. के. पाटलांवर हल्ला चढवून पुरोगामित्वाचे व इंदिराजींच्या आदिवासी प्रेमाचे ढोल बडविणे सोपे जाते. जनतापार्टी देखील त्यांच्याविरुद्ध नाही. कारण संघर्षाच्या, हिंसाचाराच्या भीतीमुळे शेतकरी भयभीत होऊन आपोआप पी. के. पाटलांच्या नेतृत्वाखाली शरण येतो] आणि त्यांचे पाठबळ भक्कम होते व ते त्याच मतांवर निवडून येतात. त्याच बळावर पैसा जमा करून सहकारी कारखाने काढतात आणि सहकारातील अनभिषिक्त सम्राट पदाचे फायदे उपटतात. त्या बदल्यात कोणी आदिवासी विरोधी म्हणून दूषण दिले तर त्याची त्यांना काय पर्वा? पुरुषोत्तम सेना आणि डाव्या संघटना, दोन्ही एकमेकांच्या भीतीचा बागुलबुवा उभा करून, संघर्ष पेटवून हिंसाचार माजवून, दहशत निर्माण करून परस्परांचे स्थान बळकट करीत आहेत. नुकसान मात्र होत आहे शेतकऱ्यांचे. बळी जातो आहे शेतमजुरांचा. उद्ध्वस्त झाले आहे शांततामय सहजीवन.

## किमान वेतन–पीकरक्षण हमी

शासनाने या ठिकाणी हस्तक्षेप करून शेतकरी, शेतमजूर व शासन अशा तिघांचा सहभाग असलेली एक विशेष यंत्रणा निर्माण केली पाहिजे. शेतमजुराला किमान वेतनाची हमी, विकासाची हमी आणि शेतकऱ्याला पिकाच्या संरक्षणाची हमी देण्याचे आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे काम या यंत्रणेकडे सोपविले पाहिजे. त्याचप्रमाणे तणाव कमी करण्यासाठी रोजगाराचा प्रश्न सोडविला पाहिजे व त्यासाठी एक मोठा रोजगार क्षमतेचा औद्योगिक प्रकल्प उभा केला पाहिजे. संघर्षग्रस्त गावे निःशस्त्र केली पाहिजेत! तक्रारीची त्वरित दखल घेणारी, समाजाचा सहभाग असलेली संवेदनक्षम यंत्रणा आणि तिला विस्तृत अधिकार असा प्रयोग केला पाहिजे. पूर्ण यश मिळेल का? माहित नाही; पण बऱ्याचप्रमाणात संघर्ष कमी होईल असे मात्र निश्चित वाटते.

केवळ सरकारवर विसंबून न राहता समाजातील दोन्हीकडच्या समंजस लोकांनीही यात पुढाकार घेतला पाहिजे. आदिवासींना समतेची, न्यायाची वागणूक मिळेल यासाठी प्रबोधन केले पाहिजे. चोरी ही प्रवृत्ती नष्ट केली पाहिजे; पण त्यासाठी सर्वच निरपराध आदिवासींना जबाबदार धरणे आणि त्याला हिंसक उत्तर देणे यापासून शेतकऱ्यांना परावृत्त केले पाहिजे. केवळ किमान वेतनाचा लढा लढविण्याऐवजी किमान वेतन आणि स्वावलंबी-स्वाभिमानी जीवनासाठी विकास आणि जमिनीचा लढादेखील समजावून दिला पाहिजे. तरच शेल्टीची पुनरावृत्ती होण्याचे टळणार आहे.

— माहितगार

---


" विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी, सरकारने किंवा खाजगी संस्थांनी घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. हा संदेश या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे. "

डॉ. स. ह. देशपांडे
–अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

# श्रीग्रामायन

**श्री. ग. माजगावकर**
राजहंस प्रकाशन, पुणे
मूल्य : पंचवीस रुपये

जत–सांगली

# एक कृतिशील परिसंवाद

## दुष्काळी भागाचा कायापालट घडवून आणणारा

श्री. माधवराव गोडबोले प्रतिष्ठान ( सांगली ) या संस्थेच्या वतीने जत येथे गेल्या महिन्यात एक दुष्काळी शेतीपरिसंवाद घेण्यात आला. जतसारख्या खडकाळ व बिनपावसाच्या प्रदेशाच्या दृष्टीने हा परिसंवाद उद्बोधक झाला असल्याने त्याचे सविस्तर वृत्त येथे दिले आहे.

जत, दि. २१ : 'आपल्या देशाची भूमी व निसर्ग इतका उत्तम आहे की, जगातल्या कोणत्याही देशाला इतकी अनुकूलता लाभलेली नाही. मात्र निसर्गाशी सुसंवाद साधून माणसाने आपल्या कष्टाची दिशा ठरविली पाहिजे. शेजारच्या तासगाव तालुक्याच्या माळावर काही जिद्दी माणसे उभी राहिली. त्या लोकांनी द्राक्षबागा उभ्या केल्या व इथे आपल्या परिसंवादास येऊन द्राक्षपेट्या भेट दिल्या. जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी अशीच जिद्द धरली. योग्य मार्गदर्शन घेतले व स्वतः कष्ट आणि प्रयोग केले तर तेही दुष्काळावर मात करू शकतील. फलोद्यान व वनशेती ही जत तालुक्याच्या भूमीला वरदान ठरेल.' असे विचार भारतीय जनता पक्षाचे नेते खासदार जगन्नाथराव जोशी यांनी आज जत येथे बोलताना व्यक्त केले.

सांगली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक संस्थापक श्री. महादेवराव गोडबोले प्रतिष्ठानच्या वतीने जत येथील शिवानुभव मंडपात आज दुपारी 'दुष्काळी शेतीविषयक परिसंवाद' घेण्यात आला. या परिसंवादाचे प्रमुख पाहुणे म्हणून खासदार जगन्नाथराव जोशी बोलत होते. प्रारंभी प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त ॲड. बापूसाहेब कार्लेकर यांनी प्रतिष्ठानची माहिती व प्रतिष्ठानचे वतीने दुष्काळी शेतीविषयक परिसंवाद घेण्यामागची भूमिका सांगितली. परिसंवादाचे सूत्रधार श्री. बापूसाहेब पुजारी यांनी जत तालुक्यातील शेतकऱ्यांची पारंपारिक शेतीची कल्पना बदलून वनशेती, फलोद्यान, औषधी वनस्पती व तेलबिया या दृष्टीने शेतकऱ्यांना नवा दृष्टिकोन देणे व स्थानिक मार्गदर्शन व सल्ला-केंद्र निर्माण करणे या दृष्टीने या परिसंवादातील वक्त्यांची योजना करण्यात आलेली आहे, असे सांगितले. खासदार जगन्नाथराव जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर परिसंवादास सुरुवात झाली.

जतचे कार्यकर्ते श्री. सुभाष मालाणी व जतच्या रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. शामराव चव्हाण यांनी जत तालुक्यातील खडकाळ भूमी, पाऊसमान, लोकसंख्या, शासनाच्या योजनेतून झालेले पाझर तलाव व इरिगेशन टँक इत्यादींची सविस्तर माहिती देऊन परिसंवादाची पार्श्वभूमी विशद केली.

**प्राचार्य शामराव चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले, 'मी ऐनउन्हाळ्यात आपल्यासमोर कोट घालून बोलण्यास उभा आहे. आपणा सर्वांना हे पाहून आश्चर्य वाटले असेल. माझी अशी ठाम समजूत आहे की, या जत तालुक्यात किमान एक कोटी वृक्ष लावल्याशिवाय जत तालुक्याच्या नशिबावरचा दुष्काळ पुसला जाणार नाही. मला लोक वृक्षवेडा म्हणतात; परंतु जत तालुक्यात एक कोट झाडें लावल्याशिवाय अंगातला कोट उतरावयाचा नाही अशी मी प्रतिज्ञा केली आहे !'**

*परिसंवादात पुढील वक्त्यांची प्रमुख भाषणे झाली.*

### वनखात्याचे सहकार्य

१) श्री. ता. य. मोरे (डेप्युटी डायरेक्टर सामाजिक वनीकरण) : चर्चेला प्रारंभ करताना श्री. ता. य. मोरे म्हणाले, जतची जमीन व हवा ही वनीकरणाला अतिशय उपयुक्त अशी आहे. गुजराथच्या व आपल्या हवेत, तसेच पाऊसमानात फारसा फरक नाही, त्यामुळे जत तालुक्यात चिंच, आंबा, जांभळ, पेरू, आवळा, बोर, चिक्कू ही फळे तसेच निलगिरी, बाभूळ, सुबाभूळ, कडूलिंब, कढीलिंब ही झाडे जत तालुक्यात उत्तम प्रकारे वाढू शकतील व शेतकऱ्याला सध्याच्या शेती उत्पन्नापेक्षा अधिक फायदा देऊ शकतील.आमच्या सामाजिक वनीकरणखात्याने गेल्या वर्षी सांगली जिल्ह्यात सुमारे साडेतीन लक्ष झाडे लावली आहेत. जत तालुक्यातील शेतकरी वनशेतीकडे वळणार असतील तर सामाजिक वनीकरणखात्याचे संपूर्ण सहकार्य मिळेल. यासाठी कूपनलिकांची योजनाही करावी लागेल. मात्र, शेतकऱ्यांनी 'अहो साहेब,आमची जमीन ताब्यात घ्या आणि वनशेती करा' असे नुसते न सांगता संरक्षण व संगोपन यासाठी स्वतः कष्ट करण्यास तयार झाले पाहीजे.

### वैज्ञानिक द्राक्षकुल संघटना

२) श्री. नामदेव बापू माने ( द्राक्षबागायतदार, मणेराजुरी–तासगाव) : मी व माझे गुरुजी श्री. गणपतराव म्हेत्रे असे दोघेजण जतच्या या दुष्काळी शेती परिसंवादासाठी मुद्दाम उपस्थित राहिलो आहोत. आमचा मणेराजुरी भाग हा जत तालुक्यापेक्षा अधिक बिकट परिस्थितीत होता. आम्ही मार्गदर्शन घेतले; परंतु स्वतः प्रयोग व कष्ट यांची जिद्द धरली. पाटाच्या पाण्याशिवाय शेती पिकत नाही ही कल्पना चूक आहे, हे मी अनुभवाने सांगतो. तेव्हा पाटाचे पाणी

मागू नका, साखरकारखाना काढू नका, ऊसपिकाने जमीन बाद होते हे मी व श्री. गणपतराव म्हेत्रे यांनी अनुभविले आहे, म्हणून गेल्या १८ वर्षांपासून आम्ही ऊस लावणेणे बंद केले आहे. आम्ही कष्टाने द्राक्षाचे प्रयोग केले. गुलाब शेतीचे प्रयोग केले. आता केसर आंबा व इतर फळे यांचे प्रयोग चालू आहेत. जत भागात पडणारा पाऊस जमिनीत मुरविला आणि तेवढ्या पाण्यावर येणाऱ्या पिकाची योजना केली तर शेती यशस्वी होऊ शकते. द्राक्षाच्या वेलाला घातलेले पाणी दोन दिवसात संपू लागले तेव्हा आम्ही आळ्यामध्ये हुलग्याचे भूस टाकले व पाणी दिले. ती ओल आठ दिवस टिकली. प्रयोग आपले आपण करावे लागतात. जतच्या शेतकऱ्यांना मी आव्हानपूर्वक सांगतो की, या माळावर काय पिकणार ? अशा नुसत्या विचाराने हताश होऊ नका. बोर, केसर आंबा, चिंच, पेरू, चिक्कू, कवठ, आवळा, डाळिंब ही फळझाडे तुमच्या या जमिनीत उत्तमप्रकारे येऊ शकतील हे तुमची जमीन पाहून मी सांगतो. अशी फलोद्याने व वनशेती करण्याची जिद्द तुम्ही धरलीत तर तासगावची द्राक्षकुल संघटना तुम्हाला प्रयोग करण्यास व नंतर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल, मात्र श्री. पुजारी यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे, सरकार काय करणार आहे ? बँका काय करणार आहेत ? याची वाट न पाहता, तुम्ही प्रयोगाला सुरुवात करा. मनगटात रग असेल तर योजना तुमच्या मागे धावू लागतील. आम्ही तासगावच्या लोकांनी कुणाच्याही मदतीची अपेक्षा न धरता द्राक्षाचे प्रयोग यशस्वी केले आहेत. तुमच्या जतसारख्या माळरानात कमीत कमी पाण्यावर उत्तम द्राक्षबाग कशी येईल, यासाठी आमचे आता प्रयोग चालू आहेत. काळीभोर जमीन हीच शेतीला उपयुक्त असते, ही परंपरागत समजूत अनुभवाने चुकीची ठरली असून तुमची जतची खडकाळ जमीन हीच अधिक संपन्न व तुम्हाला सुखी करणारी आहे.

श्री. नामदेव बापू शेवटी म्हणाले, शेतकरी बंधूंनो, तुम्ही–आम्ही आज एकत्रित झालो आहोत. आम्ही दोघेजण आज येथे केवळ परिसंवादातील भाषणासाठी आलो नसून तुम्ही जतच्या या माळरानावर प्रयोग करण्याचे ठरविले तर तुम्हाला सर्व योजना आखून देऊन त्या यशस्वी करण्यासाठी व सल्लामसलत करण्यासाठी प्रत्येक महिन्यांतून एकदा जत–परिसरात यायला आम्ही तयार आहोत असे आश्वासन देतो. सरकारला माझी एक विनंती आहे की, योजनेच्या नावाखाली प्रत्येक शेतकऱ्यापुढे मदतीचा तुकडा टाकण्यापेक्षा ५/२५ गावांतून सरकारने हुशार व प्रयोगशील शेतकरी निवडावेत, या एकाच ठिकाणी सर्व तऱ्हेची मदत द्यावी व प्रायोगिक प्रकल्प उभे करावेत. व्याख्याने देऊन माझा शेतकरी बदलणार नाही; पण त्याच्या भागात फलोद्यानाचा एखादा प्रकल्प उभारलेला त्याने पाहिला तर सरकारच्या मदतीची वाट न पाहता तो आपले काम चालू करेल

## निसर्गाशी बोलायला शिका !

(३) श्री. प्र. बा. भोसले (संपादक बळीराजा मासिक) : शेती म्हणजे पिको वा न पिको, पावसाळ्यात धान्य पेरणे ही जी परंपरागत समजूत आहे, ती जतमधील शेतकऱ्याने सोडून दिली पाहिजे. साधारण पाच ते दहा वर्षांचा कालावधी आपण कष्टात घालविला तर जत भागामध्ये वनशेती व फलोद्याने उत्तम प्रकारे येऊ शकतील हे मी कालपासून तुमच्या भागात फिरून जमीन पाहिल्यानंतर खात्रीपूर्वक सांगतो आहे. तुम्ही म्हणणार नवी दृष्टी ठीक आहे; परंतु पहिली दहा वर्षे जगायचे कसे ? प्रश्न बरोबर आहे; पण त्यालाही उपाय आहे. वनशेती व फलोद्यान करताना आपण दोन झाडात ३० ते ४० फुटांचे अंतर ठेवतो. या झाडांची मोठी वाढ होऊन फांद्या एकमेकांस मिळायला किमान ७ ते ८ वर्षांचा कालावधी लागतो. दोन झाडांच्या मधल्या अंतरात तुम्ही नेहमीची अन्य पिके घेऊ शकता. शेताच्या बांधाला कसला तरी झाडझाडोरा लावण्यापेक्षा शिकेकाई वेल लावल्यास काटेरी वेलीचे कुंपण चांगले होते व शिकेकाई तुम्हाला चरितार्थाचे उत्पन्न देऊ शकेल. जतच्या या रुक्ष हवामानाला शिकेकाई उत्तम येईल त्याचप्रमाणे दोन झाडांच्या मध्याला (१५ फूट अंतरावर) तुम्ही शेवग्याच्या अगर कढीलिंबाच्या झाडाची लागवड केली तर शेवग्याचे झाड दुसरे वर्षापासून उत्पन्न देऊ लागते. तुम्ही जतच्या माळावर शेवग्याच्या शेंगा व कढीलिंब कितीही अमाप पिकविला तरी त्या सर्वाला आज मुंबईची बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. ही झाडे ८–१० वर्षे तुमचा चरितार्थ चालवितील, त्याची काळजी करण्याचे कारण नाही. माझी जत तालुक्यातील शेतकऱ्यांना एकच विनंती आहे की, परंपरागत शेतीचा दृष्टिकोन बदला, निसर्गाशी बोलायला शिका, तुमच्या शेतीत कोणती झाडे चांगली उगवली आहेत ते पहा, त्याच झाडाच्या कुळातील झाड तुमच्या शेतात लावा. सुदैवाने प्राचार्य शामराव चव्हाण यांच्यासारखा वृक्षवेडा माणूस तुम्हाला मार्गदर्शनासाठी उपलब्ध आहे. जिद्द धरा, कष्टाची तयारी ठेवा ! तुम्ही तुमच्याच हाताने जत तालुक्याचे नंदनवन करू शकाल असा मला विश्वास वाटतो.

## दीर्घ मुदतीचा पतपुरवठा

(४) श्री. डबरी (राज्य सहकारी बँकेचे अधिकारी) : फलोद्याने अगर वनशेती करायची झाली तर दीर्घ मुदतीचा (५ ते १० वर्षे) पतपुरवठा उपलब्ध होऊ शकेल का ? अशी शंका या भागातील शेतकऱ्यांना आहे. राज्य बँकेकडे वनशेतीसाठी दीर्घ मुदतीच्या कर्जयोजना आहेत. त्याचप्रमाणे अशा योजनांमध्ये फलोद्यान व वनशेती करणाऱ्या शेतकऱ्याला प्रत्यक्ष उत्पन्न जेव्हापासून सुरू होईल तेव्हापासूनच कर्जफेडीचे हप्ते चालू करण्याची तरतूदही आहे. जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी असे उपक्रम चालू केले तर राज्य बँक व जिल्हा मध्यवर्ती बँक दीर्घ मुदतीचा पतपुरवठा त्यांना उपलब्ध करून देईल.

## प्रयोगिक प्रकल्प

श्री. बापूसाहेब पुजारी : फलोद्यान अगर वनीकरण यांचा उपक्रम जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी चालू केला तर पहिली १० वर्षे कुटुंबचरितार्थाचा प्रश्न हा भेडसावणारा आहे. महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजनेखाली अशी प्रयोगशील शेतकरी कुटुंबे समाविष्ट केली तर त्या कुटुंबांन

आधार मिळू शकेल. शासनास असे करण्यास अडचण येणार नाही. आज खाजगी शेतीमध्ये सामाजिक वनीकरण करण्याची जी योजना सरकारने हाती घेतली आहे, त्या योजनेचेच हे पुढचे पाऊल ठरेल. गुजराथ सरकारने याबाबतीत पुढचे पाऊल टाकले असून वनीकरण अगर फलोद्याने करावयाच्या खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने काही काळ मुदतीने आपल्या ताब्यात घेतल्या असून ते शेतकरीकुटुंब त्याच जमिनीवर मजुरीने काम करते. उत्पन्न सुरू झाल्यावर शासन काही हप्त्यांनी आपला पैसा व्याज न आकारता फेडून घेऊन वनीकरणासहित जमीन शेतकऱ्याच्या ताब्यात देते. महाराष्ट्र शासनाने 'प्रायोगिक प्रकल्प' म्हणून हा उपक्रम जत तालुक्यात चालू करावा अशी विनंती आहे.

शेती अगर वनशेती उभी करणे हे अर्बन बँकांच्या कक्षेत बसत नाही; परंतु अशा योजनेखाली मिळणारे भांडवल शासनाने सांगली बँकेकडे सुपूर्त केले तर सांगली को-ऑप. बँक जतच्या ४-५ खेड्यांमधून फलोद्यान अगर वनीकरणाचा 'प्रायोगिक प्रकल्प' उभारून देईल.

या प्रसंगी फलोद्यान-अधिकारी श्री. नाईक यांनी फलोद्यानाच्या निरनिराळ्या शासकीय योजना व बँकांमार्फतच्या त्यांच्या पतपुरवठ्याच्या योजना यांची माहिती सांगितली. विशेषतः जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी 'कृषिपंढरी' योजनेचा लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले.

परिसंवादाचे एकूण स्वरूप व चर्चेची दिशा लक्षात घेऊन या प्रसंगी श्री. सुभाष मालाणी यांनी 'प्राचार्य शामराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही तातडीने जत तालुका कृषि विकास मंडळ स्थापन करू, नव्या दिशेने वाटचाल करू, अशी घोषणा केली. सर्वांनी टाळ्या वाजवून या घोषणेचे स्वागत केले.

प्रारंभी दिलेले विचार व्यक्त करून खासदार जगन्नाथराव जोशी पुढे म्हणाले, जतच्या या परिसंवादाचे निमंत्रण स्वीकारताना मला परिसंवादाचे संपूर्ण स्वरूप समजलेले नव्हते; परंतु मी येथे आलो. जतची खडकाळ जमीन, हवापाणी पाहिले. गेले ३ तास सर्व वक्त्यांची भाषणे मी काळजीपूर्वक ऐकली. त्यामुळे मला स्वतःलाच खूप काही शिकता आले. माधवराव गोडबोले प्रतिष्ठानने या दुष्काळी शेती परिसंवादाचा एक चांगला उपक्रम केला असे मला वाटते. विशेषतः श्री. सुभाष मालाणी यांनी जी जत तालुका कृषि विकासाची घोषणा केली, ते अतिशय योग्य व जरुरीचे पाऊल टाकले आहे. कारण शासनाच्या योजना खूप असतात; परंतु 'मध्यस्थ संस्था' असल्याशिवाय शेतकऱ्यात प्रयोगशीलता निर्माण होत नाही. माझे गावही कर्नाटकातील दुष्काळातले होते. माझ्या आईने अंगणात एक नारळाचे झाड लावले व ते उत्तम वाढविले. आमचे घरचे झाड पाहून गावात अनेकांनी झाडे लावली, गावाला संपन्नता आली. आज गाव दुष्काळी राहिलेले नाही. जतच्याया माळरानावर नारळाचे झाड वाढू शकेल असे मला वाटते.

### निसर्गाची अनुकूलता शोधा

मी देशात सर्वत्र फिरतो. हरियानामध्ये आपोआप उगविलेले बोरीचे जंगल मी पाहिले आहे. ही बोरे दिल्लीच्या बाजारात ८ ते १० रुपये किलोने विकली जातात. कोणीही न लावता आसाममध्ये केळीची जंगले तयार झालेली आहेत. कवठाचे झाडही खुले पीक देणारे आहे. कोणाच्याच भाषणात उल्लेख झाला नाही ते म्हणजे बेलाचे झाड. बेलाच्या झाडाला कवठाप्रमाणेच अमाप बेलफळे लागतात. उत्तरभारतात एक बेलफळ आज अडीच ते तीन रुपये भावाने विकले जाते. पिकलेल्या बेलफळाचे सरबत करून पिण्याची पद्धत उत्तरभारतात आहे. जतच्या भूमीवर बेलाचे झाडही उत्तम येऊ शकेल. तुम्ही कष्टाला, प्रयोगशीलतेला तयार रहा! सुदैवाने प्राचार्य शामराव चव्हाण, तासगावचे गणपतराव म्हेत्रे, मणेराजुरीचे नामदेव बापू माने यांच्यासारखी यशस्वी झालेली अनुभवी मंडळी तुम्हाला मार्गदर्शन करण्यास लाभलेली आहेत.

### कोटीचे आव्हान स्वीकारा !

तेव्हा आपण सर्वांनी जिद्द धरू या, आगामी २-३ वर्षांत जत तालुक्यात एक कोट झाडे लावण्याची प्राचार्यांची प्रतिज्ञा पूर्ण करू या आणि त्यांच्या अंगातील कोट उतरविण्यास लावू या! माझ्या परीने तुम्हास जे सहकार्य करता येईल ते मी जरूर करेन. या परिसंवादास उपस्थित राहता आले याचा मला आनंद वाटतो.

जतचे डॉ. मनोहरराव मोदी यांनी सर्वांचे आभार मानले. या परिसंवादास सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे सर्व संचालक-मंडळ, जतमधील मान्यवर नागरिक व तालुक्यातील बरेचसे प्रयोगशील शेतकरी उपस्थित होते.

समारंभापूर्वी खासदार श्री. जगन्नाथराव जोशी यांनी राजेरामराव महाविद्यालयाचे निलगिरी व सुबाभूळ यांच्या वनशेतीस व सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकेस भेट देऊन पाहणी केली. रोपवाटिकेमध्ये खासदार जगन्नाथराव जोशी यांच्या हस्ते नारळाच्या रोपाचे वृक्षारोपण करण्यात आले. उपसंचालक श्री. मोरे यांनी रोपवाटिकेच्या कामाची माहिती दिली.

—बा. भा. पुजारी


विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. —अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

**काही दिवस श्यामचे, काही राधाचे**

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : २५ रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# चंद्रशेखर, स्वामी आणि जनता पक्ष

अभय गोखले

जनता पक्षाच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर यांची फेरनिवड झाल्याने त्या पक्षातील संभाव्य फूट तात्पुरती तरी टळली आहे. चंद्रशेखर यांच्यासमोर सुब्रह्मण्यम स्वामींसारखा तोंडाळ, कर्तृत्वशून्य असा नेता उभा राहिल्यावर चंद्रशेखर यांना निवडून देण्याशिवाय जनता कार्यकर्त्यांना पर्यायच नव्हता ! चंद्रशेखर व स्वामी यांचा पूर्वेतिहास पाहाता, त्या दोघांपैकी, दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने, चंद्रशेखरच योग्य होते व त्यांचीच जनता पक्षाध्यक्षपदी फेरनिवडणूक झाली आहे. मध्यंतरी चंद्रशेखर यांनी भारतभर पदयात्रा काढली होती, त्याचा उपयोग त्यांच्या पक्षाला झाला नसला तरी त्यांना स्वतःला झाला हे त्यांच्या निवडून येण्यावरून सिद्ध होते. मूलत: चंद्रशेखर यांचा पिंड बंडखोरीचा आहे. अशा नेत्याची एखाद्या अखिल भारतीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड होणे म्हणजे त्या पक्षाचे भवितव्य फारसे आशादायक असणार नाही.

स्वामींना बंडखोर, तोंडाळ, पक्षफोडे, बेशिस्त असे मानले जाते; परंतु चंद्रशेखर यांचा भूतकाळ पहाता त्यांनी यापेक्षा फार काही वेगळे वर्तन केलेले नाही. आणीबाणीअगोदर काही वर्षे चंद्रशेखर हे इंदिरा गांधींच्या खास विश्वासातले समजले जात. १९७१ च्या इंदिरा गांधींच्या प्रचंड विजयानंतर काँग्रेसमध्ये नेहरू फोरम व सोशॅलिस्ट फोरम हे दोन अंतर्गत गट एकमेकांविरुद्ध युद्धाच्या पवित्र्यात उभे राहिले होते. त्या वेळेस एका फोरममधील कम्युनिस्ट सहप्रवाशांना ठोकण्याकरिता इंदिरा गांधींना चंद्रशेखर, मोहन धारिया, शेरसिंग, रामधन, कृष्णकांत या तरुण तुर्कांचा फार उपयोग झाला होता. काँग्रेसमधील छुप्या कम्युनिस्टांची नांगी ठेचण्यासाठी चंद्रशेखरप्रभृती तरुणतुर्कांचा इंदिरा गांधींना फार उपयोग झाला. त्या वेळेस चंद्रशेखर व त्यांच्या साथीदारांचे संसदेतील व संसदेबाहेरील वर्तन फारसे लक्षात ठेवण्यासारखे नव्हते. याच चंद्रशेखरप्रभृती तरुणतुर्कांचा उपयोग मोरारजी, निजलिंगप्पा, कामराज, स. का. पाटील इत्यादी सिंडिकेटवाल्यांविरुद्ध रान उठवण्यास इंदिरा गांधींनी चांगल्या प्रकारे याअगोदर करून घेतला होता. तेव्हा चंद्रशेखर व त्यांचे साथीदार जहाल नेते म्हणूनच प्रसिद्ध होते. ज्या मोरारजीविरुद्ध चंद्रशेखर व त्यांच्या साथीदारांनी जहरी टीका केली होती, त्या चंद्रशेखरांच्या पक्षाचे मोरारजी अध्यक्ष व्हावेत व मोहन धारिया त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री व्हावेत हा काळाने उगवलेला सूड होता ! त्या वेळचे चंद्रशेखर यांचे वर्तन पहाता ते भविष्यकाळात एखाद्या अखिल भारतीय पक्षाचे नेते होतील यावर कोणाचा स्वप्नातदेखील विश्वास बसला नसता ! चंद्रशेखर यांच्याजवळ कोणतेही नेतृत्वगुण नाहीत, हे तर त्यांनी जनता पक्षाच्या राजवटीत अध्यक्ष म्हणून जो भोंगळ कारभार केला त्यावरूनच सिद्ध झाले. चंद्रशेखर हे स्वप्नाळु आहेत. कोणतेही धोरण ठरवताना वास्तववादी भूमिका घेण्याचे भान ते कधीच ठेवत नाहीत. त्याचप्रमाणे प्रत्येक बाबतीतील धोरणविषयक भूमिका ते सतत बदलत असतात. अगदी सुरुवातीला ते काँग्रेसमध्ये आले तेव्हा त्यांना डावे अधिक जवळचे वाटत. कामराज, मोरारजी, स. का. पाटील, निजलिंगप्पा हे सिंडिकेटवाले त्यांना प्रतिगामी व भांडवलशाहीवाले वाटत. कम्युनिस्ट सहप्रवाशांच्या सहाय्याने मग त्यांनी सिंडिकेटवाल्यांविरुद्ध आघाडीच उघडली होती. सिद्धार्थ शंकर रे, डी. के. बारुआ, रजनी पटेल, बहुगुणा, चंद्रजित यादव, मालवीय, के. आर. गणेश, शशिभूषण यांच्याबद्दल चंद्रशेखरप्रभृतींच्या मनात त्या वेळेस ओलावा होता. त्यानंतर काळ बदलला. १९७१ च्या प्रचंड विजयानंतर इंदिरा गांधींना कम्युनिस्ट नकोसे वाटू लागले. मग त्यांना ठोकण्याकरिता चंद्रशेखर वगैरे डाव्यांच्या विरोधात उतरले. अर्थात वरील सर्व नेते कम्युनिस्टांचे हस्तक असले तरी त्यांना स्वतःचे तथाकथित पुरोगामित्व जपण्यासाठी तसा रोल करणे भाग होते. चंद्रशेखर व त्यांच्या साथीदारांनी मग काँग्रेसमधील वरील कम्युनिस्ट सहप्रवाशांना दे माय धरणी ठाय करून सोडले. व त्यांचा अंतर्गत सोशॅलिस्ट फोरम विसर्जित करावयास लावला.

## पदयात्रेतून काय साधले ?

आणीबाणीअगोदर संजय गांधींचे काँग्रेसपक्षातील वर्चस्व जाणवू लागले होते. जयप्रकाशांच्या बिहारमधील आंदोलनाला काँग्रेसवाल्यांनी व कम्युनिस्टांनी प्रतिगामी व भांडवलशाहीवादी ठरवून टाकले होते. आता चंद्रशेखर व त्यांच्या तरुणतुर्क साथीदारांना जयप्रकाशजींबद्दल व त्यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाबद्दल जिव्हाळा वाटू लागला होता; परंतु त्याची कारणे मात्र वेगळी होती. संजय गांधींच्या अरेरावी वर्तनाची झळ त्यांना पोहूचू लागली होती. आपल्या शत्रूंना नामोहरम करण्याकरिता इंदिरा गांधी आपला उपयोग करून घेत आहेत व आपला उपयोग संपला की, उजव्या कम्युनिस्टांप्रमाणे आपल्यालाही त्या पालापाचोळ्याप्रमाणे फेकून देतील, याची जाणीव त्यांना झाली होती. इंदिरा गांधींच्या तथाकथित पुरोगामी, निधर्मी, समाजवादी धोरणांबद्दल त्यांचा भ्रमनिरास झाला होता. अर्थात इंदिरा गांधींच्या विरोधात भूमिका घेण्याचे ते एकमेव कारण नव्हते. चंद्रशेखर यांच्या मनात जयप्रकाशजींबद्दल व त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल जिव्हाळा निर्माण होताच

दुखावल्या गेलेल्या कम्युनिस्ट सहकाऱ्यांनी चंद्रशेखर व त्यांच्या तरुणतुर्क साथीदारां-विरुद्ध जोरदार आघाडी उघडून त्यांना काँग्रेसमध्ये रहाणेच मुश्कील केले. मग आणीबाणी आली व विरोधी पक्षनेत्यांप्रमाणे तरुणतुर्कांनाही अट्ल घडवण्यात आली. आणीबाणी संपून जनतापक्ष सत्तेवर आल्यावर प्रत्येकाने केलेल्या त्यागाची बक्षिसी त्या त्या काँग्रेसवाल्याला देण्यात आली. इंदिरा गांधी सत्तेवर असताना त्यांना उघड-उघडपणे विरोध करून जयप्रकाशजींच्या आंदोलनाला सहाय्य केल्याबद्दल व आणीबाणीत त्रास सहन केल्याबद्दल चंद्रशेखर यांना जनतापक्ष नावाच्या कडबोळ्याचे अध्यक्षपद देण्यात आले. मोहन धारियांना केंद्रात मंत्रीपद मिळाले. त्याचप्रमाणे काँग्रेस-पक्ष सोडण्याचे धाडस (इंदिरा गांधींचा पक्ष निवडणूक हरण्यापूर्वी) दाखवल्याने जगजीवनराम व बहुगुणा यांनाही जनता मंत्रीमंडळात स्थान देण्यात आले. चंद्रशेखर यांच्या कर्तृत्वाबद्दलचा जयप्रकाशजींचा अंदाज चुकीचा निघाला. जयप्रकाशजींना तर चंद्रशेखर हे पंतप्रधान म्हणून सर्वोत्तम उमेदवार वाटत होते; परंतु जयप्रकाशजींचे इतर बाबतीतील आडाखे ज्याप्रमाणे चुकीचे ठरले त्याप्रमाणे चंद्रशेखर यांच्याबाबतही (त्यांच्या कर्तृत्वाबद्दल) जयप्रकाशजींचा भ्रमनिरास झाला असेल. जनतापक्ष हा बऱ्याच पक्षांचा व गटांचा बनला असल्याने त्याचे अध्यक्षपद संभाळणे ही तारेवरची कसरत होती; पण त्याच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर यांच्यासारख्या बंडखोर माणसाची नेमणूक होणे याइतके दुसरे दुर्दैव ते कोणते? जनता राजवटीत अडीच वर्षांच्या कारकीर्दीत अध्यक्ष म्हणून कोणतीही डोळ्यात भरण्यासारखी कामगिरी ते करू शकले नाहीत! जनतापक्षातील लाथाळ्यांना, गटबाजीला ते आळा घालू शकले नाहीत. पक्षांतर्गत निवडणूक घेऊ शकले नाहीत. राजनारायण, मधू लिमये, रामधन, स्वामी, शरद यादव यांच्या तोंडाळपणाला, त्यांच्या पक्षविरोधी कारवायांना पायबंद घालू शकले नाहीत. मोरारजींच्या हटवादीपणाला, आडमुठेपणाला ते लगाम घालू शकले नाहीत. चरणसिंग, जगजीवनराम यांच्यासारख्या फाजील महत्त्वाकांक्षी लोकांना ते आवर घालू शकले नाहीत. पक्षसंघटनेस एकवाक्यता लागते ती चंद्रशेखर यांच्या कारकीर्दीत कधीच दिसली नाही. पक्षातील मोठ्या नेत्यांनी पक्षाध्यक्षांशी सल्लामसलत न करता परस्पर प्रेसकडे धाव घेण्याची वाईट पद्धत चंद्रशेखर अध्यक्ष असलेल्या जनतापक्षानेच प्रथम अंमलात आणली. एकमेकांतील भांडणामुळे जनतापक्ष सत्तेवरून फेकला गेला, त्याची मोठी जबाबदारी, पक्षाध्यक्ष म्हणून चंद्रशेखर यांना टाळता येणार नाही! जनतापक्षफुटीनंतर इतर घटकपक्ष बाजूला झाल्यावर उरलेल्या जनतापक्षाचे अध्यक्षपद प्रभावीपणे संभाळणे चंद्रशेखरना तसे अवघड नव्हते; पण तेही काम ते धडपणे करू शकले नाहीत. त्यांनी भारतभर पदयात्रा काढली; पण त्यामागे स्वतःची प्रतिमा उजळ करण्याशिवाय दुसरा कोणताही हेतू नव्हता. त्याचा पक्षाला काही फायदा न होता तोटाच झाला. कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांना चंद्रशेखर यांच्याशी सल्लामसलत करण्याकरिता चंद्रशेखर हे त्यांच्या भारतपदयात्रेत ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी जावे लागत होते व तो सर्व प्रकारच हास्यास्पद वाटत होता. पदयात्रेला निघण्याअगोदर चंद्रशेखर यांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देणे योग्य ठरले असते.

## बेताल आणि बेशिस्तांची मालिका

सुब्रह्मण्यम स्वामींचा किस्सा वेगळाच आहे. केवळ चंद्रशेखर या व्यक्तीला विरोध करण्याकरिता ते उभे राहिले व मोरारजींसारख्या असंतुष्ट, नतद्रष्ट नेत्यांनी त्यांना पाठिंबा दिला. सुब्रह्मण्यम स्वामी ज्या दिवशी चंद्रशेखर यांच्या विरोधात उभे राहिले त्याच दिवशी ते निवडणुकीत हरणार आहेत हे त्यांना माहीत होते; पण चंद्रशेखर यांना बिनविरोध निवडून देण्याचा चान्स त्यांना मिळवून द्यायचा नव्हता. सुब्रह्मण्यम स्वामी हे राजनारायणांच्या रांगेतील वाचाळवीर आहेत. जनता राजवटीत राजनारायणांच्या ज्या माकडचेष्टा चालू होत्या त्याचा वारसा सध्या स्वामी चालवत आहेत. मुळात स्वामी हे राजनारायण व चंद्रशेखर यांच्याइतके लोकप्रिय नाहीत. एकट्या जनता पक्षाच्या ताकदीवर त्यांच्या ईशान्य मुंबई मतदारसंघातून येत्य निवडणुकीत त्यांचा दत्ता ताम्हाणे होईल ही काळ्या दगडावरची रेघ आहे. एक हुषार अर्थतज्ज्ञ असलेले स्वामी हे जनसंघाची मते पटल्याने त्या पक्षात प्रवेश करते झाले व नंतर त्यांच्या हुषारीचा उपयोग करून घेण्यासाठी ते लोकसभेत निवडून येणे अशक्य असल्याने, जनसंघाने त्यांना राज्यसभेवर निवडून आणले. आणीबाणीत ते बहुतेक काळ परदेशांत होते. मात्र त्यांच्यावर वॉरंट असूनसुद्धा एक दिवस अचानक ते राज्यसभेत प्रगट झाले व हुशारीने निसटले, तेव्हापासून ते खरे प्रकाशात आले. जनता पक्ष स्थापन झाल्यावर ते जनतालाटेत ईशान्य मुंबई मतदारसंघातून प्रचंड बहुमताने निवडून आले. वाजपेयी व त्यांच्यामधील वाद हा त्या वेळचा आहे. जनसंघाचा दिल्लीमध्ये बराच जोर असल्याने, निवडून येण्याची खात्री असल्याने स्वामींना नवी दिल्ली मतदारसंघातून उभे रहावयाचे होते; परंतु वाजपेयी तेथून उभे राहिल्यामुळे स्वामींचा जळफळाट झाला. वाजपेयींची लोकप्रियता व त्यांचे पक्षातील निरपवाद वर्चस्व याची स्वामींना असूया वाटू लागली. अर्थात वाजपेयींशी आपली तुलना करणे किती मूर्खपणाचे आहे याचे भानही स्वामींना राहिले नाही. मग त्यांनी वाजपेयींवर वाटेल ते घाणेरडे बिनबुडाचे आरोप केले. अर्थात लोकांना वाजपेयींबद्दल खरी माहिती असल्याने त्यांच्या मनातून वाजपेयी उतरण्याचा प्रश्नच नव्हता. उलट स्वामींचीच लायकी त्यातून दिसली. वाजपेयींनीही त्याकडे लक्ष न देता आपली प्रतिष्ठा राखली. चंद्रशेखर यांना विरोध करण्यामागे स्वामींचे हेच सूत्र आहे. चंद्रशेखर यांची पक्षातील वादातीत लोकप्रियता स्वामींना सतत सलत असते. जनता–राजवटीत वाजपेयींशी शत्रुत्व धरल्याने मग ते जनसंघगटापासून वेगळे पडले. मग त्यांनी आपल्या हेकट व आडमुठ्या स्वभावाशी जुळणाऱ्या मोरारजींशी मैत्री केली. जनसंघगटापासून अलग पडल्याने त्यांना कोणाच्या तरी आधाराची गरज होती. मोरारजींना त्यांची स्तुतिसुमने गाणारा कोणीही चालणार होता. शिवाय चंद्रशेखर यांच्यावर आगपाखड करण्याची त्यांची खाज ते स्वामींतर्फे भागवून घेणार होते. चंद्रशेखर जनतापक्षाचे पुन्हा अध्यक्ष झाल्यास मी जनता पक्षाचा राजीनामा देईन असे

मोरारजी म्हणाल्याचे कुठे तरी प्रसिद्ध झाले होते. तो एक तर स्टंट असावा किंवा धमकीही असेल ! मात्र मोरारजींच्या चेल्याला चंद्रशेखर यांच्याविरुद्ध जी अल्पमते मिळाली त्यावरून, त्यांनी जनतापक्षाचा राजीनामा दिला तर, जनता पक्षाचा एखादा कार्यकर्ताच काय; पण स्वामी सोडता गल्लीतले कुत्रेही रडणार नाही. कारण मोरारजींची जनतापक्षाला मदत तर राहोच पण त्यांच्या काही वक्तव्यांमुळे जनतापक्ष अनेकदा अडचणीत येतो. जनतापक्षातून जनसंघ फुटून निघाल्यावर स्वामींनी जनतापक्षातच रहाणे पसंत केले ते केवळ वाजपेयी जनसंघात असल्यानेच. कारण त्यांना समजावून घेणारे व त्यांच्याशी धोरणात्मक मतैक्य असलेले बरेच नेते जनसंघात होते तर जनतापक्षातील चंद्रशेखर, राजनारायण, मधु लिमये, फर्नांडिस, सुरेंद्र मोहन, रामकृष्ण हेगडे यांचा त्यांच्याशी उभा दावा होता; परंतु केवळ मोरारजींच्या भरवशावर ते जनतापक्षात राहिले व पूर्वी राजनारायणांनी जो धांगडधिंगा घातला त्याचा वारसा चालवू लागले. अध्यक्ष म्हणून चंद्रशेखर यांनी स्वामींविरुद्ध शिस्तीचा बडगा कधीच उचलला नाही. चंद्रशेखर यांचा कमकुवतपणा येथेच आहे. कोणताही निर्णय, मग त्याचे काहीही परिणाम होवोत, ठामपणे घेण्याची व तो अमलात आणण्याची चंद्रशेखर यांच्यात कुवत नाही. त्यामुळेच पक्षात राजनारायण, स्वामी, शहाबुद्दिन यांच्यासारखे बेताल, बेशिस्त लोक निर्माण होतात व पक्षकार्यकर्त्यांपुढे ते वाईट आदर्श घालून देतात. सुब्रह्मण्यम स्वामी खरे तर १९८० च्या लोकसभा निवडणुकीत पराभूत व्हायचे; पण ईशान्य मुंबई मतदारसंघात त्या वेळेस दत्ता सामंत हे अपक्ष उमेदवार उभे राहिल्याने त्यांनी इंदिरा काँग्रेसची मते खाल्ली. त्यामुळे स्वामींचा विजय सुकर झाला. जनतापक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीत चंद्रशेखर विरुद्ध स्वामी हा सामना नक्की झाल्यावर समाजवादी व संघटना काँग्रेस असे दोन तट पडावयास पाहिजे होते; परंतु मोरारजी देसाईच्या पाठीमागे सर्व संघटना काँग्रेसवाले नसल्याने स्वामींना मोठा पराभव पत्करावा लागला ! स्वामी पूर्वी जनसंघात असल्याने त्यांचे जनतातील समाजवाद्यांशी कधीच पटले नाही; परंतु मोरारजींच्या गुजराथमधील पाठीराख्यांनीही स्वामींना हात दाखवल्याने स्वामींना अपेक्षेप्रमाणे मते पडली नाहीत. गुजराथ, आंध्र, कर्नाटक, मद्रास (तामीळनाडु) महाराष्ट्र या राज्यांत स्वामींनी बऱ्यापैकी पाठिंबा अपेक्षिला होता.

जनता पक्षाच्या पाटणा अधिवेशनात चंद्रशेखर यांनी भाजप–लोकदलसह सर्व विरोधी पक्षांशी तडजोड करण्याची तयारी दर्शविली ही गोष्ट स्वागतार्ह मानायला हवी. उशीरा का होईना पण चंद्रशेखर यांनी वास्तववादी भूमिका घेतली हे काही थोडके नाही. मागे एकदा चंद्रशेखर म्हणाले होते की, भाजप–लोकदल आघाडी ही इंदिरा-काँग्रेसपेक्षा भयानक आहे. आता त्यांना आपली चूक उमगली असावी. मात्र बहुगुणा व चंद्रजित यादव या कागदी वाघांना ते उगाचच भाव देत आहेत. बहुगुणा व यादव यांना त्यांच्या मतदारसंघाबाहेर कोणी विचारत नाही. समजा, त्यांनी आपले फालतु पक्ष जनतापक्षात विलीन केले तर जनतापक्षाची ताकद फारशी वाढेल असेही नाही. तेव्हा बहुगुणा, यादव व कम्युनिस्टांना फारसा भाव न देता चंद्रशेखर यांनी सर्व विरोधकांना एकत्र आणले तर त्याला कोणाचाही विरोध रहाणार नाही. याबाबतीत समाजवादी काँग्रेसच्या शरद पवारांनी जी वास्तववादी भूमिका घेतली आहे त्याचे चंद्रशेखर यांनी अनुकरण करावयास हवे.

पाकिस्तान अमेरिकेकडून जो अत्याधुनिक शस्त्रे खरेदी करत आहे त्याबद्दल जनतापक्षास वाटणारी चिंता व्यक्त करण्यासाठी जनतापक्षाचे दोन प्रतिनिधी पाकिस्तानला जाऊन आले. हा एक स्टंट होता. तशा प्रकारची काहीही आवश्यकता नव्हती. त्यापेक्षा वाढती महागाई, ढासळती कायदा व सुव्यवस्था परिस्थिती, पंजाब व आसामची ज्वलंत समस्या, सार्वजनिक व्यवहारांतील वाढता भ्रष्टाचार, लोकशाहीची पायमल्ली करण्याचे सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न या प्रश्नांवर सर्व विरोधकांना एकत्र करून जयप्रकाशजींच्या बिहारमधील आंदोलनाप्रमाणे आंदोलन उभारणे जनतापक्षाला शक्य आहे. त्या आंदोलनात वाटल्यास जनतापक्षाने नेतृत्व स्वीकारावे. विरोधकांच्या परिषदांचे स्टंट आता पुरे झाले. त्यातून आतापर्यंत काहीच निष्पन्न झालेले नाही. सर्व बिगरकम्युनिस्टांनी एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारणे, त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे आहे. फरुक अब्दुल्ला, एन. टी. रामाराव, ज्योती बसु यांच्या फारसे नादी न लागणे चांगले. कारण वेळ पडता ते तिघेही आपल्या फायद्याचे बघतील व इतर विरोधकांना बघत ठेवतील. हे तिघेही आपापल्या राज्यात विरोधकांना वाव देणार नाहीत; परंतु इतरत्र जेथे ते कमकुवत आहेत तेथे मात्र विरोधकांशी जागावाटपात आपला वाटा मागतील. त्या दृष्टीने जनतापक्षाने आपले धोरण ठरवावयास हवे ! □



## जादूगार तायडे म्हणतात

# परामानसशास्त्र म्हणजे चार चलाख माणसांनी केलेली फसवेगिरी आहे

मुलाखत : प्रा. राम बिवलकर

पंचवीस फेब्रुवारी १९८४ चा 'माणूस'चा अंक हाती पडला. त्याच्या मुखपृष्ठावरच छापले होते 'विज्ञानापलीकडे'. आत पृष्ठक्रमांक १४ वर 'परामानसशास्त्र–विद्यमान विज्ञानापलीकडची अंतस्थ ऊर्जा' या शीर्षकाखाली प्रा. व. वि. अकोलकर यांचा लेख छापला होता. परामानसशास्त्रात मोडणाऱ्या मनःप्रभाव, दूरस्थ वस्तुदर्शन (Clairvoyance), मनोमन संपर्कप्रत्यय (Telepathy) मरणोत्तर अस्तित्वाची शक्यता आणि मृतांचे संदेश देणारे प्लँचेट, चेटूक, भानामती, मंत्र, तंत्र, सिद्धी, ट्रॅन्स्पोर्टेशन यासारख्या गोष्टीत जनसामान्यांप्रमाणे मलाही रस असल्याकारणाने मी प्रा. अकोलकरांचा लेख आधाशासारखा वाचून काढला.

विद्यमान वैज्ञानिक सिद्धांतांच्या आधारे ज्यांचे स्पष्टीकरण मिळू शकत नाही व ज्यामुळे वर्तमान विज्ञानाच्या मर्यादा स्पष्ट होतात, अशा घटनांनी परामानसशास्त्रीय संशोधनास चालना मिळाली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, रशिया या प्रगत देशांत त्यामुळे याही नव्या संशोधनक्षेत्रात चढाओढ लागली. फ्रान्सिस बेकनने ३०० वर्षांपूर्वी ज्या गोष्टींवर संशोधन आणि प्रयोग व्हावे असे म्हटले होते व ३०–४० वर्षांपूर्वी एडिंग्टन, श्रोडिंगर, सर जेम्स जीन्स या पदार्थ वैज्ञानिकांनी, मन हे निसर्गाचे आणि निसर्गघटनांचे मूलद्रव्य (stuff) असण्याची जी शक्यता बोलून दाखविली होती, त्या गोष्टी कविकल्पना न राहाता, त्यांना पुष्टि देणाऱ्या घटना आता वैज्ञानिक मंडळी विचारात घेऊ लागली आहेत. या मंडळींना काही परासामान्य-पॅरानॉर्मल व्यक्ती आणि त्यांच्या कृती संशोधनासाठी मिळत आहेत. या व्यक्तींवरील प्रयोगात्मक प्रात्यक्षिकांचे आणि चाचण्यांचे अहवालही वैज्ञानिक नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्यात येत आहेत. त्यामुळे सामान्य माणसाला 'चमत्कार' वाटावे अशा गोष्टी करणाऱ्या या मंडळींच्या शरीरात काही विशेष प्रभावी अंतस्थ ऊर्जा असावी अशी परदेशी परामानसशास्त्राप्रमाणे प्रा. अकोलकरांचीही खात्री पटलेली आहे हे त्यांच्या लेखाच्या सुरुवातीसच जाणवले.

मग दिवंगतांशी संपर्क माध्यम म्हणून काम करणारी परासामान्य माणसे, भानामती व भूतचेष्टा घडविणाऱ्या केंद्रवर्ती व्यक्ती, पाठीवर मुक्ताईला मांडे भाजू देणारे ज्ञानेश्वर, सदेह वैकुंठगमन करणारे तुकाराम, बसल्या जागी दूरस्थ वस्तू आणवून प्रसादरूपाने वाटणारे तथाकथित सत्पुरुष, ध्यान, धारणा, समाधि यायोगे 'सिद्धी' प्राप्त करून घेणारे योगी, संतमहंत, यांच्या ठायीही अशा परासामान्य ऊर्जेचा भाग असावा, असे का म्हणू नये ? असेही त्यांना वाटून गेले. पोलंडची जोना, रशियातील नेलिया मिरवाइलोवा, नीना कुलजीना श्रीमती अला विनोग्रादोवा, इस्रायलमधील यूरी गेलर, अमेरिकेतील फेलिसिआ पॅरिसे यांच्यावरील प्रयोग, त्यांनी शास्त्रज्ञांपुढे करून दाखविलेल्या करामती यामुळे प्रा. अकोलकर इतके भारून गेलेले दिसले की त्यांनी त्या भरात प्रचलित विज्ञानाच्या ग्रहीतांच्या चौकटीत न बसणाऱ्या घटनांची सत्यता नाकारणाऱ्या वैज्ञानिकांना, परासामान्य स्वरूपाच्या घटना म्हणजे थोतांड आहे असे म्हणणाऱ्या, वैज्ञानिकत्वाचा भास निर्माण करणाऱ्यांना आणि काही (सर्वच नव्हे) जादूगार मंडळींना एकजात मूर्खात काढले. 'काही जादूगारांना परासामान्य किंवा असामान्य क्षमता असलेल्या व्यक्ती म्हणजे लोकांची फसवणूक व हातचलाखी करणाऱ्याच असे वाटते. आणि 'परामानसशास्त्रीय संशोधन करणारे रशियन, अमेरिकन आणि इतर वैज्ञानिक, 'विद्वान' असले, तरी त्यांना काही कळत नाही' असे विधान करणारेही जादूगार भेटतात. असेही विधान अकोलकरांनी सात्विक संतापाच्या ओघात केलेले आढळले.

नोकरीच्या निमित्ताने अनेक वर्षे कोकणात काढली असल्याने भूत पिशाच्च, मंत्र तंत्र, जारण, मारण, चेटूक, भानामती, मांड भरणे, *अंगात येणे अशा अनेक प्रकारच्या गोष्टींशी माझा संबंध आला होता*. हे प्रयोग करणाऱ्या देवऋषी म्हणा, 'झाड' म्हणा यांच्या अंगी 'दैवी' म्हणा अगर 'पैशाची' म्हणा अशा शक्तींचा खचित वास असतो आणि त्या शक्तीच्या जोरावरच ही मंडळी हळदकुंकू, बसल्या पाटाखालून अगर घागरीतून काढून देणे, रिकाम्या घागरीतून प्रसाद वाटणे, अंगावर व कपड्यावर बिब्ब्याच्या फुल्या उठवणे कुणाला मारणे, रक्त ओकवणे, स्पर्शाने वा तीर्थाने रोग बरा करणे अशा असामान्य गोष्टी करू शकतात अशी जनसामान्यांची धारणा आहे. मलाही अनेकदा या गोष्टींचा प्रत्यय आला. प्रत्यक्ष पाहाणारी मंडळी भेटली. देवीचा कोप नको. भुताखेताच्या वाटेस जाणे नको, विषाची परीक्षा नको. म्हणून ज्यांच्या नेहमीच्या वागण्याबोलण्यावरून, अकलेच्या आवाक्यावरून, त्यांच्या अंगात दैवी शक्ती संचार करण्याची सुतराम् शक्यता नाही हे दिसत असूनही, मी गप्प बसत असे; पण केव्हा तरी या गोष्टींची शहानिशा करावी असे वाटत होते.

मी मुंबईत बदलून आलो आणि विद्यापीठाच्या बहि:शाल मंडळाच्या व्याख्यात्यांच्या यादीत कुणी तरी सुचविले म्हणून जादूगार श्री. द्वा. आ तायडे यांचे नाव आम्ही घातले. त्यांनी खेडोपाडी द्यायच्या आपल्या सप्रयोग व्याख्यानाचे विषय कळविले होते. त्यात जारण, मारण, मंत्र, तंत्र, चेटूक, भानामती भूतपिशाच्च, मृतांचे संदेश असे विषय होते. या साऱ्या गोष्टी थोतांड असून ही चलाख मंडळी सामान्य माणसांची या प्रयोगाद्वारे बेसुमार लुबाडणूक कशी करतात हे तायडे ठिकठिकाणी सांगणार होते. आम्ही अमुक पाहिले, आम्ही तमुक पाहिले म्हणणाऱ्यांना आव्हान देणार होते. आव्हाने स्वीकारणार होते. कोकणात, या अशा अतिमानवी आणि अतींद्रिय शक्ती यावर विश्वास ठेवणारी ९० टक्के मंडळी असल्याकारणाने लोकजागृत्ती करण्याचे काम श्री. तायडे यांच्या व्याख्यानाने होणार होते.


जादूगार श्री. द्वा. आ. तायडे ही एक आंतरराष्ट्रीय कीर्तीची व्यक्ती आहे. लहानपणी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कै. डॉ. के. भा. लेले यांच्याकडे आणि कै. ए. डी. जोसेफ यांनी जादूविद्येचे धडे गिरविले होते. आजवर जगातील विविध जादूसंघटनांची पदे त्यांनी भूषविली आहेत. भारतातील इंडियन मॅजिशियन्स अॅकेडेमी, इंडिया रिंग, सोसायटी ऑफ इंडियन मॅजिशियन्स, अमेरिकेतील इंटरनॅशनल ब्रदरहूड ऑफ मॅजिशियन्स, न्यूयॉर्क मॅजिशियन्स टेबल, मॅजिक डिलर्स असोसिएशन, सोसायटी ऑफ अमेरिकन मॅजिशियन्स, टाकोमा रिंग नं. ७०, इंटरनॅशनल गिल्ड ऑफ प्रेस्टीजिटी टेटर्स आणि इंग्लंडमधील मॅजिक सर्कल ( लंडन ), मॅजिक क्लब इंटरनॅशनल आणि श्रीलंकेतील मॅजिक सर्कल सिलोन या संस्थांचे तायडे पदाधिकारी, सन्माननीय सभासद वा सभासद आहेत.

कै. प्रो. पी. सी. सरकार या जगविख्यात जादूगाराने १९६८ साली बंगलोर येथे भरविलेल्या ऑल इंडिया मॅजिक कॉंग्रेसच्या शैक्षणिक समितीच्या अध्यक्षपदी श्री. तायडे यांचीच नेमणूक केली होती. त्या कॉंग्रेसमधील श्री. तायडे यांचे जादूविद्येवरील भाषण इतके प्रभावी आणि तर्कशुद्ध झाले होते की, कॉंग्रेस अधिवेशनानंतर प्रो. सरकार यांनी श्री. तायडे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते,

'Big and most educated magicians like yourself are our greatest assets in India. Educated magicians like you are holding the prestige of Indian magic high and from the pavements, it is reaching the Royal parlours.'

या कॉंग्रेसला हजर असलेल्या इंटरनॅशनल ब्रदरहूडच्या श्री. रोनाल्ड हेन्स आणि सोसायटी ऑफ अमेरिकन मॅजिशियन्स्च्या श्री. बेंजामिन क्लेनमन यांच्या निमंत्रणावरून १९६९ साली श्री. तायडे अमेरिकेत, सिमसिनारी येथे भरलेल्या जागतिक जादूगारांच्या परिषदेस हजर राहिले. तिथे त्यांच्या जादूच्या सामानाची वाहवा झाली आणि मग अशा परिषदांनिमित्त त्यांना गेल्या १०।१५ वर्षांत दहा वेळा परदेशप्रवास घडला.

बहि:शालमुळे माझा आणि श्री. तायडे यांचा– आता मी त्यांना 'अण्णा' म्हणतो इतके आम्ही जवळ आलो आहोत– प्रा. अकोलकरांच्या लेखातील जादूगारांविषयीचा उल्लेख वाचला आणि मला अण्णांची आठवण झाली. त्यांना हा लेख



□

जगातील विविध जादूसंघटनांचे पदाधिकारी आणि सन्माननीय सभासद – जादूगार तायडे

□

दाखवावा आणि त्यांची या विषयावरील मुलाखत घ्यावी आणि ती 'माणूस' कडे पाठवून द्यावी असे मनात आले. संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांनी या गोष्टीला त्वरित मान्यता दिली आणि मी अण्णांशी संपर्क साधला. प्रत्यक्ष भेट घेऊन २५–२–८४ चा 'माणूस' चा अंक त्यांना दिला. 'रीडर्स डायजेस्ट' मध्ये जादूवर आलेला लेखही दाखवला आणि म्हटले,

'अण्णा, एखादा संपूर्ण दिवस तुम्ही मला द्यायला हवा. त्याखेरीज सगळ्या गोष्टी मला समजावून घेता यायच्या नाहीत.'

'जरूर दिवस देतो!' अण्णा आपली डायरी चाळीत म्हणाले– दोन–चार तारखांची भवति न भवति होऊन, अण्णांचा उजवा हातच जणू असलेल्या सौ. नीलाताईंशी ( मोठी मुलगी ) बोलून अण्णांनी मला तारीख दिली. म्हणाले, 'कॉलेज आटोपले की इकडेच या. संध्याकाळपर्यंत आपण बोलू. तुम्हाला हवे ते तुम्ही लिहून घ्या. ठरलं?'

□

ठरल्या दिवशी सकाळी मी आठवणीसाठी अण्णांना फोन केला. म्हणाले, 'अरे या या. जय्यत तयारी आहे मुलाखतीची! सत्तरीत पोचलो तरी आठवण पक्की आहे प्रोफेसरसाहेब.'

अकरा वाजता, मी भाटियाभुवनच्या पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावरच्या अण्णांच्या निवासस्थानी पोचलो तेव्हा उन्हानं आणि जिने चढून मला धाप लागली होती. मी बैठकीच्या खोलीत शिरताच त्यांनी माझे स्वागत करून पंखा जोरात सोडला.

'बसा. वाऱ्याखाली थंड पाणी प्या. विश्रांती घ्या. मग सुरुवात करू.'

मी स्वस्थचित्त झाल्यावर अण्णांना विचारले आता सुरू करू या ना?

**: प्राध्यापक अकोलकरांचा लेख वाचलात ?**

हा तुमचा 'माणूस' चा अंक बघा. त्या लेखावर केलेल्या टिपणीवरून मी अकोलकरसाहेबांचा लेख अक्षर न् अक्षर आत्मासात केलाय हे तुमच्या ध्यानी येईल.

मी अंकातला तो लेख पाहिला. अण्णांनी तो पुरा चितारला होता. मी हसून म्हटले,

**: प्रा. अकोलकरांचा लेख वाचून तुमची पहिली प्रतिक्रिया काय झाली अण्णा ?**

खरे सांगू का ? जादू हा विषय तथाकथित वैज्ञानिकांनी किंवा शास्त्रज्ञांनी कधी अभ्यासलेलाच नाही. त्यामुळे विद्यमान वैज्ञानिक सिद्धांतांच्या चौकटीबाहेर जे घडते ते माणसातील काही अतिंद्रिय, अमानवी शक्तीमुळे, परामानसशास्त्रीय भाषेत अंतःस्थ ऊर्जेमुळे घडते अशी भ्रामक समजूत ही माणसे करून घेतात. सृष्टीतील प्रत्येक घटना निसर्गनियमानुसारच घडते. फक्त तिच्या कार्यकारण भावाचे आकलन झाले पाहिजे. ज्ञात निसर्गनियमाविरुद्ध एखादी घटना घडते असे भासले तर माणूस आजवर त्याला जादूच म्हणत आला; पण जादूविद्येचा आत्मा गुप्तता आणि जादूविद्येचे ध्येय मनोरंजन. या निखळ आनंद देणाऱ्या गोष्टी दूर सारून थोडीफार जादूची साधने, दुसऱ्यावर छाप टाकणारे, संमोहित करणारे भाषण, पार्श्वभूमी आणि सरावाने आत्मसात केलेली हातचलाखी यांच्या जोरावर जनसामान्यांना चकित करून त्यांची लुबाडणूक करणाऱ्या मंडळींनी जादूच्या दिशेने, घटनेतील कार्यकारणभाव शोधून काढण्याच्या वैज्ञानिक प्रगतीतच अडसर निर्माण केला.

**: तुमचे म्हणणे तितकेसे समजले नाही. मला सांगा, जादू म्हणजे काय ?**

जादू एक शास्त्र आहे आणि कलाही आहे. मानवी आयुष्याशी या कलेचा निकडीचा संबंध असूनही या कलेबद्दल व शास्त्राबद्दल बहुजनसमाजात प्रचंड अज्ञान आहे. आदिमानवाचे विजेच्या लखलखाटाने डोळे दिपले. मेघांच्या गडगडाटाने कान बधिर झाले. आकाश काळ्या ढगांनी भरून मुसळधार पाऊस पडताच नद्यांना महापूर आले; पण उन्हाळ्यात, हत्तीच्या सोंडेने पडलेल्या महापूर पाण्याचा मागमूसही कुठे दिसेना, याचे त्याला कोडे पडले. दिवसा दिसणाऱ्या वस्तू रात्र पडल्यावर दिसेनाशा होत. भरतीबरोबर सागराच्या पाण्याचा किनाऱ्याकडे धावणारा लोंढा, ओहोटी लागताच पार आक्रसून जाई. याचे त्याला नवल वाटे. संध्याकाळी सूर्याचा गोळा क्षितिजापार बुडाला की, आपल्या शीतल किरणांनी पृथ्वीला स्नान घालणारा चंद्राचा शांत गोल आकाशात का दिसतो, त्याला समजेना. जन्मला तो मरतो का ? झाडांना फुलांचा आणि फळांचा बहर येतो का न जातो का? उन्हाळ्यापाठून हिवाळा हा बदल हवामानात होतो का ? या व अशा गोष्टी घडतात कशा याची कार्यकारणपरंपरा त्याला उमजेना. त्यामुळे या जादूचे कर्तृत्व त्याने विविध देवांना बहाल केले. पावसाचा कारक इंद्र तर पाण्याचा वरुण, उष्णतेचा अग्नि. जितकी रहस्ये तितके देव माणसाने निर्माण केले. जगन्नियत्याच्या या जादूची कार्यकारणपरंपरा जाणण्याची जिज्ञासा निर्माण झालेल्या शास्त्रज्ञांनी ती शोधून काढली आणि एकामागोमाग एक अशी शास्त्रे जन्माला आली. भूगोल, भुस्तरशास्त्र, रसायन, पदार्थविज्ञान, वनस्पति, जीवशास्त्र अशा विविध शास्त्रांनी निसर्गाचे नियम आकळण्याचा प्रयत्न केला; पण जितके माणसाला ज्ञात व्हावे तितका निसर्गातील गूढतेचा प्रदेश वाढत जात होता. नवनवे चमत्कार, नवनव्या 'जादूच्या' रुपाने माणसांपुढे ठाकत होते. ज्ञात शास्त्रांच्या मर्यादा आणि चौकटीत त्यांना पकडणे अशक्य होते. त्याच शास्त्रांच्या पद्धती आणि प्रयोगांनी ही गूढे कशी आकळावी ? परामानसशास्त्राची जगति अशी मुळातच मर्यादा पडलेली आहे. भूगोलाचे नियम वेगळे, रसायनाचे वेगळे, पदार्थविज्ञानाचे वेगळे, जीवशास्त्राचेही वेगळे. मग याच शास्त्रांच्या चौकटीतून त्यापलीकडचे नियम कसे आकळणार? जादूविद्या ही सर्व नैसर्गिक शास्त्रांची जननी आहे, आणि जादूचे प्रयोग करून लोकांचे मनोरंजन करणारे आम्ही जादूगार याच शास्त्रांचा फायदा उठवून लोकांना आपल्या जादूने चक्रावून टाकतो; पण त्यात 'दैवी' वा 'पैशाची' शक्ति आम्ही वापरीत नसतो. तसे कुणालाच करणे शक्य नाही.

**: पण अकोलकरांनी परामानसशास्त्रीय क्षेत्रातील विषय म्हणून ज्यांचा उल्लेख केला आहे ते विषय म्हणजे मनःप्रभाव, दूरस्थ वस्तूदर्शन, मनोमन संपर्कप्रत्यय म्हणजे टेलीपथी, मरणोत्तर अस्तित्व आणि मृतांचे संदेश वगैरे गोष्टी—**

प्रोफेसरसाहेब, नाटकातील पात्रांच्या कामाला उठाव येण्यासाठी जशी सीनसीनरी किंवा सेट आणि विविध वस्तू लागतात. पात्रांना रंगवावे लागते. जो रोल असेल तसे कपडे घालावे लागतात, प्रकाश योजना आणि पार्श्वसंगीत वापरावे लागते. त्याशिवाय रंगमंचावरचा शिवाजी शिवाजी भासणार नाही. तद्वत् जादूच्या प्रयोगासाठी सेट, जादूची साधने, कपडे, मेक-अप सर्व लागते. जादूगाराचे महत्त्व आणि अद्भुत घडवून आणण्याची ताकद लोकांना खरी वाटावी लागते. त्या दृष्टीने जादूगार कुठलीही जादू करीत असताना अनेकविध गोष्टी बोलून प्रेक्षकांचे मन आपल्याकडे खेचून घेत असतो. एखादी दोरी तोडून तिचे दोन तुकडे करून मग पुन्हा जोडून दाखवायची असली तर जादूगार ती इथे बाजारात विकत घेतली असे सांगत नाही. 'मी तिबेटात गेलो असता, एका आडवळणी गावात एकदा राहिलो. तिथल्या मंदिरात मला एक लामा भेटला. तो माझ्यावर खूष झाला. आणि त्याने मला ही जादूची दोरी बहाल केली.' असे काही तरी त्याला बोलावे लागते. प्रत्येक प्रयोगात जादूगार जे बोलतो, त्याला आम्ही 'पॅटर' ( Patter ) म्हणतो. या पॅटरमध्ये टेलीपथी, क्लेअर व्हॉयन्स, मेस्मेरिझम, हिप्नॉटिझम हे शब्द वापरतो. दूर असलेल्याशी रंगमंचावरून संपर्क साधणे, दूरस्थित वस्तू दिसते आहे असे भासविणे, एखाद्याला संमोहनावस्थेत लोटून काही गोष्टी त्याच्याकडून वदवून घेणे, या गोष्टी जादूगाराला बोलाव्या लागतात, कराव्याही लागतात. एका विशिष्ट पेटीचा किंवा टेबलाचा उपयोग करून एखाद्या स्त्रीचे आम्ही तीन तुकडे करतो, व पुन्हा सांधतो. तेव्हा अशा दैवी शक्तीचा प्रादुर्भाव आमच्यात असतो असे लोकांना भासवावे लागते. डोक्यावर धरलेल्या थैलीतील भांड्यात तांदूळ टाकून ती एखाद्या प्रेक्षकाच्या डोक्यावर धरून त्या माणसाच्या शरीरातील ऊर्जा वाढवून त्या तांदुळाचा भात आम्ही शिजवून दाखवतो. आणि हवेतून दही आणून त्याच माणसाला तो भात खायलाही घालतो; पण खेळाच्या उठावासाठी वापरलेली ही भाषा, ती दैवी शक्ति खरीच आहे असे लोकांना वाटू लागते. कारण जादूविद्येचे अज्ञान ! जादूगार आपले 'गोप्य' सांगत नाही. एकाच ठिकाणी एखादा प्रयोग पुन्हा करीत नाही. जादूत 'वन्समोअर' नाही. त्यामुळे लोक शेवटपर्यंत त्या भ्रामक कल्पनेत राहतातच.

प्राचीन काळी ऐतिहासिक काळी, आणि अगदी आज वर्तमानकाळातही या जादूविद्येच्या जोरावर सामान्यांना न आकळणारे चमत्कार करून काही मूठभर मंडळी आपली सत्ता आणि वर्चस्व समाजात प्रस्थापित करतात. यात धर्मोपदेशक, राजेमहाराजे, संत महंत, लोकनेते ही मंडळी असतात. ज्या त्या काळातील लोकांना अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी ही मंडळी अगदी सहज सुलभतेने करून दाखवतात. त्यामुळे त्यांच्या अंगी 'दैवी' वा 'पैशाची' शक्ती असल्याचा जनसामान्यांचा ग्रह होतो.

**: ही समाजाची फसवणूकच नाही का ?**

फसवणूक नाही. हे समाजाचे अज्ञान. या अज्ञानाचा आपल्या वैयक्तिक फायद्याकरता जी माणसे उपयोग करून घेतात ते लुच्चे, लबाड, ढोंगी असतात. ही विद्या संधिसाधूंच्या हाती लागली की तिचा दुरुपयोग होतो. पूर्वकाळीही ते झाले आणि आजही होत आहे. यामुळेच मूठभर स्वार्थी आणि भोंदू 'बाबामहाराजांचं' फावतं. समाज त्यांच्या आहारी जातो. ते त्याची यथेच्छ लबाडणूक करतात. 'स्वप्नांचा उलगडा करणे', 'पुढील घटनांचे आधीच कथन करणे' 'रोग बरे करणे', 'शत्रूचा सूड उगविणे' अशी कामे ही माणसे करीत असतात. जुने ग्रंथ आणि साहित्य यामध्ये मंत्र, तंत्र, जादूटोणा या विषयींचे अनेक संदर्भ आपल्याला वाचायला मिळतात. अथर्ववेद तर या मंत्रांनीच भरलेला आहे. बायबल, कुराण यातही अशा प्रकारची विपुल उदाहरणे मिळतात. मोझेसने आपल्या काठीचे सापात रूपांतर केले. ख्रिस्ताने पाण्याने भरलेल्या रांजणांकडे नुसते पाहिले आणि त्या पाण्याचे मद्यात रूपांतर झाले. तुकाराम सदेह वैकुंठाला गेले. ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली, रेड्यामुखी वेद वदविले आपल्या पाठीवर मुक्ताईला तिचे मांडे भाजून दिले. रामदासांनी आणि श्रीनृसिंहसरस्वतींनी मेलेल्यांना जिवंत केले. वाळलेल्या झाडाला पाने फुटवली, डोक्यावर हात ठेवून मूर्खाला विद्वान बनविले, एक का अनेक आख्यायिका आणि दंतकथा आपण भाविकपणाने ऐकतो आणि त्यावर विश्वासही ठेवतो.

**: हे सारे चमत्कार म्हणजे साधी जादू होती, हातचलाखी होती असे म्हणायचे का ?**

हे सारे निसर्गनियमांविरुद्ध आहे. या जगात एकही गोष्ट त्या नियमांविरुद्ध घडत नाही. घडली असे भासते, तिथे सामान्य माणसाला, अगदी जादूविद्या न जाणणाऱ्या वैज्ञानिकालाही न समजणारा वेगळा कार्यकारणभाव असलाच पाहिजे. प्रत्येक गोष्टीत त्या माणसाने ती ती गोष्ट कशी केली हे शोधून काढणारा अतितल्लख बुद्धिमत्तेचा, अव्वल दर्जाचा जादूगारच हवा.

**: पण प्रा. अकोलकरांनी ज्या ज्या व्यक्तींची माहिती दिली आहे आणि त्यावरील वैज्ञानिकांनी केलेल्या प्रयोगाबाबत जे तपशील दिले आहेत त्याबाबत—**

जादूविद्या न जाणणारे वैज्ञानिक आणि आपल्यात अतींद्रिय शक्ती आहे याची प्रसिद्धी करू इच्छिणारी चलाख व्यक्ति, व तिने सांगितलेली तिची मानसिक स्थिती, थोडी फार वाढलेली नाडी, रक्तदाब, उष्णमान म्हणजे काही तथाकथित अंतःस्थ ऊर्जेने घटना घडल्याचा पुरावा नव्हे.

**प्रा. अकोलकरांच्या लेखातील पोलंडातील कु. जोना १३ वर्षांची, सॅनिस्लावा २० वर्षांची, रशियातील नेलिया मिखइलोवा १४ वर्षांची असताना वस्तू नजरेने हलवणे, त्यांची उलथापालथ होणे, काड्या जळू लागणे इत्यादी प्रकार त्यांनी केले. इतक्या लहान वयात तुम्ही म्हणता तशी चलाखी त्यांनी का करावी ? त्यामागचा हेतू काय ?**

प्रसिद्धीची हाव, चार लोकांत नाव होणे या हव्यासाला काय वयाची अट असते का प्रोफेसरसाहेब ? मध्यंतरी तमिळनाडूतील अशाच एका छोट्या मुलीची अशीच प्रसिद्ध झाली होती. ती मुलगी म्हणे आठ–आठ दिवसांत खातपीत नसे; पण हॉस्पिटलमध्ये तिच्यावर खडा पहारा बसविल्यानंतर 'अनशनाचे' गुपित बाहेर पडले. तिचा चुलता मध्यरात्री तिला पुरेसे खिलवीत असे. या अशा प्रसिद्धी मागे मोठी माणसेही असतातच. अगदी तथाकथित वैज्ञानिकही असू शकतात. प्रा. अकोलकरांनी तरी ही माहिती वैज्ञानिक जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाली म्हणून खरी मानली ना ? त्या प्रसिद्धीमागचे ध्येय यातच साध्य झाले. प्रा. अकोलकरांनी दिलेली सर्व उदाहरणे म्हणजे नजरेने वस्तू हलविणे, हवेत नाचविणे, जाळणे किंवा एकत्रित केलेल्या वस्तू अगर द्रावांचे पृथक्करण करणे या गोष्टी अशक्य आहेत. या तथाकथित अतींद्रिय शक्तीशाली माणसांनी मोठमोठ्या वैज्ञानिकांसमोर त्या गोष्टी करून दाखविल्या. त्यांनी त्यांच्या मार्गाने त्या तपासल्या. रक्तदाब, शरीराचे उष्णमान, ऊर्जा, किर्लिअन प्रकाश वलयांनी घटना चित्रित करणे हे त्यांचे मार्ग आणि पद्धती, त्या घटनांमागील कार्यकारणभाव निश्चित करण्यात थिट्याच पडणार. अशी काही शक्ती काही माणसांत असते असे क्षणभर मान्य केले तरी या प्रयोगांनी ते सिद्ध होणेच शक्य नाही. किंबहुना अशी शक्ती आपल्यात आहे असे भासवणाऱ्या मंडळींची चलाखीही त्यांना समजणार नाही. मी जर माझे पोट भरमसाठ दुखते आहे असे ओरडत गडबडा लोळू लागलो तर कोणत्याही डॉक्टरला, वैद्याला, हकिमाला क्ष-किरणवाल्याला अगर ई. सी. जी. वाल्याला मला खरे तर काहीच होत नाहीए हे सिद्ध करता यायचे नाही. उमगले तरी, मला काहीच होत नसताना वेदनेने व्याकूळ होऊन मी का बरे गडबडा लोळेन अशा संभ्रमात ते पडतील. असल्या प्रकारात हेच घडते. जोनाच्या शरीरातून बाहेर पडणारी ऊर्जा गुरुत्वाकर्षणाला जुमानीत नाही हे कशावरून सिद्ध केले त्या डॉक्टरांनी ? सॅनिस्लोवा, पत्रे तराजूची पारडी, चेंडू या गोष्टी स्पर्श न करता हलवून दाखवी. यात फसवणूक नसल्याची खात्री मानसशास्त्रज्ञ थिओडोर फ्लाडनीय यांनी कशाच्या आधारे दिली ?

**: अण्णा— पण ?**

'थांबा. तुम्हाला एक गंमत दाखवतो. आमचा आनंद आहे ना, त्याच्याही नजरेत वस्तू हलविण्याची ताकद आहे.

**: म्हणता काय ?**

अण्णांनी त्यांचा मुलगा आनंद वय वर्षे १८ याला बोलावले.

**प्रसिद्धीची हाव, चार लोकांत नाव होणे या हव्यासाला काय वयाची अट असते ?**

तो सध्या कॉलेजच्या पहिल्या वर्षाला आहे; पण वडिलांसारखा जादूगार आणि जादूसामानाचा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा विक्रेताही त्याला बनायचे आहे. त्याचे खेळ मी त्याआधी पाहिले होते. वडिलां बरोबर या लहान वयातही त्याने इंग्लंड अमेरिकेच्या दोन वाऱ्या आजवर केल्या आहेत. अण्णा योजनाबद्ध रीतीने त्याला जादूविद्येच्या क्षेत्रात उतरवीत आहेत. आनंद आल्यावर अण्णा त्याला म्हणाले,

'आनंद, प्रोफेसरसाहेबांना तुझी नजरेने वस्तू हलविण्याची ताकद पाहायची आहे. दाखवणार?' मुलगा लगेच म्हणाला,

'दाखवतो की.'

त्याने एक जाडशी किल्ली आणली. तिजोरीची किंवा एखाद्या खूप मोठ्या जुन्या कुलुपाची ती चावी असावी. आनंदने मला ती पाहायला दिली. मी उलटसुलट करून ती पाहिली. विचारले,

: या किल्लीचे काय?

तुम्ही ती माझ्या हातावर ठेवा. त्याने आपला उजवा हात माझ्यापुढे धरला. मी त्यावर किल्ली ठेवताच तो म्हणाला,

'काका, आता या किल्लीकडे तुम्ही पाहा. मी माझी नजर तिच्यावर रोखतो. हळूहळू ही किल्ली हलू लागेल. कुशीवर उभी राहील आणि मग पलटी खाईल. बघा हं.'

मी एकदा चावीकडे, एकदा त्याच्या डोळ्याकडे पाहू लागलो. अनिमिष नेत्रांनी तो त्या चावीकडे पाहात होता. तोंडाने काही पुटपुटत होता. आनंद म्हणाला,

'काका, पाहा. चावी हलू लागली.'

मी पाहिले तर खरेच अगदी सूक्ष्म वेगाने चावीने आपली जागा सोडली होती. बघता बघता ती कडेवर उभी राहिली आणि तिने पलटी खाल्ली. आनंदाचे डोळे, चेहरा लाल झाला होता. किल्लीने पलटी घेताच त्याच्या चेहऱ्यावरचा आक्रसलेपणा गेला. मोकळेपणाने तो हसला. मी म्हणालो,

: कमाल आहे. यालाही त्या मानसशास्त्रज्ञांपुढे उभा करायला हवा.

त्यांना काही सुद्धा समजणार नाही. प्रयोगाच्या वेळी रक्त चेहऱ्याकडे धावत होते. आनंदचा रक्तदाब वाढला होता. शरीराचे तपमान वाढले होते. नाडी जलद चालत होती. किर्लिअन प्रकाश वलयांनी घेतलेल्या चित्रात त्याचे डोळे, मस्तक, चेहरा याभोवती प्रकाशाचे आवरण दिसत होते, असले काही तरी ते नोंदवितील. किल्ली पलटविताना माझ्या मानेला व पाठीला रग लागली होती. जिभेची चव गेली होती. गरगरल्यासारखे वाटत होते. वांती येईल येईल की काय असे वाटत होते. असे काही त्याने सांगितले की, ते त्याचीही नोंद घेतील आणि तथाकथित वैज्ञानिक जर्नल्सचे संपादक हे वर्णन जसेच्या तसे छापतील.'

अण्णा खूप मोठ्याने हसले.

मला अण्णांच्या बोलण्यातला उपरोध जाणवला होता. किल्लीने पलटी खाल्ली हे मी प्रत्यक्ष पाहिले होते; पण कशी ते मला उमगले नव्हते. मी म्हणालो—

: मग या लेखात वर्णिलेल्या व्यक्तीत अशी शक्ती नाही असे म्हणायचे का?

खात्रीपूर्वक नाही. अगदी ९९.९९ टक्के फसवणूक.

: मग हे एवढे विद्वान वैज्ञानिक फसले म्हणायचे?

तुम्ही आनंदच्या हातावरची किल्ली पलटली एवढे सांगणार. प्रत्यक्ष पाहिल्याचा निर्वाळा देणार. मी पाहिले ते खरे, हा तुमचा अभिमान म्हणून तुम्ही आनंदाने सांगितलेली त्याच्या नजरेची ताकद ही गोष्टही खरी मानणार!

: मरणोत्तर अस्तित्व, मृतात्म्याशी संभाषण, त्यांचे संदेश, भूत-पिशाच्चविद्या यासंबंधी तुमचे काय मत आहे?

मरणोत्तर अस्तित्वाची शक्यता मला वाटत नाही. असलीच तरी माणसाला त्याची जाण असणे, येणे शक्य नाही. भूतपिशाच्च ही एक भ्रामक कल्पना आहे. जोपर्यंत भुते, खेते, गिऱ्हे, जखिणी त्यांनी 'झाड' धरणे, ती दिसणे, त्यांनी काही कृती करणे या गोष्टींना आव्हान मिळत नाही तोपर्यंत हे सगळे चालते. मांत्रिक, तांत्रिक, गुरव, देवऋषी यांची चलती होते. प्रा. अकोलकरांनी ३०० वर्षांपूर्वी सर फ्रान्सिस बेकन यांनी लिहिलेला एक उतारा उधृत केलाय. त्यावरून त्याचा या गोष्टीवर विश्वास होता असे म्हणता येणार नाही. माणसाच्या कल्पनेचा दुसऱ्यावर अगर वनस्पती अगर प्राण्यावर काही परिणाम होतो का हे शोधून काढायला हवे. जादूटोण्यात काही प्राकृतिक स्वरूपाचे असेल ते वेगळे करायला हवे एवढेच त्याने म्हटले आहे. जिथे जिथे मला असल्या बाधा आढळल्या तिथे तिथे मी आव्हानात्मक पवित्रा घेतला. सत्य शोधून काढले. त्यामागे दुसऱ्यांना घाबरवून स्वार्थ साधणारीच मंडळी आढळली.

: असे काही किस्से सांगा ना?

सांगायला हरकत नाही; पण किस्से प्रा. अकोलकरांच्या लेखाधारे जावेत असे मला वाटते. मृतात्म्यांचे संदेश आपल्याला कळतात. याची वारेमाप प्रसिद्धी करून दहा वर्षेपर्यंत साऱ्या अमेरिकेला धुवून काढणाऱ्या फॉक्स भगिनींची कथा तुम्हाला ठाऊक असेलच. आपल्या आईबापांची गंमत करावी म्हणून आईवडीलांच्या बेडरूमच्या लाकडी भिंतीवर रात्री बेरात्री एका सफरचंदाला दोरी बांधून ठोके द्यायच्या दोन छोट्या बहिणींच्या गंमतीतून सुरू झालेले हे नाटच. आईबाप घाबरले. गाववाले चकीत झाले. रात्रीबेरात्री भिंतीवर ठोके पडतात कसे? कुणालाच उमगेना. लोकांनी फॉक्स यांचे घर भुताटकीचे ठरविले. लग्न झालेली मोठी बहीण माहेरी आली. ती या दोघींच्याच खोलीत झोपल्याने त्या मुलींनी आपले गुपित ताईला सांगितले. तिने त्यांच्याशी संगनमत करून आपल्या धाकट्या दोघी बहिणीत मृतात्म्यांचे संदेश मिळविण्याची ताकद आहे असे प्रसिद्ध केले. बसल्या जागी पाय न हलवता उंच टाचांच्या बुटांचे ठोके लाकडी फ्लोअरवर द्यायची विद्या या दोन्ही मुलींनी आत्मसात केली. एक ठोका म्हणजे अमुक, दोन म्हणजे तमुक अशी सांकेतिक भाषा सुरू केली आणि अक्षरशः कोट्यवधी डॉलर्स कमावले. जगविख्यात जादूगार हॅरी हाऊदिनी याने या पोरींचे बिंग फोडले. माध्यम म्हणून काम करणाऱ्या या पोरीत मृतात्म्यांचे संदेश बिदेश मिळविण्याची काही ताकद नसून ही शुद्ध बनवाबनवी आहे हे सिद्ध केले. त्या दोघी पोरींपैकी एकीचे प्रेम इंग्लंडमधील एका लॉर्डच्या मुलावर बसल्याने व त्याच्याशी लग्न होण्यासाठी असे केले अशी तिने प्रेस कॉन्फरन्समध्ये कबुली दिल्याकारणाने फॉक्सभगिनींचा धंदा बुडाला.

: भानामतीच्या प्रयोगाबद्दल तुम्हाला काय वाटते? चेटूक, जारण, मारण हे प्रकार.

सगळी फसवणूक. भानामतीमध्ये शत्रूला त्रास देण्यासाठी त्याच्या घरातील सामानाची उलथापालथ, नासधूस, कपडे जळणे, वस्तू नाहीशा होणे, भलत्या ठिकाणी सापडणे, अन्नात विष्ठा पडणे, एकदम आग लागणे असले प्रकार होतात. लिंबू, सुया, हळदकुंकू, मंत्रतंत्र यांचा वापर होतो. हे प्रयोग करणारी जवळचीच मंडळी असतात. इस्टेटीवरचे वाद, घरादारातील भांडणे, त्यामुळे वाढणारा खुन्नस हा यातील मुख्य बिंदू. कपड्यावर वा तोंडावर बिब्ब्याच्या फुल्या उठणे या चिन्हांनी तर माणसे मुळातच घाबरतात. मग आणखी पुढचे प्रकार सुरू होतात. मागे इलस्ट्रेटेड वीकलीमध्ये अशी एक केस आली होती. आरोपीवर भानामती केल्याचा आरोप होता. माणसात अशी ताकद असणेच शक्य नाही असे वकिलांनी प्रतिपादन केले. आरोपीने त्याला कोर्टातच आव्हान दिले. दुसऱ्या दिवशी वकील कोर्टात येतात, तो लोक आणि कोर्टही भयभीत होऊन त्यांच्याकडे पाहू लागले. त्यांच्या कपड्यावर आणि तोंडावर बिब्ब्याच्या–तेलाच्या काळ्या फुल्या होत्या. कोर्टाने या प्रकरणाची चौकशी गोऱ्या पोलीसकमिशनराकडे सोपवली. आरोपी मांत्रिकाने मध्यरात्री स्मशानात जाऊन मेलेल्या ओल्या बाळंतिणीच्या हाडाने काढलेल्या फुल्याफुल्यांची आकृती वकिलाच्या अंगावर उमटली असा निष्कर्ष चौकशीत निघाला. मी केस वाचून तावडतोब या गोष्टीला आव्हान दिले; पण निजामाच्या हद्दीत, गोऱ्या माणसाने काढलेल्या निष्कर्षाला काळ्या माणसाला आव्हान द्यायची परवानगी नाकारली गेली ! हे प्रयोग धादांत खोटे ठरविण्यात गुंडांशी गाठ पडण्याची शक्यता असते. त्यामुळेही मला काही वेळा गप्प बसावे लागले.

: **पण अण्णा, सामान्य माणूस का, अगदी सुशिक्षित मंडळीही अशा गोष्टींना घाबरून शरण जातात.**

प्रोफेसरसाहेत, जादू हे एक शास्त्र आहे. त्याचे दोन प्रकार आहेत. एक 'धवलजादू' तिचा आत्मा 'गौप्य' आणि ध्येय लोकरंजन. त्यातून पोटापाण्यासाठी पैसे मिळवायचे. ज्याची कला श्रेष्ठ तो खरा जादूगार. यात अनेक विख्यात जादूगार येतात. हॅरी हाऊडिनीने एकदा एका प्रयोगात प्रेक्षकांसमोरून 'हत्ती' अदृश्य केला होता. अलीकडे डेव्हिड कॉपरफील्डने, कॅलिफोर्नियातील एका विमानतळावरून एक 'जेट'च नाहीसे केले. दूरदर्शनच्या कॅमेऱ्यांनाही जेट नाहीसे झाले हे टिपता आले नाही. त्याने न्यूयॉर्कमधील स्वातंत्र्यदेवीचा पुतळाच हजारो प्रेक्षकांदेखत अदृश्य करून दाखवला ! माझ्या परदेशदौऱ्यात हॉलीवुड येथील 'मॅजिककॅसल' ला मी तीन वेळा भेट दिली. लारसनबंधूंनी सुरू केलेल्या या अद्वितीय ठिकाणी, जगातल्या फक्त महान जादुगारांनाच आपले प्रयोग सादर करता येतात. मला इथे अनेकांचे प्रयोग पाहाण्याची, त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली. प्रो. डाय व्हर्नन, ज्ञॉन प्लॅट, जो कोसारी, माईक स्किनर, स्टॅन ॲलन, खुदाबक्ष, ब्रूस सेरव्हेंन, एडी जोसेफ, डेव लीडरमन, रुडरिक, बेंजामिन क्लेनमन, रोनाल्ड हेन्स किती नावे सांगू ? पण या मंडळींनी जनतेवर अमानवी शक्ती अगर दैवीशक्तीची दडपणे आणून कधी तिला लुबाडले नाही.

याउलट जादूचा दुसरा प्रकार 'काळी जादू' (Black–Magic) यात तुमचे अकोलकर म्हणतात ते मृतात्म्यांशी संभाषण, जारण, मारण, प्रश्न किंवा शकून सांगणे, भूतविद्या, भानामती, चेटूक, मन:प्रभाव, दूरस्थदर्शन, हिप्नॉटिझम् यांचा दबावार्थ वापर या गोष्टी येतात. ही जादू मानवी व्यवहारांशी अत्यंत संलग्न असल्याने या प्रकारात फसवणूक, लुबाडणूक, सूड हे ध्येय असते. पहिल्या जादूच्या प्रकारात स्वार्थ असतो; पण दुसऱ्याला चकित करून सात्त्विक मनोरंजन करून मिळणाऱ्या पैशाचा. इथे सूड आहे. मानवी जीवनाशी खेळ आहे. असल्या 'अमानवी' वा 'दैवी' शक्ती शोधून काढून त्यांना नेस्तनाबूत करण्याचा चंग बांधण्याऐवजी तथाकथित भारतीय आणि वैज्ञानिक त्यांना परामानसशास्त्रीय घटना आणि शक्ती असे ठरवून त्या इतरांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतात यात खरी समाजाची दिशाभूल आहे.

: **मग अशी अतींद्रिय ताकदीची मंडळी भेटतात तेव्हा त्यांचे कसे परीक्षण करावे ?**

वैज्ञानिकांनी प्रथम यात हातचलाखी किती ? मानसिक व शारीरिक फेरबदलांचा बनाव किती ? कुठली साधने वापरली असली पाहिजेत ? याचा विचार करायला हवा. त्यासाठी त्यांना जादूविद्येचे ज्ञान आवश्यक. दृष्टीच नसेल तर काय उपयोग ? विद्वान, जाणकार म्हणविणाऱ्या माणसाची जादूचे ज्ञान नसेल तर कशी दिशाभूल होते त्याबद्दल एक किस्सा सांगतो.

मध्यंतरी श्री. राव नावाचे एक योगी मुंबईत पाण्यावरून चालण्याचा प्रयोग करून दाखविणार होते. आठवतंय !

**अहो मोठी सनसनाटीच निर्माण केली होती त्या रावांनी. पाण्यावरून चालण्याच्या या प्रयोगाला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली होती. देशोदेशीचे पत्रकार आणि दूरदर्शनवाले त्यासाठी मुंबईत आले होते. मुंबईतल्या वृत्तपत्रांतून योगी रावांच्या विलक्षण शक्तीचे रकानेच्या रकाने भरून वर्णन येत होते.**

या रावांना मी आव्हान दिले.

**काय सांगता ? पण त्या वेळी ही गोष्ट कुठे प्रसिद्ध झालेली आठवत नाही.**

कशी होणार? मी रावांना पत्र लिहिले. पाण्यावरून चालणे अशक्य आहे असे सांगितले; पण वर्तमानपत्रावाले हे छापायला तयार हवेत ना ! तरी पण मला आचार्य अत्र्यांची आशा होती. त्यांचा 'मराठा' तेव्हा गरजत होता. अत्र्यांविषयी मला विलक्षण आदरही होता. म्हणून त्यांना हे सांगावे, छापा म्हणावे म्हणून मी 'मराठा' च्या कार्यालयात गेलो; पण पाय घसरून पडल्यामुळे अत्र्यांचे हाडबीड मोडले होते म्हणून ते माहीमच्या डॉ. बावडेकरांच्या रुग्णालयात दाखल झाले होते. मी तिथे गेलो. त्यांना सगळे समजावून सांगू लागलो. सारे ऐकून अत्रेसाहेब म्हणाले, 'अहो तायडे, मी गेल्या दोन तीन अंकात रकानेच्या रकाने भरून रावांची स्तुती केलीय. आता मला त्यांच्याविरुद्ध कसे लिहिता येईल ? अगदी तुम्ही म्हणता तशी त्या रावांना पाण्यावर चालण्याची 'दैवी' म्हणा 'योगीक' म्हणा

**'काळी जादू' (Black-Magic) म्हणजे मृतात्म्यांशी संभाषण, भानामती, चेटूक वगैरे..**

शक्ती नमली, ती सारी बनवाबनवी असली, तरी मला एकदम पलटी कशी खाता येईल ? त्यातून तुम्ही म्हणता हे मला पुरेसे पटले-लेही नाही. माणसात अशा शक्ती असतात असे अनेकांनी लिहून ठेव-लंय, मी सुद्धा पाहिलंय.

मी विचारले, काय पाहिले आपण ?

अत्रे म्हणाले,अगदी एका साध्या माणसांची ताकद.रस्त्यावर गारुड्या सारखे खेळ करणारा होता बिचारा. आम्ही बरीच मंडळी त्याचे खेळ पाहात होतो.त्याने एकदम मलाच पुढे बोलावले.म्हणाला, 'इथे खूप दगड पडलेत. त्यातला एक उचला आणि माझ्या हातावर द्या!' मी तसे केले. त्याने मी दिलेला दगड साऱ्यांना दाखवला. सर्वांसमक्ष मुठीत घट्ट धरला. दुसऱ्या हाताने त्या भोवती जादूची कांडी फिरवित तो काही मंत्र पुटपुटत होता. मधूनमधून साऱ्या जनतेशी बोलत होता. त्याला ती जादूची कांडी कुणा अवलियाने दिली होती. काही मंत्र शिकवले होते. त्यांच्या मदतीने तो हाताच्या मुठीत घट्ट मिटून घेत-लेल्या दगडाचा चक्क चांदीचा रुपया करून दाखविणार होता. त्याची हालचाल आम्ही सर्व डोळ्यांत तेल घालून पाहात होतो. दगडाचा रुपया होणे शक्य नाही हे आम्हाला ठाऊक होते; पण मुठीभोवती बऱ्याच वेळा ती कांडी फिरवित तो मंत्र म्हणत राहिला. त्याचा चेहरा लाल झाला. अंगाला घाम फुटला. सर्वांग थरथरू लागले. आणि त्याने मूठ उघडली. आम्ही साऱ्यांनी तिकडे आधाशासारखे पाहिले. खरेच दगडाचा रुपया झाला होता. सारे आश्चर्याचे पुतळे बनले. या फाटक्या माणसातील ती 'दैवी' शक्ती पाहून थक्क झाले. अजूनही तो प्रसंग जसाच्या तसा माझ्या डोळ्यासमोर उभा आहे. माणसात अशा शक्ती असतात याची खात्री मला पटली आहे. मी म्हणालो, 'अत्रेसाहेब, तुम्ही सिद्धहस्त लेखक आहात. नाटककार आहात, चित्रपटकथालेखक आणि निर्माते आहात, उत्तम नट आहात. दुर्दम्य पत्रकार आहात, एक घणघणाती वक्ते आहात याबद्दल माझ्या मनात तुमच्याबद्दल नितांत आदर आहे. तुम्ही उत्तम साहित्यिक आहात, असा तुमचा लौकिकही आहे; पण आजवर जादूचे वर्णन यथार्थपणे करील असा साहित्यिक मला भेटलेला नाही. तुम्ही पाहि-लेल्या जादूचे आता वर्णन करीत होतात. तुमचा लेखक ते लिहून घेत होता. तेव्हा माझ्या मनात जादूचे यथार्थ वर्णन करणारा साहित्यिक आज मला भेटणार अशी आशा उत्पन्न झाली होती; पण तुम्ही माझी निराशा केलीत.

'तायडे, दुसरा कोणी असे माझ्यासमोर बोलता तर मी त्याला पातळात गाडून टाकला असता. सांगा मी पाहिलेल्या प्रसंगाचे केलेले वर्णन तुम्हाला यथायोग्य वाटले नाही ?'

'आपण रागावू नका. आपण भाषाप्रभू आहात. आपण त्या माण साने 'दगडाचा रुपया' केला असे म्हणालात.'

'होय म्हणालो ना.'

''चा' या षष्ठीच्या प्रत्ययाचा अर्थ तुम्हाला समजतो; मग सांगा दगडाचा रुपया होण्याची क्रिया तुम्ही पाहिली होती ?'

'ना...नाही पण–' अत्रे अडखळले.

'मग, त्याच्या मुठीत दगड होता. त्याने मूठ उघडली तेव्हा तिथे दगडाऐवजी रुपया दिसला असे वर्णन आपण करायला हवे होते. दगडाचे रुपयात झालेले परिवर्तन आपण पाहिले नसताना आपल्या वर्णनामुळे वाचणाऱ्याची दिशाभूल होणारच.'

'तायडे, मानले आपण तुम्हाला. माझी, माझ्या तोंडावर अशी 'षष्ठी' करणारा माणूस मला आजवर भेटला नव्हता. तू मोठा विद्वान जादूगार होशील. जादूविद्येचा भाष्यकार म्हणून तुझा गौरव होईल. त्या योगी रावांची प्रशस्ती मी 'मराठा' मधून केलीय; पण तो उद्या पाण्यावरून चालणार नाही. पाण्यात पडेल, याबद्दल माझी तुम्ही खात्री पटवली आहे.' प्रोफेसरसाहेब, अत्रेसाहेबांनी माझी केलेली प्रशस्ती विसरा. जादूविद्येचे ज्ञान नसेल तर विद्वान् जाणकार मंडळींचीही कशी दिशाभूल होत असते याचे उदाहरण दिले मी.

**: श्रीसत्यसाईबाबा डोक्यावरील जटांतून घड्याळ, हवेतून उदी आणि वेगवेगळ्या वस्तू काढून दाखवतात. तीही चलाखीच ?**

आपले महत्त्व वाढविण्याकरता 'चमत्कार' करून दाखवावेच लागतात ! पण ते चमत्कार नसतात, 'जादू' असते हे मी यापूर्वीच सांगितले आहे. श्रीसत्यसाईबाबांमध्ये खरेच अशी अतींद्रिय शक्ती असती तर डॉ. कोवूर यांचे आव्हान त्यांनी स्वीकारले असते. कै. पी. सी. सरकारांचे चिरंजीव श्रीसत्यसाईंना 'मीही तुमच्याप्रमाणे जटेतून नाही तर हवेतून घड्याळ काढून दाखवतो' म्हणाले. त्यांना श्रीसत्य-साईंनी आपली भेट दिली नाही असे ऐकतो. अलिकडे अनेक भोंदू-बाबांची लक्तरे वृत्तपत्रांनी वेशीवर टांगली आहेत.

**: विज्ञानाने आता इतकी प्रगती केली आहे. तंत्रज्ञान घोडदौडीने धावते आहे, आता या चलाख भोंदूबाबांची प्रगती का रोखली जाऊ नये ?**

कोण रोखणार ? वैज्ञानिकांना, त्यांच्या पद्धतींना, त्यांच्या प्रयो-गांना त्यांच्या दृष्टिकोनाला व जवळच्या यंत्रसाधनांना मर्यादा आहेत. निसर्ग हे एक विलक्षण गूढ आहे. त्यातल्या काही गोष्टींचा उलगडा विज्ञानाने झाला तरी अनेक गूढे विज्ञानालाही अज्ञातच आहेत. त्यामुळे जादूटोण्याचे क्षेत्र सतत वाढत असते. एकापेक्षा एक सरस चमत्कार अभ्यासाने साध्य करता येतात. त्यामुळे जादूचा उपयोग करून जनतेला लुबाडणाऱ्यांचे फावते. मला सांगा प्रोफेसरसाहेब, साधे शालेय शिक्षण घेणे ज्यांना जमत नाही. साधी गणिते सुटत नाहीत, काही धंदा उद्योग करणे जमत नाही, मंत्रही व्यवस्थित उच्चारता येत नाहीत अशा बुद्दु लोकांना मंत्रसिद्धी म्हणून काही असली तर ती होणार कशी ? त्यांच्या अंगात 'दैवी' वा 'पैशाची' शक्ती प्रगट होते हे कसे शक्य आहे ? दुनिया झुकती है हेच खरे. माणसाला जगाचे गूढ उकलणे कठीण आहे. त्यामुळे हे प्रकार चालत राहाणारच. जनसामान्यांची अशा शक्तींच्या अस्तित्वावरची अंध-श्रद्धा दूर करणे कठीणच आहे.

इंग्रजीत जादूगाराला 'मॅजिशियन' म्हणतात. 'मॅगी' म्हणजे 'शहाणा माणूस.' इतरांपेक्षा तो जास्त हुशार, चलाख व ज्ञानी असतो. त्याने या ज्ञानाचा उपयोग जनतेच्या अंधश्रद्धा दूर करण्या-करता करावा; पण आपल्याला इतरांपेक्षा जास्त कळते हे समज-ल्यावर 'मॅगी' मॅजिशियन होतो. तरीही बिघडले नाही. त्यांनी आपल्या चलाखीचा उपयोग जनतेची करमणूक करण्याकरता केला, धन जोडले तर ते अयोग्य नाही; पण या ट्रिक्सचा उपयोग करून आपल्यात काही अतींद्रियशक्ती आहे असे भासवून आपल्यात काही 'दैवी' शक्तीचा संचार होतो असे नाटक करून, जनतेला भीतीच्या दडपणाखाली आणून तिला लुबाडण्याचा धंदा तो करू लागला तर जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीनेही ते विघातक आणि शास्त्रीय संशो-

धनालाही ते घातक. कारण या बतावण्यांनी भारतीय मंडळी तर सोडाच, पाश्चात्य विद्वान वैज्ञानिकही कसे भोवंडून गेले आहेत याचा पुरावाच प्रा. अकोलकरांनी आपल्या लेखात दिला आहे. बडोद्याला असताना काळूपुऱ्यात एका फकिराची मी अशी भंबेरी उडविली होती. एक पैसा लूंगा और सौ गाली दूंगा ' असे म्हणत तो फिरत असे. लोक त्याला एकेक पैसा देऊन शंभर शिव्या खातही. तो अवलिया आहे असा लोकांचा समज. काळूपुऱ्यातल्या एका गरीब स्त्रीला लग्नाला १०/१२ वर्षे होऊनही मूल होत नव्हते. तिला मूल होईल की नाही हे सांगण्यासाठी काळूपुऱ्यातील आम जनतेला जमवून हातावर खडे घेऊन त्याने जो सीन उभा केला तो विलक्षण! जमलेल्या लोकांकडून प्रत्येक हातावर पाच पाच खडे त्याने ठेऊन घेतले. मंत्राने मी फुंकर मारली की, हातातला एक खडा जळत उडेल. तो उजव्या बाजूला उडाला तर बाईला मुलगा होईल. डाव्या बाजूला उडाला तर मुलगी. खडा उडाला नाही तर तिच्या नशिबी या जन्मी मूल नाही. फकिराची सर्व बाजूंनी सोडवणूक ! मी पाहात होतो. त्याने थयथय नाचण्याची दंगल उडवून दिली होती. आणि खरंच त्याच्या हातातला खडा जळत उजवीकडे उडाला. साऱ्यांनी जल्लोष केला. फकिरापुढे फळाफुलांचा ढीग जमला. पै-पैशाची रास जमली. जिच्यासाठी हा सारा मांड घातला तिच्याकडून त्याला अकरा रुपये हवे होते. तिच्याजवळ रुपयाही नव्हता. फकीर तिला शिव्याघालू लागला. काही उत्साही मंडळींनी फकिराला देण्यासाठी अकरा रुपये जमविण्यासाठी वर्गणी काढायला सुरुवात केली. हे सारे पाहून तो सुखावत होता. मी काही मित्रांसह त्याच्याजवळ गेलो.त्याला छेडला. तो शिव्या द्यायला लागला. त्याच्याजवळ फॉस्फरसचे तुकडे असावेत व त्यातला एक त्याने इतर दगडांबरोबर दूर फेकला असावा याबद्दल माझी खात्री होती. आम्ही त्याच्याजवळ भांडण काढून त्याच्या सामानातून फॉस्फरसचे खडे असलेली डबी काढून सर्वांना दाखविली. खडा कसा पेटला हे सांगितले तेव्हा काळूपुऱ्याचे लोक जे त्याच्यामागे लागले—मारपीट झाली. बिचाऱ्याला पळता भुई थोडी झाली.

**: अण्णा, नाही नाही म्हणता म्हणता तुम्ही बरेच किस्से सांगितलेत. जस्टिस राजाध्यक्षांच्या घरी प्रश्न जाणून उत्तरे देणाऱ्या, बसल्या बैठकीला हजार रुपये फी घेणाऱ्या आणि मोठमोठ्या हुद्देदार मंडळींना बनविणाऱ्या मंगळवेढ्याच्या त्या कुणा जोशी नावाच्या मांत्रिकाला तुम्ही कसा पळवून लावलात आणि त्याला ' मुंबई बंद ' केलीत तोही किस्सा पुन्हा एकदा तुमच्या तोंडून सविस्तर ऐकायची इच्छा होती. ' माणूस 'च्या वाचकांनाही, मुंबईतील किती बडी बडी या जोशाच्या भजनी लागली होती याची माहिती देता आली असती पण तुम्ही म्हणालात ते शब्दसंख्येचे आणि प्रस्तुत मुलाखतीच्या विषयाचे बंधन आपण पाळले पाहिजे, म्हणून तो आग्रह मी तुम्हाला करीत नाही. प्रा. अकोलकरांच्या लेखात रशियन अधिकाऱ्यांनी पुढे कुलजिनाबाईंना प्रात्यक्षिके देण्यास मना केले ! डॉ. रेक्स स्टॅन्फोर्ड हे कुलजिनाबाईंनी दिलेली प्रात्यक्षिके पाहूनही तिच्या परामानसशास्त्रीय ताकदीविषयी साशंक आहेत. श्रीमती कुलजिना व विनोग्रादोवा या दोघींच्या बाबतीतही, त्यांचे प्रयोग यशस्वी होण्यास उपस्थितांच्या सौहार्दपूर्ण मनःस्थितीची आवश्यकता होती, असे उल्लेख आहेत तुम्ही म्हणालात त्या गोष्टींना पुष्टिदायी असेच ते आहेत. पण प्रा. अकोलकरांनी प्रामाणिकपणे ते आपल्या लेखात दिले आहेत. परामानसशास्त्रीय ऊर्जा बिर्जा यावर विश्वास असलेला हा गृहस्थ हे उल्लेख टाळीत नाही यावरून त्यांचीही याबाबतीतली साशंकता जाणवते. हे महत्वाचे आहे. संबंध पाश्चत्य वैज्ञानिक जगाला हलविणाऱ्या ' यूरी गेलर ' या इस्राइली तरुणासंबंधी प्रा. टेलर यांनी १९८० साली व्यक्त केलेले मतही अकोलकरांनी दिले आहे. आता ते उधृत करताना हा परामानसशास्त्रज्ञही भावनेच्या आहारी गेल्यासारखे वाटते.** प्रो. जेम्स रॅण्डी या जादूगाराने सुचविलेल्या प्रयोगपरिस्थितीत यूरी गेलर आपले प्रयोग करू शकला नाही हे पाहिल्यावर डॉ. टेलर ' या प्रकारांच्या मुळाशी फसवणूक असली पाहिजे असे म्हणाले तर त्यात काय गैर आहे ? म्हैसूरपासून ' १० मैलांवर कावेरी किनारीच्या एका कुटीरात ठेवलेल्या श्रीसत्यसाईंच्या तस्बिरी समोर विभूतीचे थर जमतात व ज्या पात्रात सत्यसाईंचे छोटे चित्र असते त्यातील पाणी गोड ' अमृत ' असते हे भावुक उदाहरण देऊन ' यूरी गेलर 'च्या टेप्समध्येही चमत्काराची ताकद असू शकेल असे सांगणाऱ्या प्रा. अकोलकरांची ' शास्त्रज्ञ ' म्हणून मला गंमत वाटली. जादूगार इतकी विभूती निर्माण करू शकणार नाहीत. श्रीसत्यसाईबाबा करू शकतात असे अकोलकरांना म्हणायचे असले तर त्यांना चमत्कार वाटलेल्या कावेरीकाठच्या अद्भुताचे मी आव्हान देऊन निराकरण करून द्यायला तयार आहे. मीच का माझा मुलगा आनंद आणि त्याचे गुरु माझे मित्र श्री. निरंजन माथूर ही मंडळीही ते करू शकतील. वैज्ञानिक म्हणविणाऱ्याने असे भावुक बनू नये असे मला वाटते. यूरी गेलर ज्या परिस्थितीत प्रयोग करतो त्या परिस्थितीत तसे प्रयोग करण्याचे जादूगार जेम्स रॅण्डी, रोमॅक वा बर्गलास यांनी मान्य केले नाही; पण रॅण्डीने सुचविलेल्या प्रयोग परिस्थितीतही गेलर ते प्रयोग करू शकला नाही ही गोष्ट प्रा. अकोलकर का विसरतात ?

**: अण्णा, मुलाखत संपविताना एक विचारू ?**

विचारा ना—

**: प्रा. अकोलकरांनी एखादे आव्हान दिले तर तुम्ही ते स्वीकाराल ?**

प्रा. अकोलकरांची धारणा समजली, मोकळेपणाने, पूर्वग्रहविरहित ते चर्चा करू शकत असतील तर आपण जरूर ते स्वीकारू.

अण्णा मोठ्याने हसले आणि मला म्हणाले, ' प्रोफेसरसाहेब, तुमच्याशी गप्पा मारताना जीवनातील खूप गोष्टी मी पुन्हा अनुभवल्या; पण मी तुमचे आभार मानणार नाही. कारण तुमचे अन् माझे नाते आता त्या उपचारापलीकडे गेले आहे.

**: पण अण्णा ' माणूस 'तर्फे मात्र मुलाखत दिल्याबद्दल तुमचे मनःपूर्वक आभार हं !**

# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

आपल्याकडे रेडियोवर, टी. व्ही. वर किंवा मासिकांमध्ये, साप्ताहिकांमध्ये जितक्या म्हणून स्त्रियांच्या मुलाखती प्रसिद्ध होतात त्यात एक वाक्य हमखास असतंच. 'विशेष म्हणजे संसार सांभाळून हे सगळं बाईंनी केलं.' अशा अर्थाचं. यात कधी कौतुक असतं कधी आश्चर्य असतं तर कधी कर्तबगारीची चढती कमानच जणू काही सुचवली जाते. पंचावन्न, साठ सालापर्यंत 'संसार सांभाळून' इंटर किंवा बी. ए. झालेल्या बायकांचे फोटो वगैरेही येत असत. अलीकडे तसे येत नाहीत इतकंच; पण अजूनही तो उल्लेख करण्याचा मोह सुटत नाही. खरोखर, संसार ही स्त्रीच्या कर्तबगारीतली इतकी धोंड असते का? तसं असतं तर स्वेच्छेनं किंवा नाइलाजानं अविवाहित राहिलेल्या स्त्रियांनी जगामध्ये अनमोल कार्याचे डोंगर उभारले असते. तसं तर कुठे दिसत नाही. या उलट कर्तबगार संसारी स्त्रियांचे नमुनेही काही थोडे नाहीत. म्हणजेच संसार या कल्पनेचा गरजेपेक्षा जास्त बागुलबोवा आपण करत राहिलो आहोत. कशामुळे?

माझ्या कल्पनेप्रमाणे, याला जबाबदार असणाऱ्या काही गोष्टी दाखवता येतील. एक तर आपल्याकडे त्याग, बलिदान, सर्वस्वाची होळी वगैरे कल्पनांचं ग्लॅमर फार आहे. एखाद्या जीवनध्येयासाठी हे सगळं केलंच पाहिजे. म्हणजेच स्त्रीनं संसारसुख विसरलं पाहिजे तरच तिला तिचं जीवनध्येय गाठता येईल. स्वातंत्र्याच्या चळवळीत देशाच्या हाकेला 'ओ' देण्यासाठी संसाराकडे पाठ फिरवलेल्या स्त्रियांचे आपल्या देशानं देव्हारे माजवले (तसे तर पुरुष कार्यकर्त्यांच्या 'नैष्ठिक ब्रह्मचर्याचे'ही माजवले; पण तो एक स्वतंत्रच विषय होईल) याच सुरुवातीच्या काळात शिक्षणाची किंवा जीवन ध्येयाची काही स्वप्नं बघणाऱ्या स्त्रियांची लग्नाची वयंही वाढली. त्या सर्वांना लग्न कधीच करावंसं वाटलं नसेल याची खात्री नाही. शक्यता मात्र ही दिसते की, त्या काळात वाढत्या वयामुळे लग्नाची संधी किंवा शक्यता त्यांच्यापुरती नाकारली गेली असेल. एकूणच माणूस आणि समाज हा साधारणपणे स्थितीवादी असतो. त्यामुळे नव्याने येऊ पाहणाऱ्या गोष्टींची डावी बाजू भडकपणे रंगवण्याकडे सगळ्यांचाच कल असतो. तसेच स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळातही झाले असेल. शिकलेली स्त्री म्हणजे अतिरेकी व्यक्तिवाद, पाश्चात्य कल्पनांचे अवडंबर, कुटुंबात सामावण्यास असमर्थ असा भडक प्रचार या काळातही झाला आणि शिक्षण किंवा संसार, करियर किंवा संसार असा उघडउघड पर्यायच जणू बायकांसमोर ठेवण्यात आला. (कुठल्याही काळात, कुठल्याही पुरुषांसमोर, कोणीही असा पर्याय ठेवल्याचे दिसत नाही. एका अर्थानं हेही ठीकच आहे. पुरुष घराबाहेर अनेक गोष्टी 'करत असतो' त्याचा संसार मात्र आपोआप 'होत असतो' त्याला तो तरी काय करणार?) विसाव्या शतकाच्या तिसऱ्या–चौथ्या दशकापासून स्त्रीशिक्षणाची अपूर्वाई कमी झाली, पाचव्या सहाव्या दशकापासून स्त्रियांच्या अर्थार्जनाने भुवया उंचावेनाशा झाल्या. एका अर्थानं पारंपरिक पुरुषी जीवनक्रमावर, राहणीवर विचारसरणीवर हे स्त्रियांचं अतिक्रमण म्हणता आलं असतं. त्याला उघड विरोध करणं तर समाजाला परवडणारं नव्हतं. म्हणून छुपेपणाने नकळत यातली अशक्यता, आव्हान कसरत यावर भर देऊन पुरुषवर्गानं सतत स्त्रियांचा स्वतःच्या कुवतीबद्दल बुद्धिभ्रम केला, मानसिक ओढाताण केली आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की संसार ही आपल्या नाकर्तेपणाची कायमची सबब ज्या गृहिणींना करायची होती त्यांनीही याच बहुसंख्यांच्या सुरात सूर मिसळला. परिणाम इतकाच झाला की आता विसाव्या शतकाच्या अखेरीससुद्धा स्त्रीच्या जीवनाच्या एका ताजव्यात संसार आहे आणि दुसऱ्यात बुद्धिमत्ता, व्यासंग, कला, व्युत्पन्नता, व्यवसाय अशी अनेक अंगं आहेत असा काही तरी लोकभ्रम आपल्या समाजात दिसतो आहे. एक पारडं जड झालं की दुसरं हलकं राहायचंच हे आपण गृहीत धरलेलं आहे. या गृहीतामध्ये समाजातल्या काही घटकांचा स्वार्थ आहे, काहींची सोय आहे, काहींचा मानसिक गोंधळ आहे तर काहींचा सरळ पलायनवाद आहे.

## रसरशीत समृद्ध जीवन?

आपल्याकडला पारंपरिक संसार आकाराने मोठा होता, वेगवेगळ्या घटकांच्या मागण्या पुरवणारा होता, स्त्रीवर नुसती मानसिकच नव्हे तर शारीरिकही बंधने लादणारा होता, तिला गृहकर्मांमध्ये गाडणारा होता. आणि फार लहान वयात त्यात पडल्यापासून अखेरच्या श्वासापर्यंत स्त्रीला त्यातून सुटण्याला वाव नव्हता. काळाच्या ओघात बाह्य परिस्थिती अशी राहिलेली नाही. निदान शहरांमध्ये तरी संसाराचा आकार, लोकसंख्या कालमर्यादा, गृहकर्माचा रेटा हे निश्चितच लहान होत चाललं आहे. कित्येक तरुण गृहिणींना हे विधान आवडत नाही, असा माझा अनुभव आहे. कारण त्यामुळे आपल्या संसारकौशल्याचं अवमूल्यन होण्याचा त्यांना धोका वाटतो. माझा तसा अर्थातच हेतू नाही. रात्रंदिवस नवरा, मुलं, शाळा, अभ्यास, पाकसिद्धी यात गढलेल्या स्त्रिया मीही बघते; पण ही सर्व कामं परिस्थितीच्या अपरिहार्यतेपेक्षा मानसिक गुलामीतून निपजताहेत की काय असा विचार पडल्याशिवाय राहात नाही. संसाराचं बाह्य स्वरूप निश्चित सोपं, सुटसुटीत झालेलं आहे. बदल व्हायला हवा तो त्याकडे बघण्याच्या भूमिकेत, असाच निर्वाळा मला तरी या परिस्थितीने दिलेला आहे.

अशा प्रकारे संसाराचं स्तोम माजवून त्यात अति रममाण होणं हा एक प्रवाह दिसतो. तर दुसऱ्या प्रवाहात संसार म्हणजे वेळेचा अपव्यय, शारीरिक शक्तींचा ऱ्हास, मानसिक परावलंबित्व, थोडक्यात संसार हे सर्व दुःखांचं मूळ अशा टोकाला विचारांचा लंबक जातो. संसार हा खरोखरच इतका

असार असता तर शतकानुशतकं, पिढ्या न पिढ्या स्त्रिया त्यात स्वेच्छेने पडल्याच नसत्या. 'संसार हे बहुसंख्य स्त्रियांचं उपजीविकेचं साधन आहे.' असं जेव्हा समाजस्वास्थ्यकार र. धों. कर्वे म्हणून गेले तेव्हा घटकाभर आपल्या समाजाचं स्वास्थ्य बिघडलं होतं. त्यातला कडवटपणा सोडून देऊ या; पण संसार हा स्त्रीला सुरक्षितता देतो, अन्न वस्त्र निवारा देतो, भविष्याची हमी देतो या उघड बाबी जशा लक्षात घ्यायला हव्यात तशीच संसाराची स्त्रीची भावनिक गरजही लक्षात घ्यायला हवी. त्या त्या वयातल्या भावनेच्या, वासनेच्या, विकाराच्या, विचाराच्या अनेक गरजा संसार पुरा करत असतो. संसारासंबंधी रोगट, गाबडी उदात्तता उरी घट्ट बाळगायचं जसं कारण नाही तसंच त्याला कायमचं मोडीत टाकण्याचीही घाई आपल्या हातून होऊ नये. पत्नीत्व, गृहिणीपद, मातृत्व याने बहुसंख्य स्त्रियांना कमी अधिक दर्जाचा आनंद मिळत असतो. (ज्यांना मिळत नाही त्यांच्यावर संसाराची सक्ती नको हे ओघाने आलंच) आयुष्यात काहीच फुकट, सहज मिळत नाही तसा हा आनंदही फुकट मिळणार नाही हे उघड आहे. त्याची वाजवी किंमत द्यायची स्त्रियांची मानसिक तयारी असतेही; पण आजवर पुष्कळ ठिकाणी या आनंदाची फार अवास्तव किंमत पुष्कळ संसारांनी घेतली आहे म्हणून ते संबंधित स्त्रियांना जाचक झाले. तसे ते आजच्या काळात व्हायला नको असतील तर आपण काय देऊन काय मिळवतो याचा विचार स्त्रियांनाच करावा लागेल. संसार हा स्वर्गही नाही आणि नर्कही नाही. ते एक साधं वास्तव आहे. त्यातल्या काही समस्या प्रौढपणाच्या आहेत, काही समूहजीवनाच्या आहेत, काही व्यक्तिसापेक्ष आहेत.

भयंकर संकटं, आपत्ती आल्या नाहीत तर साधारणपणे सर्व प्रौढ माणसं त्यातून सहीसलामत सुटू शकतात. तसंच स्त्रियांनाही सुटता यायला हवं. त्यासाठी संसार सोडण्याची गरज नाही. त्याचं रूप मात्र बदलायला हवं आणि त्यासाठी स्त्रियांनाच काही प्रयत्न करावा लागेल. म्हणजे इतरांनी करू नये असं मला म्हणायचं नाही; पण संसाराचं पारंपारिक रूप इतरांना पुरुषांना, मुलांना फारसं जाचतच नाही. त्यामुळे ते रूप बदलून आपल्यासाठी नव्या अडचणी निर्माण करण्याचा आत्मघात ते करणार नाहीत. उलट संसाराचं नवं रूप त्यांच्या गळी उतरवण्यात स्त्रीचं हित आहे म्हणून तिलाच पहिला काही काळ खूप धडपडावं लागेल. आज नावारूपाला आलेल्या पुष्कळशा कर्तबगार, संसारी स्त्रियांनी सुरुवातीला ही धडपड केलेली आहे असं आपल्याला दिसेल त्या धडपडीची 'फळे रसाळ गोमटी' त्या आज चाखत आहेत. संसार की करियर असली प्रश्नचिन्हं त्यांच्यापुढे नाहीत. त्यांच्यापुढे रसरशीत समृद्ध जीवन आहे.

कोणतीही सामाजिक संस्था त्रिकालाबाधित नसते, तशीच कुटुंबसंस्थाही नाही. आज व्यक्तिगत पातळीवर, तुरळकपणे होणाऱ्या या परिवर्तनाला जितक्या मोठ्या संख्येचं पाठबळ मिळेल तितके संसार लवचिक होतील, कुटुंबं चांगल्या अर्थाने लोकशाहीवादी होतील, घरातली कामं व जबाबदाऱ्या समतेच्या तत्त्वावर वाटल्या जातील, रूढ श्रेणी संपुष्टात येतील. गृहिणीला सदासर्वकाळ गृहीत धरणं संपेल, किरकिऱ्या, रडक्या मुलासारखा संसार कायमचा गृहिणीच्या बोकांडी बसणार नाही.

कधी उगवेल तो रम्य दिवस ? हा एक प्रश्न झाला; पण त्याहून महत्त्वाचा प्रश्न आहे तो हा की, त्या रम्य दिवसासाठी करावी लागणारी धडपड, प्रयत्न आम्ही करणार आहोत का ? का नुसतीच कुरकुर, सबबी, तक्रारी, वैफल्य यावर आला दिवस साजरा करणार आहोत ? □

पुस्तके

# मनपंछी बावरा

रंगा मराठे

रंगा मराठे यांचा नवा कथासंग्रह नुकताच हाती आला. त्यात एकंदर आठ कथांचा समावेश आहे. त्यामधील पहिली कथा 'मनपंछी बावरा' ही दीर्घकथा आहे आणि उरलेल्या सात कथा खऱ्याखुऱ्या अर्थाने लघुकथाच आहेत.

आपल्याकडे मराठी साहित्यसमीक्षेत दीर्घकथा या ललितसाहित्याच्या प्रकारावर फार समीक्षात्मक लेखन झालेले नाही. तसे पाहिले तर मराठीमध्ये दीर्घकथा बऱ्याच लिहिल्या गेलेल्या आहेत. गंगाधर गाडगीळ आणि व्यंकटेश माडगूळकर सोडले तर अरविंद गोखले आणि पु. भा. भावे यांनी दीर्घकथा लिहिलेल्या आहेत. अरविंद गोखले यांची 'मिथिला' आणि पु. भा. भावे यांची 'वैरी' या दीर्घकथाच आहेत. अगदी व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' आणि त्यांची अलिकडची साहित्यअकादमीचे पारितोषिक मिळालेली 'सत्तांतर' ही कादंबरी देखील मी दीर्घकथाच समजतो. तसेच दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरी देखील एक दीर्घकथाच आहे. जी. ए. कुलकर्णी आणि विद्याधर पुंडलीक यांच्या देखील किती तरी कथा दीर्घकथाच आहेत. जी. ए. कुलकर्णी यांच्या दोन कथांचा एक संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. परंतु त्या संग्रहवर कोणी दीर्घकथा हे मूल्य लक्षात घेऊन समीक्षण केल्याचे वाचण्यात नाही.

तसेच विद्याधर पुंडलिक यांचा एक दीर्घकथांचा संग्रह मौज प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला आहे. त्या संग्रहावरील जी काही परीक्षणे माझ्या वाचण्यात आली त्यामधून देखील दीर्घकथा या साहित्यप्रकाराविषयी काही लिहिले गेलेले दिसत नाही. तेव्हा लघुकथा, दीर्घकथा आणि कादंबरी या साहित्यप्रकाराच्या वैशिष्ट्यांवर आणि गुणधर्मावर समीक्षात्मक लेखन व्हायला हवे; पण येथे माझा तो उद्देश नाही.

रंगा मराठे यांच्या कथेविषयी काही आस्वादात्मक लिहिता आले तर पाहावे एवढाच येथे मर्यादित उद्देश आहे. केवळ या संग्रहातील त्यांची पहिलीच कथा दीर्घकथा आहे आणि तिचा तसा उल्लेखही पुस्तकाच्या सुरुवातीलाच झाला आहे म्हणून त्या निमित्ताने केवळ वरील विचार व्यक्त केले. पुढे मागे दीर्घकथा, लघुकादंबरी आणि कादंबरी यांच्या वाङ्मयीन रूपावर लिहिण्याचा विचार आहे.

'मनपंछी बावरा' या कथेची कथावस्तु तशी नवीन नाही. रंगा मराठे हे कथालेखक

म्हणून आजवर सातत्याने वाचकांसमोर आलेले नाहीत. ते लेखन करतात तेव्हा मुक्तपणे लेखन करतात असे त्यांच्या एकंदर लेखनप्रकारावरून दिसते. लेखनात सातत्य नसणे आणि मुक्तपणा असणे हे काही वाङ्मयीन दोष नाहीत; परंतु त्यामुळे लेखकाच्या लेखनप्रवृत्तीची दिशा कळण्यास मदत होते. त्याच्या लेखनविषयक प्रेरणा समजावून घेता येतात. तसेच कोणत्या प्रकारच्या जीवनमूल्यांकडे लेखकाची कलात्मक ओढ आहे हे समजावून घेण्यासही त्याची मदत होते.

आज मराठी साहित्यात काही नव्या परंपरा निर्माण झालेल्या दिसतात. अशा परंपरा नेहमीच निर्माण होत असतात. कालांतराने पहिल्या मागे पडतात आणि त्यांची जागा नव्या परंपरा घेतात. असा ललितसाहित्याचा इतिहास सतत घडत असतो आणि त्या दृष्टीने पाहता रंगा मराठे यांचे लेखन कोणत्याच परंपरेत बसत नाही. ते बसलेच पाहिजे असा माझा आग्रहही नाही, कोणाचाही असू नये; परंतु एखाद्या लेखनाला जेव्हा मूल्य निर्माण व्हावयाचे असते तेव्हा त्या मूल्याचा शोध घेण्यासाठी अशा परंपरांचा उपयोग होत असतो असे मला वाटते.

'पंचतंत्रातील' कथांना एक मूल्य आहे. तसेच 'इसापनीती'तील कथांनाही आहे आधुनिक कथालेखकांचा आणि त्यांच्या कथालेखनाचा विचार केला तर त्यामधूनही काही एका मूल्याचा अथवा मूल्यांचा साक्षात्कार होतो. ही मूल्ये कोणत्याही प्रकारची असू शकतील. जीवनविषयक सर्व घटकांची मूल्ये ती जशी असू शकतील, तशी ती शुद्ध कलामूल्येही असू शकतील.

जीवनामध्ये निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने ज्या भावनांची निर्मिती होते आणि ज्या भावनांना एक आशय प्राप्त होतो, त्या भावनांचे संगठन करीत करीत त्यांच्या मुळाशी असलेल्या आशयाचा धागा पक्का करीत जाणे, हे काम आपल्या कलेच्या द्वारे लेखक करीत असतो.

भावनांच्या उद्रेकाने जेव्हा आशयाची निर्मिती होते तेव्हा तो आशय पारंपारिक आहे का त्यामध्ये जीवनाची काही नवीन प्रतिबिंबे उमटलेली आहेत याचा शोध घेण्याचे काम कोणत्याही कलावंताचे सतत चालू असणारे काम असते आणि कोणाच्याही कलेमध्ये नाविन्य येते, जुन्या परंपरा मोडल्या जातात आणि त्यांच्या जागी नवीन येतात. जीवनाच्या नव्या अर्थाचा साक्षात्कार घडतो त्याच्या मुळाशी लेखकाचा जीवनाच्या संदर्भात सतत चालू असणारा शोध हाच असतो. आणि हा शोध जीवनामधून निर्माण होणाऱ्या नवीन नवीन भावनांगांचाच केवळ नसतो. तर तो कलानिर्मितीच्या भानाचाही असतो. आणि या भावनांगांचे कलेत रूपांतर करताना योजावयाच्या शब्दांचे भान असण्यातही असतो.

रंगा मराठे यांना जेव्हा एखाद्या प्रसंगाच्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या भावनांगांचे दर्शन घडते, तेव्हा ते सरधोपटपणे तो प्रसंग (म्हणजे कथावस्तु) आणि त्यामधून निर्माण झालेल्या भावाशयाचेच चित्रण करतात. असे ते जेव्हा चित्रण करू लागतात तेव्हा त्यांच्या मनात मी वर उपस्थित केलेल्या इतर प्रक्रियांचा विचार डोकावत नाही. म्हणून त्यांची कथा ही एक तर केवळ निवेदनाच्याच पातळीवर राहते किंवा तीमधील काही घटनांचे भावनात्मक दर्शनच फक्त घडविते. असे होत असल्यामुळे रंगा मराठे यांची कथा एक तर पूर्णपणे कलेच्या पातळीवर पोहोचू शकत नाही आणि दुसरे म्हणजे तिच्यामध्ये अनेक प्रकारांनी आणि अनेक प्रकारचे तर्कविसंगत असे दुवे निर्माण होतात. त्यांची 'गोन्या रामाचे देऊळ' हे अशा प्रकारच्या दोषांचे उत्तम उदाहरणच आहे. साधी दोन तरुण मुलं आणि एक मुलगी. एका क्षुल्लक प्रसंगाच्या निमित्ताने मुळात तिला न आवडणाऱ्या मुलाकडे आकृष्ट होते. तसेच त्यांच्या दीर्घ कथेचेही आहे एका विधवा तरुणीच्या निवेदनातून ही कथा तयार होते. तिच्या शेजारी एक विधुर तरुणच असतो. तो इतर दोन तरुणींमध्ये गुंतून पडलेला असतो. हीही त्याच्यात गुंतलेली असते. त्या सर्वांमध्ये एक अर्थशून्य बकुळीचे झाडही निर्माण झालेले असते! ते फार अर्थपूर्ण आहे, किंबहुना मानवी मनाशी संवाद करणारं ते एक निसर्गाचं रूप आहे असा एक उल्लेख त्याच संग्रहाच्या सुरुवातीला येतो; परंतु तशी प्रचीती मात्र कथेत कुठेच येत नाही. ही कथा अनेक ठिकाणी दुभंगते, तिच्यामधून सलग सळसळ निर्माण होत नाही. ती एका कथानकाच्या पातळीवरच सुरू होते अीण त्याच पातळीवर संपते आणि संपल्यावर वाचकांच्या मनात वगैरे काही सुरू होत नाही. कारण शाश्वत सुखदुःखाची, आशा-निराशांची, अपेक्षा — अपेक्षाभंगांची पातळी ती कुठेच गाठीत नाही. निवेदनाची देखील काही एक नवीन तऱ्हा ती घेऊन येत नाही किंवा अशी एखादी अवस्था ती निर्माण करून ठेवीत नाही, की त्यामुळे मन अंतर्मुख व्हावे.

रंगा मराठे यांच्या दीर्घकथेची ही जी एक परिस्थिती आहे, तशीच त्यांच्या इतर कथांचीदेखील म्हणता येईल. तरी पण रंगा मराठे हे लेखक कथा लिहितात, त्यांचा एक वाचक निश्चितच असला पाहिजे आणि त्यांच्या वाचकाला त्यांच्या कथा आवडत असल्याच पाहिजेत.

१९४५ सालापासून मराठीमध्ये कथा-साहित्य विपुल प्रमाणात लिहिले जाऊ लागले आहे. १९६० सालानंतर तर ते अनेक अंगांनी फुलून आलेले आहे आणि १९७० पासून समाजातील सर्व थरातील लेखक कथा-साहित्याची निर्मिती करू लागलेले आहेत. डॉ. आनंद यादव म्हणतात त्याप्रमाणे पूर्वीपासून पिढ्यानुपिढ्या ज्यांच्या घरात मोट आणि नाडा याशिवाय इतर 'काही दिसत नव्हते, असे भिन्न-भिन्न व्यवसायातील आणि समाजातील वेगवेगळ्या थरांतील तरुण हातात लेखण्या घेऊन आपले जीवनानुभव व्यक्त करू लागलेले आहेत. त्यामुळे समाज-जीवन जरी विशेष समृद्ध होताना दिसत नसले तरी मराठी वाङ्मय मात्र समृद्ध होऊ लागलेले आहे हे निश्चित

समाजातील दलितवर्ण, ग्रामीण जीवन जगणारे लेखक, तसेच भिन्नभिन्न व्यवसायांत गुंतलेले लेखक, स्त्री लेखिका ही सर्व मंडळी आपापले अनुभव घेऊन साहित्याच्या प्रांतात उतरत आहेत आणि वेगवेगळ्या पातळ्यांवरून भिन्नभिन्न अनुभव कलाबद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही गोष्ट मोठी आशादायक आहे. यामधूनच समाजाच्या समग्र जीवनाचा एक मोठा पट दृष्टिपथात येणार आहे आणि ललितसाहित्यही समृद्ध होणार आहे.

प्रत्येक लेखकाला जेव्हा जीवनातील समस्यांचे कोडे पडते तेव्हाच त्याला लिहिण्याची स्फूर्ति होते. रंगा मराठे जेव्हा ललितलेखन करतात, तेव्हा त्यांनाही जीवनाचे कोडेच पडलेले असते. लेखनात हे कोडे ते आपल्या पद्धतीने सोडवितात. त्यांचे मन जीवनाच्या अधिक गहन कोड्यात सापडावे आणि एका विशिष्ट कलादृष्टीने त्यांनी या कोड्याकडे पाहावे आणि विपुल लेखन करावे, असेच त्यांचे लेखन वाचीत राहणाऱ्या सर्वांना वाटेल, अशी माझी श्रद्धा आहे आणि वाचकांची ही श्रद्धा त्यांनी पूर्ण करावी अशीच इच्छा कोणीही करील.

—वि शं. पारगांवकर

मनपंछी बावरा
लेखक : रंगा मराठे
यशोविश्व प्रकाशन, पुणे
मल्य : २० रुपये




**शरच्चंद्रांनी आपल्या भटक्या जीवनातील बरेचसे अनुभव या कादंबरीत ग्रथित केले आहेत. शरदबाबू आपल्या पूर्वायुष्याबद्दल कधीच बोलत नसत. राजलक्ष्मीबद्दल ते सांगत, ‘ती एक मनगढंतकथा आहे.’ ही कादंबरी वाचताना एका वेगळ्याच आनंदाचा अनुभव येतो.**

# शरदबाबूंची एक शाश्वत प्रेमकहाणी - ‘श्रीकांत’

**लेखांक : चार । लेखक : प्रा. बा. वि. पोतदार**

श्रीकांत हा शरदबाबूंच्या अनासक्त नायकांपैकी सर्वांत अधिक महत्त्वाचा भगवद्गीतेत वर्णिलेल्या स्थितप्रज्ञासारखा. लहानपणापासून दुसऱ्याच्या घरी वाढल्यामुळे व दुसऱ्याच्या हुकुमाची तामिली करण्यात बराच काळ गेल्यामुळे स्वतःच्या जीवनाकडे त्याने फारसे लक्ष दिले नाही, जोर करून कसली महत्त्वाकांक्षा धरली नाही. मन द्विधा होत असल्यामुळे सारे संकल्प कोसळून पडले, आळशी व निष्कर्मा, भटक्या वृत्तीचा म्हणून ख्याति झाली. योगायोगाने व या भटक्या वृत्तीमुळे अनेक बरे-वाईट नमुने त्याच्या अनुभवांतून गेले. त्यामुळे त्याचे भावप्रवण मन वैराग्यशील व तटस्थ बनले आहे. कोणत्याही गोष्टीच्या सर्व उलट-सुलट बाजू त्याच्या नजरेसमोर येतात, त्यामुळे त्याच्यामध्ये अभिनिवेश व कृतिशीलता शिल्लक राहात नाही. निर्णय घेणे व देणे, न्याय करणे या गोष्टी त्याला नकोशा वाटतात. कारण प्रकृतीच्या या विराट खेळाकडे पाहून त्याच्या अहंभावाचा निरास झालेला आहे. एके ठिकाणी त्याने म्हटलें आहे, ‘ मनुष्य विचारांचा बोजा स्वतःच्याच खांद्यावर घेऊन ज्या वेळी म्हणतो की, मी असा आणि मी तसा, हे असलं काम मी कधीच केलं नसतं, ते तसलं काम मी मेलो तरी करायचा नाही— असं ऐकलं की मी शरमेनं चूरमार होतो.’ कोटिकोटि जन्मातल्या असंख्य घडामोडी, ज्या आपल्या ज्ञानकक्षेबाहेर काम करतात, त्यातून त्याच्या मते अनंत आत्म्याची एक बैठक तयार होते. अमर्याद आत्म्याची ही बैठक, मानवी मनःप्रवृत्तींची विविधता, विलक्षणता व बारकावे, स्वतःच्या अवलोकनशक्तीने लहानपणापासून न्याहाळल्याने त्याला माणसाच्या कोणत्याही कृतीचे फारसे आश्चर्य वा नवल वाटत नाही. फार पाहिल्यामुळे व फार विचार केल्यामुळे तो उदासीन आहे. राजलक्ष्मी बळेबळेच त्याच्या हृदयात घुसून आपल्या सर्वत्यागी प्रेमाने तेथे प्रतिष्ठित होते. तरीही अशा अनेक साध्वीस्वरूप पतिता त्याने या जगात पाहिलेल्या असल्याने राजलक्ष्मी ही त्याच्या लेखी एकमेवाद्वितीय नाही. तिचे त्याला कौतुक असले, तिच्यावर त्याचे प्रेम असले, तरी त्या कौतुकात औदासीन्यही आहे ते यामुळेच. जणु काही अनंत आत्म्याची बैठक साऱ्या विश्वालाच व्यापून राहिलेली असल्यामुळे त्याचे व तिचे मीलन होण्यालाही फारसे महत्त्व नाही.

स्वतःच्या जीवनाकडे तिऱ्हाईतपणे पाहायला तो शिकला आहे व म्हणून जीवनप्रवाहापासून तो अलिप्त राहू शकतो व तटस्थतेने त्याकडे पाहू शकतो. एक दिवस राजलक्ष्मी त्याला म्हणते, ‘ प्रेम हेही एक बंधनच आहे. मला वाटतं तुम्हाला मानवता नाही ते अंगाला खुपतं ! ’ स्त्रीप्रेमाची त्याला फारशी आवश्यकता नसावी असे तिला वाटतं, कमललतेलाही तसेच वाटते. कोणत्याच भावनेचा अतिरेक श्रीकांतच्या मनाला सहन होत नाही. कुणी फार प्रेम करू लागला तर त्या प्रेमापासून दूर पळून जावेसे त्याला वाटते. वैष्णवांच्या अड्ड्यात भजनसमयी सर्वांना भक्तिरसात न्हाऊन निघालेले पाहून त्याचेही मन थोडा वेळ व्याकुळ होऊन उठते; पण त्याला हा भक्तिरसाचा अतिरेकही सहन होत नाही. हळूच तेथून उठून जावेसे वाटते.

तथापि अलिप्तता, स्थितप्रज्ञता म्हणजे संकुचितपणा किंवा स्वार्थपरायणता नव्हे. दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हा श्रीकांतचा सहज स्वभाव. लहानपणापासून ही ‘ दुर्बुद्धि ’ त्याच्या मनोवृत्तीत असावी व इंद्रनाथच्या प्रभावामुळे तो वाढीस लागली असावी. तो लहानपणी आत्याबाईकडे राहात असताना आत्याबाई पतित निरूआक्काला

चोरून मदत करीत व त्याला सांगत, 'बाबा श्रीकांत, दुसऱ्याला मदत करण्याची तुला सवय आहे. त्या सटवीची मधून मधून खबर घेत जा.' कधीही कुणालाही कसलीही मदत करू नये या तत्त्वाचा उपदेश करणारा ब्रह्मदेशातला मनोहर चक्रवर्ती जेव्हा प्लेगने लागतो, तेव्हा त्याची शुश्रूषा व उत्तरक्रिया श्रीकांतलाच करावी लागते. गंगामाटीजवळ सतीश भारद्वाजचीच नव्हे तर त्याच्या रेल्वेमजुरांचीही शुश्रूषा व उत्तरक्रिया करण्याची पाळी श्रीकांतवर येते. या सर्वांशी त्याचे कोणतेच लागेबांधे नव्हते. माणसाने माणसाला मदत करणे हे त्याचे कर्तव्य आहे या भावनेतून श्रीकांतचा परोपकार सहज स्फुरतो. कारण मनोहर चक्रवर्तीच्या उपदेशाप्रमाणे सर्वजण वागतील तर या जगाचे एक गहन अरण्य होऊन जाईल. स्वतःच्या जीविताबद्दल विशेष आस्था श्रीकांतला नसल्याने व त्याचे तसे जवळचे नातेवाईकही कोणी नसल्याने, धोका पत्करूनही तो माणुसकीने वागतो; परंतु दुसऱ्याच्या दुःखाचा बोजा हलका करण्याच्या या प्रेरणेस अधिक कृतिशील वा योजनाबद्ध स्वरूप देऊन, काही सातत्यपूर्ण विधायक कार्य करण्याचे त्याच्या मनात येत नाही. त्यासाठी जी धावपळ, महत्त्वाकांक्षा, चिकाटी व इच्छाशक्ति आवश्यक असते ती त्याच्याजवळ नाही. एका अर्थाने तो दैववादी आहे. सृष्टीच्या या विराट पसाऱ्यात आपल्यासारख्या क्षुद्र माणसाने काही बदल घडवून आणणे हा व्यर्थ प्रयत्न आहे अशी त्याची धारणा असावी. म्हणूनच शेवटी राजलक्ष्मी जेव्हा त्याला पुन्हा गंगामाटीला घेऊन जाते व आनंद संन्याशाच्या साहाय्याने तेथील अशिक्षित समाजाची सेवा सुरू करते तेव्हाही श्रीकांत एक निरीक्षकच राहातो. काहीच न करणाऱ्या वैष्णव संप्रदायी भटक्यांची व कमललतेची त्याला वारंवार आठवण होत राहाते.

पण भटकेगिरीची आवड असलेल्या दुर्बल इच्छाशक्तीच्या या सहृदय आणि उदार माणसाचे मन सहज सुंदर अशा सर्व मानवी भावनांनी परिपूर्ण आहे. त्याला आपले घर, आपले गाव, यासंबंधी काव्यात्मओढ आहे. बिहारमधील व बंगालमधील खेड्यांची तुलना करून तो बिहारबाबत म्हणतो, 'संध्याकाळी गल्लीगल्लीतून टाळ-मृदंग–भजनाचा आवाज येथे कुठेच कानी येत नाही. देवळातल्या आरतीच्या घंटांचा तो गंभीर आवाज कुठेच कानी पडत नाही. या देशातल्या बायकांना बंगाली बायकांसारखा शंखांतून मधुर आवाज काढता येत नाही. कशी जगतात इथली माणसं ? असं वाटलं, दुसऱ्याच्या गावी गेल्याशिवाय स्वतःच्या गावाची किंमत माणसाला चांगली पटत नाही. आमच्याकडे मलेरिया होतो, पोट फुगतं, घरोघर पंडुरोगी दिसतात, गल्ली–गल्लीतून वैरं माजलेली दिसतात, हे सारं खरं; पण त्यात केवढं समाधान, केवढी रसिकता असते !' अलिप्तपणे वावरणाऱ्या श्रीकांतचेच हे भाष्य आहे.

आणि एक दिवस अपमानित होऊन आपला गाव सोडून जाताना त्याचे हृदय असेच पिळवटून निघते. बंगालमधील त्या क्षुद्र खेड्यातल्या त्याच्या मोडक्या–तोडक्या घराची त्याला विशेष माया–ममता कधीच वाटली नव्हती; पण पतित असलेली राजलक्ष्मी त्याला भेटायला तेथे आल्यामुळे गावच्या लोकांसमोर एक प्रकारे अपमानित होऊन गाव टाकून निघावे लागते, केव्हा आणि कशा प्रकारे तो पुन्हा आपल्या गावी येईल याची कल्पना त्याला करता येईना. तेव्हा ते पडके सडके साम्राज्य, ते खेडे, त्याला असामान्य दिसू लागले, ते मोडके तोडके घर प्राणाहून प्रिय वाटू लागले. 'असं वाटलं, याच रस्त्यानं माझ्या आजीला आजोबांनी विवाह करून घरी आणली, त्या वेळी वऱ्हाडी लोकांच्या गलबल्यानं हा रस्ता गजबजून गेला असेल. नंतर एके दिवशी जेव्हा त्यांनी देह ठेवला, त्या वेळी याच रस्त्यानं शेजारीपाजाऱ्यांनी त्यांचं प्रेत खांद्यावर घेऊन नदीकिनारी नेलं असेल ! याच रस्त्यानं माझी आई एक दिवस नवी नवरी म्हणून या घरात आली असेल आणि पुन्हा एके दिवशी ज्या वेळी तिची जीवनयात्रा संपली त्या वेळी याच धुळीतल्या अरुंद रस्त्यानं आम्ही तिला गंगातटाकी पोहोचवून आलो होतो, त्या वेळी हा रस्ता इतका निर्जन नव्हता किंवा इतक्या अडचणीचाही झाला नव्हता. त्या वेळी इथल्या हवेतून चोहीकडे मलेरियाचे जंतु उसळून उठले नव्हते किंवा डबक्या–डबक्यातल्या पाण्याच्या चिखलात एवढं विषही सामावलं नव्हतं. त्या वेळी या भागात अन्न होतं, वस्त्र होतं, धर्म होता. त्या वेळी आनंदरहित आणि भंकर अशा शून्यतेनं आकाश झाकळून देवाच्या दरवाजापर्यंत जाऊन भिडलं नव्हतं.'

श्रीकांतचे हृदय रसिक व भावप्रवण आहे, म्हणूनच गाव सोडून निघताना कुणाही सामान्य माणसाप्रमाणे त्याचे हृदय पिळवटून निघते. तथापि समग्र जीवनाकडे व्यापक दृष्टीने पाहण्याची तटस्थता त्याच्या प्रवृत्तीत आहे, म्हणूनच केवळ स्वतःचे सुखदुःख त्याला न जाणवता गेल्या कित्येक पिढ्यांचा जीवनपट त्याच्या दृष्टीसमोर उभा राहतो आणि व्यक्तीच्या सुखदुःखाचा निरास समष्टीच्या सुखदुःखात करण्याच्या त्याच्या मनाच्या सवयीमुळेच आपले घर व गाव यांचा विचार करताना, पारतंत्र्यात स्वदेशाच्या झालेल्या अवनतीबद्दल त्याचे मन हळहळते. एकदा एका युवराजाबरोबर शिकारीला गेलेला श्रीकांत पैजेसाठी रात्री स्मशानात जाऊन बसतो. दुसऱ्या दिवशी स्मशानाशेजारचा ओसाड तलाव व घराचे पडीक चौथरे पाहून त्याच्या मनात याच प्रकारचे विचारतरंग उठू लागतात. 'असं वाटलं, जिथं मी हा पाय ठेवून बसलो आहे त्या जागी पावलं टाकून किती लोक किती वेळ आले असतील, अन् गेले असतील ! हे गाव जेव्हा गाजत होतं तेव्हा ते असेच या ठिकाणी येऊन बसत असतील; साऱ्या दिवसाचा शीण घालविण्यासाठी गात असतील, गोष्टी करीत असतील. त्यानंतर एकदम एके दिवशी पटकीच्या रूपानं काळाचा घाला आला तेव्हा सगळा गाव उजाड होत असताना कित्येक आसन्नमरण झालेले लोक तहानेनं व्याकुळ होऊन या घाटावर येऊन शेवटचा श्वासही सोडत असतील. त्यांचा तो तहानेलेला आत्मा आज देखील इथंच कुठे तरी घुटमळत असेल !'

तत्त्वशोधक आणि सौंदर्यशोधक वृत्तीचा समन्वय त्याच्या ठिकाणी झालेला असल्यानच त्याला अमावास्येच्या त्या अंधाऱ्या रात्रीचे सौंदर्य प्रतीत होते. 'रात्रीला एक विशेष स्वरूप आहे. जगातला झाडापाला, डोंगरपर्वत, जलस्थल, जंगलप्रभृति दिसणाऱ्या वस्तूंपेक्षा अगदी निराळ्या प्रकारे ती दिसून येते, हे आज पहिल्यानं माझ्या नजरेला आलं... एकदम डोळ्यांसमोर सौंदर्याच्या लहरी खेळू लागल्या. वाटलं, प्रकाश म्हणजेच सौंदर्य असं कुठल्या मामट्यानं सांगितलं ? अंधाराला काय सौंदर्य नाही ? ही लबाडी माणसानं कशी पचू दिली ? हे ब्रह्मांड जसं गंभीर, अचिन्त्य, जसं सीमाहीन तसाच हा

अंधार!... राधेच्या दोन डोळ्यांना ज्या रूपानं प्रेमाच्या वादळात जग वाहून गेल्याचं दाखवलं, तेच हे घनःश्याम स्वरूप! कधीच मी याचा विचार केलेला नव्हता. कधीच या बाजूला पाहिलं नव्हतं.'

बालपणात श्रीकांतच्या मनावर ठसा उमटवून गेलेल्या व्यक्ती दोन : इंद्रनाथ व अन्नदा. बेछूट, अनासक्त, स्वतंत्र जीवनाविषयी व अद्‌भुतरम्य जीवनसरणीविषयी श्रीकांतला वाटणारे आकर्षण इंद्रनाथमुळे निर्माण झाले व सनातन आणि पारंपरिक मूल्यांविषयी त्याला वाटणारा आदर अन्नदेच्या चरित्रामुळे निर्माण झाला असे प्रा. हुमायून कबीर यांनी सुचविले आहे, त्यात तथ्य आहे; परंतु इंद्रनाथ प्रामुख्याने निःस्वार्थी, माणुसकीचे प्रतीक आहे. त्याच्या परोपकारी व निर्भय वृत्तीमुळेच त्याचा व श्रीकांतचा परिचय घडून येतो. एका मारामारीच्या प्रसंगी हा अनोळखी मुलगा श्रीकांतचे संरक्षण करतो. पुढे एक दिवस त्याच्याबरोबरच रात्री पुरात चोरून मासे मारायला गेल्या वेळी श्रीकांतला त्याच्या निडर परंतु हळुवार, परोपकारी परंतु निर्मळ व बालसदृश स्वभावाची कल्पना येते. भीती व स्वार्थ या भावनांची ओळखच इंद्रनाथला नव्हती. काळोखी रात्र, नदीचा महापूर, एका बाजूला खचणारी वाळू, तर दुसऱ्या बाजूला जंगल व राखणदार कोळी, झाडीतले साप व श्वापदे या सर्व अनुभवाने श्रीकांतची भीतीने गाळण उडालेली असताना, श्रीकांतला होडीत बसवून स्वतः चिखल तुडवीत इंद्रनाथ होडी ओढून सुरक्षित स्थळी आणतो व शिळोप्याच्या गप्पा माराव्यात इतक्या सहजपणे म्हणतो: 'केव्हा तरी एकदा मरायचेच आहे ना बाबा?' पण एका अर्भकाचे पाण्याबरोबर वाहून आलेले प्रेत पाहाताच त्याचे अंतःकरण कळवळून उठते व त्याच्या डोळ्यांत अश्रू तरळतात. गरिबांना त्या कॉलऱ्याच्या दिवसात अग्निसंस्कारासाठी लाकडे कुठून मिळणार? तोंडाला नुसता अग्नीचा स्पर्श करून मुलाचे प्रेत गंगार्पण करण्यात आले होते. त्याला सुरक्षित जागी पुरून आल्यावरच इंद्रनाथला पुढील कामे सुचू शकतात. जात-पात काही माहीत नसलेल्या कुठल्या तरी प्रेताला तो खुशाल शिवला याचे श्रीकांतला त्याच्या पूर्वसंस्कारामुळे आश्चर्य वाटते. तेव्हा इंद्रनाथ म्हणतो: 'अरे, हे तर मढे! मेल्यावर कसली आली आहे जात? आता या आपल्या होडीला का जात आहे? मुळात कसल्या तरी आंब्याच्या किंवा जांबाच्या लाकडाची ही बनविलेली असणार!' शाळेत जाऊन विशेष शिक्षण न घेतलेल्या इंद्रनाथच्या तोंडून अशी महान सत्ये सहज बोलताना बाहेर पडत असत. कारण ईश्वराची अखेरची देणगी—निष्कपट व सरळ बुद्धि त्याला मिळालेली होती. त्याला लबाडी ठाऊक नव्हती. मूळ उद्देश लपवून तो केव्हाही काही करीत नसे. ही निष्कपट व सरळ बुद्धि मनाची निर्भयता व निर्मलता, श्रीकांतच्याच नव्हे तर शरदबाबूंच्याही दृष्टीने जीवनातील एक मोठे मूल्य आहे. म्हणूनच शरदबाबूंच्या नायकांमध्ये हा गुण नेहमीच कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो. 'चरित्रहीन' मधील सतीश, 'विजया' मधील नरेंद्र, 'गावगंगा'-मधील रमेश इत्यादि नायकांत हा गुण प्रकर्षाने आहे. या गुणाच्या जोडीला इतर काही व्यवहारोपयोगी गुणांची जोड असली किंवा नशीब बलवत्तर असले, किंवा योग्य त्या व्यक्तीचे सहाय्य मिळाले, तर शरदचंद्रांचे नायक आपल्या कार्यात यशस्वी व जीवनात सुखी होतात. दैवगति विरुद्ध असली, विशिष्ट गुणांची जोड नसली किंवा योग्य त्या व्यक्तीचे साहाय्य मिळाले नाही, तर हे नायक क्वचित अनावर होऊन दुबळे ठरतात; पण असे वाटते की, शरदबाबूंना विशेष वंदनीय वाटणारे गुण हेच—मनाची सरलता, औदार्य, माणुसकी व परोपकारी बुद्धि हे गुणच शरदबाबूंच्या कथाविश्वातील 'हिरो' आहेत. या प्रवृत्तीचे संस्कार श्रीकांतच्या मनावर प्रथम इंद्रनाथकडून झाले. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होण्याची वृत्ती व स्वतःच्या जीवनाबद्दल बेफिकीर राहण्याची कला या इंद्रनाथकडून श्रीकांत शिकला.

### सत्यवस्तूचा लाभ

अशा या भावप्रवण, रसिक, उदार हृदयाच्या, तत्त्वशोधक वृत्तीच्या, अंतर्मुख परंतु तिऱ्हाइताच्या तटस्थ नजरेने स्वतःच्या जीवनासकट सर्व जगाकडे पाहणाऱ्या श्रीकांतचा संबंध तितक्याच रसिक व बुद्धिमान, भावप्रवण व व्यवहारकुशल अशा पतित राजलक्ष्मीशी आल्यावर त्यांचे जे मधुर व संदिग्ध नाते निर्माण होते तो या कादंबरीचा एक प्रमुख विषय आहे. अंध रूढी, जुने हेकट आचार-विचार व त्यामुळे होणारी स्त्रियांची विलक्षण कुचंबणा लहानपणापासून पाहिल्यामुळे शरदबाबूंप्रमाणे श्रीकांतच्या मनातही स्त्रीजातीबद्दल अपार करुणा निर्माण झालेली आहे. लहानपणीच श्रीकांतला इंद्रनाथमुळे अन्नदाआक्काचे दर्शन घडले. तिच्या बहिणीचा वासनेपोटी खून करून फरारी झालेला तिचा पती एक दिवस मुसलमान गारुड्याच्या वेषात समोर दिसल्यावर ही सती नवऱ्यामागून जाण्यासाठी कुणालाही न सांगता घराबाहेर पडली होती; त्यामुळे जगाच्या दृष्टीने ती एक पळून गेलेली कुलटा ठरलेली होती, तर दिवसभर गांजा झोकून पडणाऱ्या व मुसलमान झालेल्या नवऱ्याबरोबर विलक्षण हालअपेष्टांचे जीवन ती नंतर जगली होती. तिला पाहिल्यामुळे व तिची हकीकत कळल्यामुळे, 'एका सत्यवस्तूचा लाभ आपल्याला जीवनात झाला' असे श्रीकांतला वाटते. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन त्याने असे केले आहे: 'मी मान वळवून पाहिलं—इंद्राची आक्का, जशी काही राखेखाली झाकलेली आगीची ठिणगी! अनेक वर्षे कठोर तपश्चर्या करीत असताना नुकतीच आसनावरून उठून आल्यासारखी दिसत होती!' अशा स्त्रीच्या नशिबीसुद्धा जर बदनामी असते तर जगात अशक्य काय आहे? अन्नदाआक्काचे सतीचे हे तेज लहानपणी पाहिल्यामुळे पुढे त्याला वाटले होते, 'मला वदवील अशी स्त्री या जगात नाही, परलोकी असेल की, काय शंकाच! असं वाटे, जर कधी कुणाच्या तोंडून अशी मिठ्ठास भाषा, जिवणीवर असं गोड हसू, ललाटावर असं दैवी तेज, डोळ्यात अशी आर्द्र करुण दृष्टी दिसून येईल, तरच डोळे वर करून पाहीन. जर अशीच कोणी सती, अशीच कोणी साध्वी दिसेल, तर तिलाच हे मन वाहीन. जगातली सारी सुखदुःखं, सारं बरं-वाईट, सारे धर्म-अधर्म टाकून तिचा स्वीकार करीन—तेव्हाच की जेव्हा पावलोपावली तिच्याच-

**'मला वदवील अशी स्त्री या जगात नाही, परलोकी असेल की काय शंकाच!'**

सारखी अशी अवर्णनीय महिमा फुटून उठेल !'

आणि तरीही, एका युवराजाकडे गाण्याच्या मैफलीत अचानक भेटलेल्या राजलक्ष्मीच्या अश्रूंनी त्याचे मन द्रवते. बालपणातली शुद्ध प्रेमाची भावना इतकी वर्षे अंतर्मनात तेवत ठेवणाऱ्या या पतित तरुणीकडे प्रथम त्याचे मन कुतूहलाने ओढले जाते; परंतु बालपणात करवंदांच्या माळा करून त्याच्या गळयात घालणारी मनसा पंडिताच्या पाठशाळेतली राजलक्ष्मी आज त्याच्यासमोर गाणाऱ्या 'प्यारी' बाईजीच्या स्वरूपात उभी होती. तिची मधली हकीकत जरी श्रीकांतला माहीत नसली तरी आज ती गाणाऱ्या बाईजीच्या वेषात जेव्हा त्याच्यापुढे उभी रहाते तेव्हा तिचे मधले आयुष्य कलंकित झालेले होते, ती एक पतिता होती, हे त्याला सहजच जाणता येते. त्याला आश्चर्य वाटते ते या गोष्टीचे की, त्याला पाहिल्यावर जणू हरपलेले श्रेय गवसल्याचा, जणू ईश्वरच भेटल्याचा आनंद राजलक्ष्मीला होतो. मधली वर्षे जणू पुसली जातात. आज अचानक भेट झाल्यावर राजलक्ष्मीही त्याच्या प्रेमावर हक्क सांगत नाही. करवंदीच्या माळा लहानपणी त्याच्या गळयात घालून तिने न कळत जे प्रेम बालवयात केले ते त्याला त्या वेळी कळले असेलच असे नाही. आज ते त्याच्या स्मरणात असेलच अशीही तिची अपेक्षा नाही. बालपणचे अर्धस्फुट प्रेम नंतरच्या मलिन जीवनात पावित्र्याचे प्रतीक म्हणून तिने आपल्या मनात जपले होते. अनपेक्षितरीत्या श्रीकांतची अशी भेट झाल्यावर त्या अमूल्य प्रेमाचा परिस्फोट करण्याचा मोह तिला आवरत नाही. शरदबाबूंच्या 'चरित्रहीन'मधील सावित्रीला ज्याप्रमाणे सतीशच्या सुखस्वास्थ्याबद्दल विलक्षण आस्था वाटे; परंतु त्याच्याशी प्रत्यक्ष मीलन होण्याचा विचार तिच्या मनात नव्हता, त्याचप्रमाणे राजलक्ष्मीची प्राथमिक भूमिका आहे. त्याने युवराजाभोवतीच्या या चंगीभंगी लोकांच्या तोंडपुज्या मेळाव्यातून लवकर निघून जावे एवढीच मागणी ती प्रथमतः करते. धाडसाने पैजेखातर रात्री स्मशानात जाण्याच्या प्रयत्नापासून त्याला परावृत्त करण्यासाठी तिने केलेली काकुळती, मध्यरात्रीनंतर त्याचा शोध करण्यासाठी तिने आपल्या नोकरांना पाठवणे, तो पहाटे परत आल्यावर सर्व हकीकत एकटी-एकटीने ऐकण्याचा तिचा प्रयत्न, तो फसल्याबद्दलचा तिचा गोड रुसवा, श्रीकांतच्या कल्याणाबद्दलची व स्वास्थ्याबद्दलची तिची तळमळ, 'सुखाच्या काळांत नाही, तरी दुःखाच्या काळात तरी माझे स्मरण करा !' म्हणून तिने काकुळतीने केलेली विनंती, त्याच्या पायाला स्पर्श करून पहाटे घेतलेला निरोप आणि तिचे अश्रू, या सर्व गोष्टींतून तिचे प्रेम जणू स्वयंस्फूर्त कारंजाच्या तुषारांप्रमाणे बाहेर फुटून त्याच्या मनावर शिडकावा करीत राहाते. म्हणूनच तिचा विचार मनाबाहेर झटकून टाकून, हृदयाची कवाडे बंद करून घेण्याची सोय असताना तो तसे करीत नाही. ही पतिता काही त्याच्या अन्नदाआक्कासारखी असणे शक्य नव्हते. सौंदर्याच्या बाबतीत कुणाशीच राजलक्ष्मीची तुलना होऊ शकली नसती हे खरे; परंतु ज्या हृदयावर अन्नदाआक्कासारख्या सतीच्या बावनकशी सोन्याचा कस लागला होता त्या त्याच्या हृदयावर आता पितळेचा प्रभाव पडू लागला होता की काय अशी शंका त्याच्या मनात डोकावून जाते.

मैफलीतल्या त्या भेटीनंतर, अनेक वर्षांपूर्वीचे निरागस प्रेम अंतरंगात जतन करून ठेवणाऱ्या या 'प्यारी'कडे त्याचे मन ओढ घेऊ लागते. एक दिवस तिची आठवण तीव्रतेने होते तेव्हा तिला भेटण्याच्या ऊर्मीने तो पाटण्याची गाडी पकडतो; पण भेट झाल्यावर पुढे काय ? तिचे प्रेम प्रामाणिक व निःसीम असेलही; परंतु तो या पतितेचे प्रेम स्वीकारू शकत होता काय ? मनाच्या अशा द्विधा व संभ्रमित अवस्थेत तो पाटणास्टेशन येण्यापूर्वीच गाडीतून उतरतो व एका बैराग्यांच्या मेळाव्यात सामील होतो. जे मिळविण्यासारखे होते असे त्याला वाटले, ते राजलक्ष्मीचे प्रेम मिळविण्याचा मार्ग समाजाने बंद केलेला होता आणि जीवनात अन्यत्र तो कुठेही बांधलेला नव्हता. ही बैरागीगिरी म्हणजे जीवनाच्या प्रवाहाच्या बाहेर राहून त्याकडे तटस्थतेने पाहण्याच्या त्याच्या प्रयत्नाचे एक प्रतीक आहे; परंतु शेवटी आजारी पडून आरास्टेशनवर मरणप्राय अशा स्थितीत पडला असताना 'सुखाच्या नाही, तर दुःखाच्या काळात तरी माझे स्मरण करा' हे राजलक्ष्मीचे शब्द त्याला आठवतात व शुद्धी हरपण्यापूर्वी स्टेशनवरच्या हमालाला तो राजलक्ष्मीचा पत्ता देतो. पत्र मिळताच प्यारी स्वतः येऊन त्याला पाटण्याच्या आपल्या घरी घेऊन जाते. तिथे बरा होत असताना श्रीकांतच्या लक्षात येते की, तिचा पेशा कोणताही असो, पूर्वायुष्यातला कलंक तिने बराचसा धुऊन काढलेला होता. सावत्र मुलींची लग्ने करून दिली होती. सावत्र मुलगा बंकू याला ती शिकवून-सवरून मोठा करीत होती. बंकूला तिच्याबद्दल मोठा आदर वाटत होता, सासरच्या गावी तिने मोठा तलाव बांधून दिला होता. अनेकांना ती अन्नवस्त्र पुरवीत होती. 'आई' म्हणून सर्व बाजूंनी तिला मुले-माणसे घेऊन बसली होती. या भक्तीच्या व प्रेमाच्या राज्यातून आपल्या प्रेमाने तिला बाहेर खेचून आणणे योग्य होईल काय ? राजलक्ष्मीही; 'आपल्या अनावर भावनांची लाज वाटून, श्रीकांत पूर्ण बरा होण्यापूर्वीच त्याला निरोप देते.

तथापि 'चरित्रहीन'मधील सावित्रीप्रमाणे राजलक्ष्मीलाही आपल्या प्रीतीची ही समस्या सहजपणे सोडवता येत नाही. राजलक्ष्मी अधिक बुद्धिमान, रसिक व आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. बाकी दोघींची वेदना सारखीच. सतीशच्या अंतर्यामी व अनावर भावनांमुळे 'चरित्रहीन'मधील नायक-नायिकेच्या प्रीतीच्या वेदनेला विलक्षण धार चढते व त्यामुळेच त्या कथेचा शेवटही एखाद्या विशिष्ट व निःसंदिग्ध अशा बिंदूजवळ करणे लेखकाला प्राप्त होते; परंतु श्रीकांत तटस्थ व निराग्रही आहे. राजलक्ष्मीच्या प्रेमाचे मूल्य तो पूर्णतया जाणतो; परंतु सामाजिक संकेत धुडकावून लावण्याची राजलक्ष्मीप्रमाणे त्याच्याही मनाची तयारी नसल्याने, कोणत्याही क्षणी तो तिच्यापासून अलिप्त होऊ शकतो. पाटण्याहून राजलक्ष्मी त्याला निरोप देते तेव्हा तिच्या धैर्याचे व संयमाचे त्याला कौतुक वाटते. त्याच्या लक्षात येते की, मोठे प्रेम, प्रिय व्यक्तीला केवळ जवळ धरून ठेवीत नाही, दूरही लोटू शकते, साधारण व सामान्य प्रेमाला हे साध्य नाही. त्याच्या पोहोचल्याच्या पत्राला राजलक्ष्मीकडून उत्तर येते तेही औपचारिक असते. विवाह करून संसारात पडून आता त्याने

स्थिरस्थावर व्हावे असा उपदेशही त्यात गंभीरपणे केलेला असतो.

परंतु त्याच्या विवाहाचा योग येतो त्या वेळी राजलक्ष्मी त्यात मोडताच घालते. तिच्या प्रेमाची ही तऱ्हा, त्यातील उत्कटता व अगतिकता, संकोच व विव्हलता, त्याच्या परिपक्व मनाला समजू शकते. विवाह करून गृहस्थाश्रमात पदार्पण करण्याविषयी त्याच्या मनाला फारसा उत्साह नसतोच. तथापि ब्रह्मदेशात बंगालीबाबूंना नोकऱ्या चांगल्या पगाराच्या मिळू शकतात असे ऐकल्याने त्याची भटकेगिरीची वृत्ति जागी होते व तो ब्रह्मदेशात जाण्याचे ठरवतो. ज्या राजलक्ष्मीच्या जवळ जाता येत नाही तिच्यापासून दूर जाण्याचा तो एक मार्ग; पण श्रीकांत आपल्यापासून आता कायमचा दूर होणार या भयाने तिचे प्राण कंठाशी येतात. इतक्या दूर देशात त्याच्या प्रकृतीची काळजी कोण घेईल ? या खेपेस तिच्या भावनेला मान देऊन तो विवाहाच्या विचारापासून दूर राहिला तसा तो नेहमी कसा राहू शकेल ? आपल्यालाही त्याने ब्रह्मदेशात घेऊन जावे असाही आग्रह ती करून पाहाते; परंतु त्याच्या व तिच्याही मनाची अजून तयारी झालेली नाही. उलट त्याने इथेच राहून काय करावे, तिच्याशी कशा प्रकारचे नाते ठेवावे, या समस्येलाही तिच्याकडे उत्तर नाही. तिची सर्व धर्मसंपत्ति प्रेमाच्या अधिकाराने त्याने आपली मानावी व परदेशात जाऊच नये असे ती सुचवू पाहाते; परंतु संपत्तीबाबतचा हा प्रस्ताव श्रीकांतला मान्य होण्यासारखा नव्हता, याची जाणीव तिला स्वतःलाच असते. या एकूण समस्येचा विचार करून श्रीकांतने त्यातून जो मार्ग शोधून काढला आहे तो जितका असामान्य तितकाच सुंदर, त्याच्या स्वतःच्या उत्कट परंतु अनासक्त स्वभावाला तो साजेसा आहे. ब्रह्मदेशात नोकरीसाठी जाण्याच्या विचारापासून तो ढळत नाही; परंतु तिच्या मनाची तगमग शांत व्हावी या हेतूने तो तिला आपण होऊन आश्वासन देतो की, तो नेहमी तिचाच राहील, विवाहाचा विचार तो कधी करणार नाही. तिला दुःख देऊन तिच्या मर्जीविरुद्ध स्वतःचा विवाह यापुढे तो केव्हाही करणार नव्हता. एका पतितेला आपली म्हणून चिरकाल तसेच राहण्याच्या त्याच्या निश्चयाने राजलक्ष्मीचे हृदय दुमंगून जाते. डोळ्याची पापणीसुद्धा न हालवता प्यारी त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली. एवढाली आसवे तिच्या गालांवरून टपटप करीत पाझरू लागली. डोळे पुसून ती भरल्या आवाजात म्हणाली, 'या हतभागिनीसाठी जन्मभर संन्यासी होऊन राहणार तुम्ही ?' श्रीकांत म्हणाला, 'हो राहणार ! तुझ्याकडून मला जे काही मिळालं त्याच्या मोबदल्यात संन्यासी होऊन राहण्यात माझं काही नुकसान नाही. मी कुठंही असलो तरी माझ्या एवढ्या शब्दावर तू अविश्वास करू नकोस !' एक क्षणभरच त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि दुसऱ्याच क्षणाला ती उशीत तोंड खुपसून खाली पडली. फुटून पडणाऱ्या रडण्याच्या दाबलेल्या आवेगामुळे तिचा सारा देह थरथर कापत फुलून फुलून उठत होता.

अशा तऱ्हेने, प्रीतीच्या धाग्याने बांधले गेलेले हे दोन जीव दोन ग्रहांप्रमाणे एकमेकांभोवती फिरत राहतात; परंतु बराच काळपर्यंत एकत्र येऊ शकत नाहीत. ब्रह्मदेशात श्रीकांतला भेटलेल्या अभयेच्या तेजस्वी उदाहरणामुळे श्रीकांत–राजलक्ष्मी यांच्या पारंपारिक मूल्यात फरक पडण्याचा योग निर्माण होतो. अभयेची हकीकत व तिचे उदाहरण, हा समाजाला या बाबतीत एक पाऊल पुढे नेण्यासाठी लेखकाने सुचविलेला एक मार्ग आहे. तिच्या उदाहरणाचा श्रीकांत-राजलक्ष्मी यांच्या मनोवृत्तीवर काय परिणाम होतो हेही शरदबाबूंनी बारकाईने दाखविले आहे. ब्रह्मदेशाच्या प्रवासातच श्रीकांतची अभयेशी ओळख होते. अभयेची निरलस सेवावृत्ति, तिचे बुद्धिचातुर्य व लाघवी स्वभाव पाहून त्याला असे वाटते की, हिचा नवरा कुठे का असेना, एकदा त्याचा पत्ता लागला म्हणजे असे हे स्त्रीरत्न तो आपल्या दृष्टीआड होऊ देणार नाही; परंतु प्रत्यक्षात उलटाच अनुभव येतो. अभयेच्या पतीचा पत्ता लागतो, श्रीकांतची त्याला नोकरीबाबत मदतही होते; परंतु तो नादान माणूस अभयेशी निर्घृण पद्धतीने वागतो व तिला घराबाहेर काढतो. त्यामुळे नाइलाजाने अभया रोहिणीबाबूंच्या आश्रयाला येऊन त्यांच्या प्रेमाचा स्वीकार करते. अन्नदा, राजलक्ष्मी, सावित्री व शरदबाबूंच्या इतर अनेक नायिकांनी जी मूल्ये व जे संकेत शिरोधार्य केले त्याविरुद्ध अभया अशा तऱ्हेने बंड करते. श्रीकांतला याचे आश्चर्य वाटल्याचे पाहून ती म्हणते, 'त्यांनी आपल्या ब्राह्मी स्त्रीबरोबर खुशाल रहावं, मी नाही म्हणणार नाही; परंतु पति जेव्हा एका काठीच्या जोरावर पत्नीचे सारे अधिकार हिरावून घेऊन, तिला अर्ध्या रात्री घरातून एकटी बाहेर काढून देशोधडीला लावतो, तेव्हाही विवाहप्रसंगी म्हटलेल्या वैदिक मंत्रांच्या आधारे तिच्यावर लादलेल्या कर्तव्याची जबाबदारी केवळ तिच्यावरच कायम राहू शकते की काय, एवढाच तुमच्याकडून मला निर्णय लावून घ्यायचा आहे ... माझ्याबरोबर त्यांनीही ते वैदिक मंत्र उच्चारले नव्हते काय ? परंतु त्या मंत्राची सर्व जबाबदारी व सर्व बंधने, मी स्त्रीजन्मास येण्याचा घोर गुन्हा केल्यामुळे माझ्याच शिरावर तेवढी राहिली, असंच नाही का हे ?... माझ्या पत्नीत्वाला काहीच अर्थ नाही का ? मला माता होण्याचा मुळीच अधिकार नाही का ? ... सर्व देशांतून, सर्व धर्मांतून, या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे मार्ग मोकळे आहेत; परंतु मी हिंदु कुटुंबात जन्मले एवढ्यासाठीच दहाही दिशा मला बंद व्हाव्यात का श्रीकांतबाबू ?'

परंतु अभयेच्या बंडखोरीपेक्षा अन्नदा किंवा राजलक्ष्मी यांचा त्याग व संयम श्रीकांतला अधिक आकर्षक वाटतो. तथापि सुसंस्कारी व बुद्धिमान अशा अभयेचा पतीने निष्कारणच त्याग केल्यामुळे श्रीकांत व राजलक्ष्मी यांना तिच्याबद्दल अपार सहानुभूति वाटते. विधवांचे ब्रह्मचर्य, निरर्थक त्यागाचा महिमा, समाजाच्या मूढपणापुढे मान वाकवून निष्कारण दुःख करीत राहण्याचा ध्येयवाद, यातही एक विनाशक मोह असतो, निष्कारण स्वतःला फसविण्याची वृत्ति असते, असे अभयेने म्हटले आहे. रोहिणीबाबूंच्या प्रेमाच्या आधारे ती एक बंडखोर म्हणून जगण्याचे ठरवते. व स्वतःला होणाऱ्या मुलांवर सुसंस्कार करून त्यांना 'माणूस' बनविण्याची महत्त्वाकांक्षा

**'या हतभागिनीसाठी जन्मभर संन्यासी होऊन राहणार तुम्ही ?' –राजलक्ष्मी**

बाळगते. तिच्या या रास्त बंडखोरीचे श्रीकांत–राजलक्ष्मी यांना कौतुक वाटते; परंतु ते तिच्याकडे एक 'असामान्य' स्त्री म्हणून पाहातात. तेजस्वी व स्वतंत्र बुद्धीच्या अभयेला ब्रह्मदेशात जे शक्य झाले ते श्रीकांत–राजलक्ष्मीसारख्यांना किंवा सतीश-सावित्रीसारख्यांना भारतात शक्य होणार नाही असा श्रीकांतचा म्हणजेच शरदबाबूंचा निर्णय आहे. कारण सामाजिक नीतिनियमांचे उल्लंघन हा ध्येयवाद म्हणून समाजापुढे ठेवण्यात मोठा धोका असतो, याची त्यांना जाणीव आहे. एखादा राममोहन राय किंवा एखादा केशवचंद्र सेन ज्या वेळी समाजापुढे काही नवी मूल्ये ठेवतो, तेव्हा जुन्या परंपरेतील सर्वच वाईट व टाकाऊ आहे असा सामान्यांचा गैरसमज होऊ शकतो व मद्यमांस सेवन करून बूट घालून हिंडणे म्हणजे सुधारणा, अशी सामान्य माणसाची धारणा होऊ शकते. सामान्य माणसाच्या प्रतिक्रियेतील हा धोका शरदचंद्रांनी नेहमी डोळ्यांसमोर ठेवलेला होता, त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या उथळ सुधारणावादाचे दर्शन त्यांच्या कथांत होत नाही. समाजाच्या सर्व थरांपर्यंत ज्ञानाचे व शिक्षणाचे लोण नेऊन पोहोचविले पाहिजे व समाजावर प्रेम करणाऱ्या त्यागी सुधारकाकडून हे कार्य होणे शक्य आहे, हा सिद्धांत मात्र त्यांनी वारंवार मांडला आहे. 'पंडित मशाई' या कथेत तो प्रामुख्याने दृष्टीस पडतो. 'श्रीकांत'मधील वज्रानंद हा तरुण संन्यासी या विचाराचेच प्रतीक आहे. 'पल्लीसमाज' या कादंबरीचा हाच विषय आहे.

म्हणूनच अभयेच्या 'केवळ धाडसाचे' वा बंडखोरीचे श्रीकांत-राजलक्ष्मी यांना कौतुक नाही. जिने अशा सुधारणेचा झेंडा हाती घ्यावा ही व्यक्ति आहे की नाही, असे तिचे चारित्र्य आहे की नाही. ही गोष्ट ते पारखून घेतात. अभया नुसती बुद्धिमान व तेजस्वी नाही. तिच्यामध्ये त्यागाची, सेवाभावाची, निःस्वार्थी माणुसकीची ऊर्मी आहे. श्रीकांतचा ताप प्लेगचा असू शकेल याची जाणीव असतानाही निःशंक मनाने ती त्याचे आपल्या घरी स्वागत करते व त्याची सेवाशुश्रूषा करते. तिच्या हृदयात धगधगणारी ही मानवतेची आग तिचे सर्व पाप जाळून टाकण्यास समर्थ होती, असे राजलक्ष्मीचे भाष्य आहे. आपण त्या मानाने सामान्य आहोत, तिच्या मार्गावर पाऊल टाकण्याची आपली कुवत नाही, असे श्रीकांत व राजलक्ष्मी धरून चालतात. राजलक्ष्मीचे गुरुदेव म्हणाले असते की, ज्याला जे पचते ते त्याने करावे. रोगाचे जंतु एकाला काहीच करू शकत नाहीत तर दुसऱ्याचे शरीर ते पोखरून टाकतात, म्हणूनच कुवतीचा विचार महत्त्वाचा. अंध रूढीच्या निर्घृणतेइतकीच अंध बंडखोरी मूढ व प्रसंगी निर्घृण असू शकते. म्हणूनच सुधारकाच्या स्वतःच्या नीतिमत्तेचे, चारित्र्यसपन्नतेचे व निःस्वार्थीपणाचे महत्त्व अधिक !

असामान्यांच्या समस्यांपेक्षा सामान्यांच्या समस्यांकडे श्रीकांतचे व शरदचंद्राचे अधिक लक्ष होते, म्हणूनच राजलक्ष्मी एक नाही, अनेक आहेत, समाजात सर्वत्र पसरलेल्या आहेत असे श्रीकांतला वाटत राहाते. शारदा एक नाही, अनेक आहेत असे 'शेवटचा परिचय' मधील राखालबाबूनेही म्हटले आहे. या शारदा–सावित्री–राजलक्ष्मींच्या वेदना दूर करण्याचा राजमार्ग कोणता हे सांगणे शरदचंद्रांना सोपे वाटले नाही. त्यांच्या वेदनेचे अतीव हळुवारपणे व बारकाईने चित्रीकरण करणे हा शरदबाबूंना सुचलेला राजमार्ग. म्हणून चार भागांच्या 'श्रीकांत' या प्रदीर्घ कादंबरीत असंख्य घटना व व्यक्तिरेखा निर्माण करून श्रीकांत–राजलक्ष्मी यांच्या समस्येला शरदचंद्रांनी महाभारतासारखी एक विशाल पार्श्वभूमी निर्माण केलेली आहे. अभया नावाच्या एका तेजस्वी, निःस्वार्थी, बंडखोर स्त्रीची हकीकत हा या पार्श्वभूमीचाच एक भाग. तिच्या बंडखोरीचा मार्ग श्रीकांत व राजलक्ष्मी स्वीकारतात, की ते आपल्या विफल प्रीतीची वेदना मुकाट्याने सहन करण्याचे ठरवतात याला जणू फारसे महत्त्व नाही. आपापल्या मगदुराप्रमाणे व स्वभाववैशिष्ट्याप्रमाणे व्यक्ति वागते. महत्त्व आहे ते श्रीकांत व राजलक्ष्मी यांच्यामधील मधुर प्रेमभावनेला, एकमेकांसाठी त्यांनी केलेल्या त्यागाला. त्यामध्ये मानवी हृदयाचे जे अपार सौंदर्य दिसून येते त्यामुळे शरदचंद्र मोहित होतात. म्हणूनच या कधी न संपणाऱ्या प्रेमाच्या विशाल पार्श्वभूमीवर बंगालच्या महाभारताचे दर्शन शरच्चंद्रांनी घडविले आहे की काय, असेही कित्येकदा वाटू लागते. सामाजिक मूल्ये बदलतात; परंतु प्रेम व त्याच्या समस्या चिरकालिक असतात. गृहिणी व माता या भूमिकांना पारख्या झालेल्या राजलक्ष्मीच्या हृदयाचे आर्त आक्रंदन, मलिन झालेला जीवनप्रवाह, पश्चात्तापाने व हृदयाच्या पावित्र्याने शुद्ध करण्याचा तिचा अट्टाहास श्रीकांतला जाणवलेल्या प्रकृतीच्या विराट खेळाचाच एक भाग आहे याची जाणीव वाचकाला होते.

श्रीकांत व राजलक्ष्मी हे दोन ग्रह एकमेकांभोवती फिरत असता कधी जवळ येतात तर कधी दूर सरकतात. त्यांचे एकमेकांवर कितीही प्रेम असले तरी त्या अखेरीस मानवी व्यक्ती असल्यामुळे, त्यांच्या स्वतःच्या मर्यादांचे, स्वभावविशेषांचे, जाणिवांचे, त्यांच्या मानापमानविषयक व मूल्यविषयक कल्पनांचे छेद, या कधी न संपणाऱ्या प्रेमाला अधूनमधून जात असतात. यातूनच राजलक्ष्मीची प्रेमभावना अधिक शुद्ध व व्यापक होत गेलेली आहे व तिचे व्यक्तिमत्त्व अधिक उन्नत होत गेलेले आहे. राजलक्ष्मीचा सावत्र मुलगा बंकू याच्या विवाहाप्रीत्यर्थ ब्रह्मदेशातून रजा घेऊन श्रीकांत मायदेशी परत येतो; परंतु अलाहाबादला जरा फेरफटका मारून येऊ असे राजलक्ष्मी सुचवते तेव्हा तो टाळाटाळ करतो. तिकडचे ओळखीचे लोक त्याला तिच्याबरोबर पाहतील ही भीती ! राजलक्ष्मी याबद्दल त्याला टोमणा देते, तेव्हा तो एकदम कबूल करून टाकतो की, माणूस म्हणून तो तिच्यापेक्षा खालच्या पातळीवर होता. तो म्हणतो, 'लक्ष्मी, तुझ्यासाठी मी वाटेल त्या गोष्टीचा त्याग करीन; परंतु अब्रूचा त्याग कसा करू ?' राजलक्ष्मीला वाटते, अब्रूचा, प्रतिष्ठेचा त्याग करायला जे प्रेम तयार होत नाही ते खरे प्रेम कसे ? तरीही, आपले काही आग्रह वा दृष्टिकोन शाबित करण्याचा व तिच्या प्रेमासाठी कुठपर्यंत जाण्याची श्रीकांतच्या मनाची तयारी आहे हे पाहण्याचा राजलक्ष्मी मधून मधून प्रयत्न करते. अब्रूचा त्याग कसा करू असे श्रीकांत विचारतो तेव्हा त्या दिवशी मुद्दामच त्याला न विचारता ती गाण्याच्या मैफलीला जाऊन येते. भगवंताच्या दृष्टीने हा गाण्याचा पेशा अमंगल थोडाच होता ? आणि वाटेल त्याच्यापुढे जाऊन ती थोडीच गाणार होती? परंतु भगवंताची दृष्टी काहीही असली तरी समाजाची दृष्टीही अशा बाबतीत डावलून चालण्यासारखे नव्हते, असे उत्तर श्रीकांतने दिले आहे. गाण्या-

बजावण्याचा मोह सोडणे कलावंत राजलक्ष्मीला कठीण गेले असते; पण तिने हा पेशा चालू ठेवला तर समाजाच्या दृष्टीने श्रीकांतला कमीपणा येणार नव्हता काय ? भविष्यातल्या या अपमानास्पद परिस्थितीतून तिने त्याला आताच मुक्त करावे अशी तिला विनंती करून तो तिच्यापासून दूर होतो.

तथापि आपल्या गावी जाऊन एकाकी स्थितीत तो आजारी पडतो. त्याचे पैसेही चोरीला जातात. तेव्हा राजलक्ष्मी स्वतःच तेथे नोकर, गाडी इ. सरंजामासह उपस्थित होते. ती त्याच गावची, अर्थात सर्वजण तिला ओळखतात. 'मेलेली' राजलक्ष्मी अजून एक पतिता म्हणून जिवंत आहे हे सर्वांना कळून येते. 'अन्नाचा त्याग कसा करू ?' असे विचारणाऱ्या श्रीकांतला योगायोगाने तिच्याकडून हे असे उत्तर मिळते व त्याच्या स्वास्थ्यापलीकडे तिला कशाचीच पर्वा नव्हती हे त्याला पुन्हा एकदा अशा तऱ्हेने स्पष्ट होते. गावच्या लोकांसमोर स्वतःचीही अब्रू अशा तऱ्हेने मांडण्याचे धाडस तिने सहजपणे केलेले पाहून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे व सर्वत्यागी प्रेमाचे सामर्थ्य व आकर्षण तो पुन्हा एकदा मनोमन मान्य करतो व आपल्या निरुद्देश जीवनाचे सुकाणूच तिच्या हाती सोपवून स्वस्थ बसण्याचे ठरवतो.

हवापालटासाठी त्याला राजलक्ष्मी गंगामाटी नामक खेड्यात घेऊन जाते. तिने केव्हा तरी हा गाव विकत घेतलेला असतो. त्यांना ओळखणाऱ्या जगापासून दूर राहून श्रीकांतबरोबर शांतपणे कालक्रमणा करावी असा तिचा मानस असावा. ऐहिक ऐश्वर्य व धनसंपत्ती बाजूला ठेवून केवळ श्रीकांतच्या आधाराने आपण राहावे असेही तिचे एक स्वप्न असते; परंतु या वास्तव्यातही पूर्व-जीवनातल्या पापाच्या जाणिवेतून तिची सुटका होत नाही. स्वतःचा गायकीचा पेशा सोडून देऊन ती श्रीकांतबरोबर दूर या खेड्यात राहिली तरीही स्वतःच्या अशुद्धतेची जाणीव तिला जाळत राहाते. पिंजऱ्यात सापडलेल्या पाखराची तडफड व्हावी तशी तिच्या मनाची तडफड होत राहाते. सुनंदेच्या एका विद्वान व ध्येयवादी ब्राह्मणीच्या मदतीने ती धर्मकर्माने स्वतःला शुद्ध बनविण्याचा अट्टाहास करते. धर्मकर्म, व्रतवैकल्ये, उपासतापास यांचा पगडा कोणत्याही हिंदु स्त्रीप्रमाणे तिच्याही मनावर पूर्वीपासून होताच; पण धर्माचरणाच्या या खटाटोपात ती श्रीकांतपासून दूर जाऊ लागते व तिच्याकडून त्याची नकळत उपेक्षाही होते. स्वतःच्या झालेल्या उपेक्षेबद्दल तिला मनोमन क्षमा करून व आपल्यावरचे प्रेम हा तिच्या मोक्षसाधनेतील अंतरायच आहे हे जाणून श्रीकांत पुन्हा ब्रह्मदेशला जाण्याचे ठरवतो. तेव्हा राजलक्ष्मीही त्याच्यापासून कायमचे दूर होण्याचा एकमेव उपाय म्हणून काशीला आपल्या गुरुदेवांकडे जाऊन केस कापून टाकून संन्यासिनी बनून राहाते. ब्रह्मदेशला जाण्यापूर्वी तिला एकदा भेटून जावे म्हणून काशीला गेलेला श्रीकांत तिचे हे नवे रूप पाहून हतबुद्ध होतो. एकदम उडी मारून ती एवढा पल्ला गाठील याची त्याला कल्पना नसावी.

प्रेम हा एक मोह आहे असे वाटून राजलक्ष्मीने घेतलेला हा पवित्रा केलेला हा प्रयत्न अर्थातच फसतो. गावचे एक आजोबा गळेपडूपणाने श्रीकांतचा विवाह पुंटूशी लावून देण्याचे ठरवतात, तेव्हा राजलक्ष्मीला आपल्या भावनेची खरी पारख होते. सर्व जगजाव्य क्षणार्धात उधळून देऊन ती श्रीकांतच्या पायांशी हजर होते. श्रीकांतला लिहिलेल्या पत्रात तिने म्हटले आहे, 'अगदी सहज तुम्ही माझ्या पकडीत आला असं तुम्हाला वाटतं ? अनेक कष्टांनी, अनेक आराधनांनी मी तुम्हाला धरून ठेवलंय. आता सुटून जाण्याचा अधिकार तुम्हाला नाही. माझा त्याग करायचा मालकी हक्क तुमच्या हाती नाही... तुम्ही लग्न केलं तर कोणत्या तोंडानं मी बंकूसमोर उभी राहू ? हा अपमान कसा सहन होईल मला ? आणि उद्या तुमची प्रकृति बिघडली तर तुमच्याकडे पाहणार कोण ? पुंटू का ? आणि मी तुमच्या खोलीच्या बाहेर उभी राहून, नोकराचाकरांकडून का मी तुमची खबर विचारू ? असल्या परिस्थितीत मी जगावं असं का तुम्ही म्हणता ?... केव्हा तरी एक दिवस माझ्या पापाचा शेवट होईल अशी आशा होती. मी निष्पाप होईन ! का मला अशी आशा वाटली ? स्वर्गासाठी नव्हे–मला तो नको आहे. माझी कामना एकच मेल्यानंतर पुन्हा एकदा जन्म मिळावा. याचा अर्थ काय कळला का ?'

श्रीकांतवरचे तिचे प्रेम व त्या प्रेमाला प्रतिसाद मिळाल्यामुळे आलेली संपन्नता, हाच तिचा मोक्ष होता. कारण एखाद्या संसारी, सुखी, पतिपरायण स्त्रीच्या व तिच्या मूळ मनोवृत्तीत फरक नाही. श्रीकांतबद्दलचे प्रेम हा मोह आहे, या कल्पनेच्या पकडीतून सुटून तोच तिचा मोक्ष आहे; या कल्पनेप्रत ती आता पोहोचते; कारण प्रेम हेच सामान्य भारतीय स्त्रीच्या जीवनातले सर्वांत मोठे मूल्य आहे, मग ती पवित्र असो की पतित असो, याची जाणीव तिला होते. श्रीकांतवरच्या प्रेमामुळेच तिच्या मनातल्या शुद्धतेला उजळा मिळतो. आतापर्यंत सैरभैर झालेल्या तिच्या मनाला श्रीकांत परत मिळाल्याने आता पूजा–अर्चा, देवदर्शन या गोष्टी शक्य होतात.

उलट, राजलक्ष्मीच्या प्रेमाचे बंधन श्रीकांतने मानले असले तरी त्याची वृत्ति मूलतः अलिप्त आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट करण्यासाठी वैष्णवींच्या आखाड्यातला त्याचा अकल्पित मुक्काम शरदच्चंद्रांनी मुद्दाम योजलेला आहे. कृष्णमूर्तीची अहोरात्र सेवा करणाऱ्या व भक्तिरसात अहर्निश डुंबत राहणाऱ्या या वैष्णवसंप्रदायाबद्दल प्रथम त्याला तितकेसे आकर्षण वाटत नाही. हा एक वेड्यांचा बाजार आहे असे त्याला वाटत राहाते. तथापि जीवन कृष्णार्पण करून निरिच्छ होण्याची ही भूमिका त्याच्या वृत्तीशी मुळातच जुळणारी; शिवाय कमललतेच्या उदाहरणामुळेही त्याला ही भूमिका आकर्षक वाटू लागते. कमललतेची कहाणी काहीशी अन्नदेसारखीच. श्रीकांतची स्नेहल व निरासक्त वृत्ती पाहून कमललता त्याला आपला पूर्वेतिहास सांगते. या कथनामुळे आपले मन हलके होऊन, पापाच्या कबुलीमुळे आपण पापमुक्त होऊ असेही तिला वाटले असावे. तिच्या मृत पतीचे नाव 'श्रीकांत' असल्यानेही तिचे मन श्रीकांतकडे ओढले गेले असावे. दोन-तीन दिवस या मठात राहिल्यावर श्रीकांतला तेथील प्रशांत वातावरण आवडू लागते. पहाटे कमललता बागेत फुले काढण्या-

**श्रीकांतवरचे प्रेम व त्या प्रेमाला प्रतिसाद मिळाल्याने आलेली संपन्नता हाच तिचा मोक्ष.**

साठी जाते तेव्हा तो तिच्याबरोबर जातो. ती गात असते, 'धावत तिच्याजवळ जाऊन काही तरी बोलावं आणि काळोखात तिचा हात धरून चालू लागावं असं फार फार वाटलं. तिला राग येणार नाही, ती नाही म्हणणार नाही असं जरी मला वाटत होतं तरी माझं पाऊलही उचलेना आणि तोंडातून शब्दही फुटेना. जसा चालत होतो तसाच हळूहळू जपून चालत, एक शब्दसुद्धा न बोलता, झाडीच्या बाहेर येऊन पोहोचलो.'

परत जाण्यासाठी गाडीत बसल्यावरही त्याला कमललतेच्या निर्मळ भावनेची सारखी आठवण होत राहाते. वैष्णव कवि–हृदयातल्या अश्रुजलासारखे तिचे जीवन ! भाषा व छंद सदोष असले तरी अंतःकरणाला चटका लावणारे ! ती म्हणाली होती, 'चला ना गोसाई, आपण येथून निघून जाऊ ! रस्तोरस्ती गात गात उभयता कसे तरी दिवस काढू !' श्रीकांतचा मुसलमान बालमित्र गोहर हा एक आपभोळ्या स्वभावाचा कवि होता व त्याचे कमललतेवर प्रेम जडलेले होते. त्या बंद प्रेमाचे कवाड उघडले जाऊ नये म्हणूनच कमललता हा मठ सोडून जाऊ इच्छित होती, हे श्रीकांतच्या लक्षात येते. तथापि श्रीकांतची तिला भीति वाटत नव्हती. त्याच्यामुळे तिच्या साधनेत विघ्न येणार नव्हते. आपल्या बऱ्यावाइटाचा भार स्वतःच्या माथ्यावर घेऊन राजलक्ष्मीप्रमाणे तिने आपल्याला दुबळा बनवून ठेवले नसते, असे श्रीकांतला वाटले; पण वैष्णवांचा हा भक्तिरस सत्य होता की मिथ्या ? कृष्णभक्तीने इतके विव्हल होणे, तेच आयुष्याचे ध्येय मानणे, ही स्वतःची एक फसवणूकच नव्हती काय ? पण उलट, केवळ अश्रद्धा व उपहास यांच्या आधारावर या जगातले मोठ्यातले मोठे तत्त्व कुणाला लाभले आहे का ? श्रीकांतला वाटले, घरी गेल्यावर देण्याघेण्याचे सर्व व्यवहार पूर्ण करावेत व पुन्हा या आखाड्यात येऊन राहावे. जाऊ दे ती नोकरी, जाऊ दे तो ब्रह्मदेशचा प्रवास !

या अनासक्त व अलिप्ततेच्या, भावनेच्या व कमललतेच्या निःसंग आकर्षणाच्या ओढीतून त्याची पुन्हा एकदा सुटका करण्यासाठी राजलक्ष्मीला कमललतेची भूमिका घ्यावी लागलेली आहे. भक्तिरसाची ही गोडी व प्रशांत जीवनाचे हे समाधान तिला अज्ञात नव्हते. तटस्थ व प्रशांत जीवनाबद्दलचे श्रीकांतचे आकर्षण ती पूर्णपणे समजू शकत होती. ते श्रीकांतला स्पष्ट करण्यासाठी ती मुद्दाम त्याला पुन्हा वैष्णवांच्या त्या आखाड्यात घेऊन जाते, कमललतेशी गट्टी करते, वैष्णवांची भक्तिगीते त्याच्यापेक्षाही अधिक उत्कटतेने व रसपूर्णतेने गाऊन दाखवते. ती आपल्या संगीताने जे वातावरण निर्माण करते त्यामुळे द्वारकादास गुरुजींच्याच नव्हे तर श्रीकांतसकट सर्वांच्याच डोळ्यांतून आसवे ओघळू लागतात. आपल्या भक्तिरसपूर्ण हृदयाची व आध्यात्मिक पातळीची अशा तऱ्हेने ग्वाही दिल्यानंतर श्रीकांतला घेऊन राजलक्ष्मी परत कलकत्त्याला येते. पुन्हा गंगामाटीला जाऊन आनंदभैय्याच्या सहकार्याने गरीब जनतेची सेवा करण्याचे तिचे बेत सुरू होतात. शारीरिक प्रकृति व एकलकोंडा स्वभाव यामुळे श्रीकांत मात्र त्यात फारसे लक्ष घालीत नाही. मोकळा वेळ मिळाल्याने तो हे 'आत्मचरित्र' लिहिण्याचे काम सुरू करतो. राजलक्ष्मीच्या व त्याच्या नात्याला आता स्थैर्य प्राप्त झाले आहे. त्याच्यावरील प्रेमामुळेच तिची अंतःशुद्धि झालेली आहे व इतक्या वर्षांची तिच्या अंतःकरणाची तगमग थांबून तिचे प्रेम श्रीकांतच्याही हृदयात सुप्रतिष्ठित झालेले आहे; परंतु कादंबरीचा शेवट राजलक्ष्मी करीत नाही. शेवटच्या पानावर शरदचंद्रांनी वाचकांसमोर कमललतेचीच मूर्ति उभी केलेली आहे. गोहरच्या आजाराची बातमी कळल्याने त्याला भेटायला गेलेल्या श्रीकांतला त्याची उत्तरक्रियाच करावी लागते ! गोहरची आजारात शुश्रूषा केल्यामुळे कमललतेला आखाडा सोडून जाणे भाग पडते. कुणाकडून कसलीच मदत न घेता ती श्रीकांतकडून फक्त वृंदावनपर्यंतचे गाडीचे तिकिट काढून घेते. गाडी सुरू होताना ती त्याच्याजवळ एवढेच मागणे मागते, 'माझ्याबद्दल तुम्हाला किती लोभ वाटतो ते मी जाणते. आज श्रद्धा ठेवून तुम्ही मला देवाच्या पायावर घालून निर्भय व्हा ! माझी काळजी करीत यापुढे मनाला लावून घेऊ नका गोसाई, एवढीच प्रार्थना आहे !'

घरच्या श्रीमंतीकडे पाठ फिरवून तरुण वयातच समाजसेवेसाठी, दुसऱ्याच्या दुःखाचा भार स्वतःच्या शिरावर घेण्यासाठी संन्यासी झालेल्या वज्रानंदाचे व राजलक्ष्मीचे जे स्नेहसंबंध निर्माण होतात त्यात शरदबाबूंनी अपार माधुर्य ओतले आहे, तिची आपुलकी पाहून सद्गदित झालेला वज्रानंद म्हणतो. 'हा मोठा विचित्र देश आहे ! जागोजाग कशा मायबहिणी भेटतात. त्यांचा लोभ सोडून पुढे जाणे कठीण !' या वज्रानंदाच्या मदतीनेच राजलक्ष्मीच्या व्यक्तिमत्त्वाला शेवटी एक विशिष्ट उंची प्राप्त झालेली आहे. त्याचे तरुण वय पाहून कळवळणारी व त्याला परत त्याच्या घरी पाठवून देण्याचा प्रयत्न करणारी राजलक्ष्मी आणि त्याच्या प्रेरणेने शेवटी दरिद्री समाजाच्या सेवेकडे वळलेली राजलक्ष्मी या दोन व्यक्तिमत्त्वांत पुष्कळच अंतर आहे. तिचे हृदय प्रथमपासूनच मायाममतेने व सहानुभूतीने भरलेले असते, आपल्या जीवनात तिने अनेकांना अनेक प्रकारे मदत केलेली असली, तरी आनंद संन्याशाच्या उदाहरणाने व मार्गदर्शनाने तिचे औदार्य व मानवता अधिक विशाल व डोळस होतात. या कार्याला अधिक व्यापक व विधायक स्वरूप आल्यावर तिच्या हृदयाचा दाह शांत होण्याचा पुष्कळच संभव आहे. अलिप्तपणे वावरणाऱ्या श्रीकांतला जे करता येत नाही; परंतु जे करायला त्याला आवडले असते तेच कार्य आता राजलक्ष्मी वज्रानंदाच्या मदतीने सुरू करते. राजलक्ष्मीचे व्यक्तित्व आता एक प्रकारे श्रीकांतच्या व्यक्तिमत्त्वाला पूरक असे बनले आहे. ती आता श्रीकांतवर भावविवशतेने प्रेम करणारी एक तरुणी नाही, एक कलावंतही नाही. आपल्या दुर्गतीच्या पश्चात्तापाने पोळणारी व धर्मकर्माने मोक्ष व पापविमोचन साधू पाहणारी एक अभागी पतिता नाही. श्रीकांतच्या प्रेमाचा प्रत्यय आलेली, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण आकलन झालेली व त्या आत्मविश्वासाने तृप्त झालेली, पापाच्या जाणिवेने आलेल्या वैफल्यातून बाहेर पडलेली आनंदमयी आहे. म्हणूनच द्वारकादासजींनी सुचविलेला 'कंठीबदल' करून श्रीकांतशी वैष्णवांच्या पद्धतीने विवाह करण्याचीही तिला आता आवश्यकता वाटत नाही. तथापि द्वारकादासजींनी तिला अंतःप्रेरणेने जे 'आनंदमयी' असे नाव ठेवले त्या नावाला ती आता अंतर्बाह्य पात्र ठरलेली आहे.

चार भागांच्या या प्रदीर्घ कादंबरीत असंख्य घटनांचा व व्यक्तींचा समावेश झालेला असला व शरदचंद्रांची सामाजिक जाणीव, देशप्रेम व सुधारणावाद या गोष्टी ठायी ठायी दिसत असल्या, तरी श्रीकांत व राजलक्ष्मी यांचे मधुर व अमर प्रेम व त्यांचे संदिग्ध परंतु प्रगल्भ होत जाणारे नाते, या केंद्रबिंदूभोवती सर्व प्रसंगांची व व्यक्तिरेखांची गुंफण मोठ्या कुशलतेने करण्यात आलेली आहे. शरदबाबूंनी अनेक पतितांची चरित्रे रंगविली; परंतु आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेकविध पैलूंनी व त्यांतील अवीट माधुर्याने राजलक्ष्मी वाचकांना अविस्मरणीय होऊन राहिली आहे. कादंबरी वाचून संपल्यावर अनेक रूपांत ती आपल्या नजरेसमोर उभी राहते. कानातले डूल नाचवून चटचाळपणे बोलणारी राजलक्ष्मी, 'लग्न करून आता संसारी व्हा' म्हणून अधूनमधून श्रीकांतला गंभीरपणे उपदेश करणारी राजलक्ष्मी, घरकामात गुंतलेल्या नाजूक हातांची, घर शृंगारण्याचे असामान्य कौशल्य असलेली, झाडाखाली मुक्काम ठोकला तरी पाहता पाहता

तिथे सौंदर्य निर्माण करू शकणारी राजलक्ष्मी, 'एवढंसं खाता येत नाही तर संन्यासी कशाला झालात?' असं म्हणून वज्रानंदाशी प्रेमळ थट्टामस्करी करणारी, अभया व रोहिणीबाबू यांपैकी अधिक उत्कट प्रेम व त्याग कुणाचा यावाबत श्रीकांतशी वाद करून रोहिणीबाबूंचाच त्याग मोठा असे शाबित करू इच्छिणारी राजलक्ष्मी, श्रीकांत ब्रह्मदेशात असताना उपासतापास करून क्षीण झालेली, तो परत आल्यावर बालकाप्रमाणे मान वेळावून, 'लोक म्हणतात की मी फार कुरूप झाल्येय खरं का हे?' असे त्याला विचारणारी आणि मग, 'रूपसंपदा घेऊन करायचं आहे काय मला? तुमच्याशी तर माझ्या कुरूपतेचा किंवा सुंदरपणाचा संबंध येत नाही ना?' असे सूचक भाष्य करणारी राजलक्ष्मी, नोकराचाकरांना काय वाटेल या विचाराने श्रीकांतला, तो आजारी असतानाही मन घट्ट करून निरोप देणारी, तर कधी सर्वांसमक्ष त्याच्याजवळ त्याच्या शेजारी पलंगावर बसून तास–तास त्याला पंख्याने वारा घालत राहणारी राजलक्ष्मी, यदुनाथ तर्कालंकाराच्या दारिद्र्याने गहिवरणारी, डोंबाच्या मालतीला शिव्या देत देत मदत करणारी, रस्त्याने चालताना स्वतःच्या सावलीत मिसळून गेलेली श्रीकांतची सावली त्याला प्रेमाने दाखविणारी, 'या वेळी स्नान करायचं नाही बरं का, सांगून ठेवते!' किंवा 'दुधाची वाटी कशी संपली नाही अजून?' अशी प्रेमळ दमटाटी श्रीकांतबाबत करणारी राजलक्ष्मी, मग एक दिवस साधं पांढरं पातळ नेसून, दागदागिने टाकून, केस कापून, कठोर उपवासाचा रुक्ष तजेला चेहऱ्यावर धारण करून श्रीकांतसमोर उभी राहिलेली संन्यासिनी राजलक्ष्मी, मग पुन्हा, 'तीर्थयात्रेला गेले; पण देव दिसला नाही- त्याऐवजी तुमचा विरस झालेला चेहरा रात्रंदिवस नजरेसमोर दिसत होता' असं श्रीकांतजवळ कबूल करणारी, 'असं वाटतंय की, गुडगुडी घेऊन रतन येण्यापूर्वी दोन्ही हात तुमच्या गळ्याभोवती टाकून घट्ट कवटाळून धरावं, मग काय कराल? हात सोडून लोटून तर देणार नाही?' असे लडिवाळपणे विचारणारी, श्रीकांतने तिच्या वाढदिवसाला पाठविलेली बनारसी साडी नेसून दिवसभर स्वप्ने रंगवीत बसणारी राजलक्ष्मी, 'अहो नवे गोसाई, तुमच्या उदासीन मनाचा पत्ता त्या मेलीला कसा लागणार?' असे कमललतेबद्दल असूयेने पण लाडिकपणे विचारणारी राजलक्ष्मी आणि शेवटी, कमललतेपासून धडा घेऊन, अभिमान व भीती टाकून देऊन आपला सर्व पूर्वेतिहास श्रीकांतला ऐकवून, निर्भय व निर्मळ होऊ पाहणारी राजलक्ष्मी!

तिची बुद्धिमत्ता व लाघवीपणा, सौंदर्य व संगीतकला, संसारदक्षता व व्यवहारनिपुणता, माणुसकी व औदार्य आणि तिच्या भावनांची मधुर उत्कटता यामुळे श्रीकांतप्रमाणे कादंबरीतील इतरही व्यक्तींना नेहमी वाटते, 'अशी कुणी पाहिली नाही!' तिच्या प्रेमाच्या व व्यक्तिमत्त्वाच्या जबरदस्त आकर्षणामुळे, दूर जाऊ पाहात असताही भूलभुलैयात सापडल्याप्रमाणे आपण फिरून परत तिच्याकडे कसे ओढले जातो याचे श्रीकांतला नेहमी आश्चर्य वाटते; परंतु तिच्या एकंदर गुणसमुच्चयामुळे तिचे व्यक्तिमत्त्वच विलक्षण आकर्षक व समर्थ आहे. 'नरकात चला' असे तिने म्हटले असते तरी तिच्याबरोबर जावेच लागले असते, असे भाष्य तिचा नोकर रतन याने केलेले आहे. गायिकेचा पेशा पत्करूनही तिने आपला घरंदाजपणा कायम राखला आहे. सुनंदेवर ज्याप्रमाणे दारिद्र्याचा परिणाम मुळीच झाला नाही, त्याचप्रमाणे राजलक्ष्मीच्या मनाची एक संपूर्ण बाजू पूर्वायुष्यातल्या तिच्या दुर्गतीपासून अलिप्त राहिलेली आहे. श्रीकांतशी भेट झाल्यावर तिच्या प्रेमाची जाणीव दिल्याशिवाय तिला राहवत नाही. तिची मूळ भूमिका 'चरित्रहीन' मधील सावित्रीसारखी आहे. प्रीतीला प्रतिसाद मिळेलच अशी तिची अपेक्षा नाही मिळाला तर त्या प्रेमाची परिणति काय हा प्रश्न श्रीकांतप्रमाणे तिच्या समोरही उभा होताच; परंतु प्रेमभावनेचा स्पर्शही जीवनाला उजळा देऊ शकतो आणि तेवढे तिला पुरे आहे.

अर्थात स्त्रीपुरुषांचे प्रेम ही भावनाच अशी आहे की, ती केवळ अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यात गाडलेली राहू शकत नाही. तिचे दर्शन प्रिय जनाला व इतरांनाही होते, तिला सामाजिक अस्तित्वही असते. ते अस्तित्व नाकारायचे, तर प्रेम केवळ मनाच्या खोल गाभाऱ्यात बंदिस्त करून ठेवावे लागेल. प्रेमविषयालाही आपल्या प्रीतीचे दर्शन न घडवणे, हाच प्रेम 'प्लेटॉनिक' पातळीवर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. शरदचंद्रांच्या नायिका बहुधा तसे करीत नाहीत. कारण आपल्या विशुद्ध प्रेमाचा त्यांना विलक्षण अभिमानही असतो. तिच्या सहवासात राहण्यात श्रीकांत कमीपणा मानीत नाही हे दिसून आल्यावर प्रेमाला मिळालेल्या प्रतिसादाच्या आनंदाबरोबरच, या प्रेमाचा शेवट कुठे आहे हा प्रश्न राजलक्ष्मीच्या मनापुढे पुन्हा उभा राहातो. या प्रश्नाचा निकाल लावण्याची श्रीकांतला घाई नाही. 'प्लेटॉनिक' प्रेमाची कल्पना त्याला मान्य आहे. तसेच सामाजिक अब्रूचा संपूर्ण त्याग करून बंडखोर म्हणून मिरवायला त्याला नको आहे म्हणूनच प्रीतीच्या फलश्रुतीच्या अभावाचे दुःख तोही सहन करू शकतो. अभयेने एकदा म्हटल्याप्रमाणे या दुःखाचा अनुभव सुखाचेच स्वरूप धारण करू शकतो.

तथापि प्रियजनाची सेवा करण्याची इच्छा हा त्या काळच्या बंगाली स्त्रीच्या प्रेमभावनेचा एक अपरिहार्य भाग आहे. समोर बसवून त्याला खायला घालणे, आजारात त्याची सेवाशुश्रूषा करणे, या सुखाला मुकण्याची राजलक्ष्मीच्या मनाची तयारी नाही. आता तिची अपेक्षा वाढलेली आहे. त्यामुळे श्रीकांतच्या प्रकृतीचे निमित्त करून ती त्याला नेहमीच्या जगापासून दूर, गंगामाटीला घेऊन जाते; पण पापाच्या जाणिवेने तडफडणारे तिचे मन धर्माच्या आधारे श्रीकांतपासून दूर जाण्याचा, त्याच्याविषयीच्या प्रेमभावनेचा निरास साधण्याचा प्रयत्न करते. तो निरास अशक्य आहे या सत्याच्या दर्शनाबरोबरच, तो अनावश्यक आहे या सत्याचेही शेवटी तिला दर्शन होते. श्रीकांतच्या प्रेमाचा एकदा विश्वास मिळाल्यावर त्या जाणिवेच्या मदतीने पुढील काळात तिला अनेक सत्यांचे आकलन झालेले आहे व तिची जीवनदृष्टी अधिक व्यापक होत गेलेली आहे. प्रेम ही भावना माणसाला नेहमी उन्नतच करते, खाली लोटू शकत नाही. जे सामाजिक संकेत केवळ क्षुद्र व पारंपारिक असतील ते मोडण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. मात्र त्यापासून सुख होणार की दुःख हे त्या त्या व्यक्तीच्या मानसिक व आध्यात्मिक सामर्थ्यावर अवलंबून राहील. देवधर्माच्या कर्मकांडापेक्षा प्रियजनाच्या आणि दलित समाजाच्या खऱ्याखुऱ्या सेवेने अधिक मनःशांति मिळू शकते व व्यक्तित्व अधिक उदात्त व उन्नत होऊ शकते. या सर्व सत्याचे आकलन राजलक्ष्मीला हळूहळू होत गेले आहे. तिचे काशीचे गुरुदेव, श्रीकांत, अभया, आनंदभैया यांची अप्रत्यक्ष मदत तिला झालेली असली, तरी हे सर्व शिक्षण तिने स्वतः अनुभवातून मिळवले आहे.

श्रीकांतला कलंकित न करता त्याच्या सहवासात राहून त्याच्यावर प्रेम कसे करायचे ही राजलक्ष्मीची समस्या होती. तसे करता येते हे ज्या वेळी तिच्या अंतर्मनाला निःसंदेह कळून आले त्या वेळी कादंबरी संपली म्हणूनच वरवर विस्कळित दिसणाऱ्या या कादंबरीचा आकृतिबंधही रेखीव आहे. श्रीकांतच्या तटस्थतेमुळे राजलक्ष्मीच्या या धडपडीतून तिची ही अध्यात्मिक प्रगती झालेली आहे; परंतु श्रीकांतची तटस्थता व निरीक्षकवृत्ति ही एका सहृदय, रसिक व तत्त्वशोधक माणसाची तटस्थता असल्याने, त्याच्या संदिग्ध नात्यात विलक्षण माधुर्य व सौंदर्य प्राप्त झालेले आहे.

शरदचंद्रांनी आपल्या भटक्या जीवनातील बरेचसे अनुभव या कादंबरीत ग्रथित केलेले आहेत, ही कादंबरी एक प्रकारे आत्मपर आहे, हे उघडच आहे. शरदबाबू आपल्या पूर्वायुष्याबद्दल कधीच बोलत नसत. तरी मित्र अनेकदा विचारीत: 'राजलक्ष्मी कोण? ती कुठे भेटली?' शरदबाबू एवढेच उत्तर देत– 'ती एक मनगढन्त कथा आहे.' तथापि ही कादंबरी आत्मपर आहे या जाणिवेमुळे, ती वाचताना एका आगळ्याच आनंदाचा अनुभव वाचकाला येतो. ☐

( पुढील अंकात 'गृहदाह' )

## रंगभूमी

# लेखक–दिग्दर्शक संबंध

वि. भा. देशपांडे

'नाट्यसंहिता–चित्रपट–पटकथा निर्मितीच्या संदर्भात लेखक–दिग्दर्शक–संबंध ' या विषयावर पुण्यात नुकताच एक परिसंवाद झाला. निमित्त थिएटर अँकॅडमी या संस्थेचा वर्धापनदिन. या परिसंवादात वक्ते होते विजया मेहता, जब्बार पटेल आणि विजय तेंडुलकर. अध्यक्ष होते पु. ल. देशपांडे.

दिग्दर्शिका या नात्याने नाटककार तेंडुलकरांचा आणि आपला सहप्रवास रंगायनपूर्व आणि रंगायनमध्ये कसा घडला याचा आढावा घेऊन विजया मेहता म्हणाल्या की, 'मानवी जीवनातील नाट्यबिंदू नाटककार हुडकतो. या प्रक्रियेत त्याला काही व्यक्ती सापडतात. या व्यक्तींच्या एकत्र येण्यातून संघर्ष निर्माण होतो आणि नाटककार त्याला नाटकाचा आकार देतो. नाटककाराने पकडलेले नाट्यबिंदू लक्षात घेऊन ते रंगमंचावर मूर्त स्वरूपात प्रभावीपणे उतरविणे हे दिग्दर्शकाचे काम असते. मात्र नाटक लिहिताना नाटककार अनेकदा नाटकातील शब्दांच्या, पात्रांच्या प्रेमात पडतो. त्यामुळे नाटकाच्या इतर अंगांवर अन्याय होण्याची शक्यता असते. या सर्व बाबी प्रेक्षकाच्या दृष्टिकोनातून लक्षात घेऊन नाटककाराला आवश्यक बदलांसाठी सूचना करणे हे दिग्दर्शकाचे काम असते. एका अर्थाने दिग्दर्शक हा नाटककाराचा सर्वांत मोठा मित्र आणि टीकाकार असतो. परस्परांच्या क्षमतेविषयी आदर आणि विश्वास असेपर्यंत नाटककार–दिग्दर्शकाचे संबंध सलोख्याचे असतात; पण काही वेळा हे दोघे एकमेकांच्या प्रांतात घुसण्याचा प्रयत्न करू लागतात आणि तेथेच भांडणाला, मतभेदांना आरंभ होतो. आपल्या विवेचनासाठी विजयाबाईंनी तेंडुलकरांच्या काही एकांकिकांचा आणि नाटकांचा उदाहरणांसाठी वापर केला. हा सहप्रवास कसा घडला हे सांगता सांगताच त्या म्हणाल्या की, नाटककार हाच दिग्दर्शक असला तर फारच उत्तम. म्हणून सर्वांनी पु. ल. देशपांडे व्हावे असेही त्यांनी शेवटी गमतीने सांगितले. तेंडुलकरांच्याप्रमाणेच दळवी, कानेटकर, अनिल बर्वे आदींच्या नाटकांचे दिग्दर्शनही विजयाबाईंनी केलेले आहे. त्यातल्या काही नाटकांच्या संदर्भात ( विशेषतः लेखक–दिग्दर्शक–संबंधात ) काही वाद निर्माण झालेले नाट्यवर्तुळात माहीत आहेत. त्यांचा उल्लेख करून मूळ मुद्द्यांचे विवेचन अधिकतेने केले जाईल असे वाटले होते; पण बाईंनी आपल्या मुद्द्यांचा विस्तार न करता थोडक्या वेळातच भाषण संपवले.

जब्बार पटेलचा संबंध नाटककार-चित्रपट कथालेखक म्हणून तेंडुलकरांशी गेले काही वर्षे आहेच. तसेच 'तीन पैशाचा तमाशा ' या नाटकाच्या निमित्ताने पु. ल. देशपांडे यांच्याशी आलेला आहेच. नाटकाच्या संदर्भात दिग्दर्शक म्हणून विशेष संघर्ष आले नाहीत, चित्रपटाबाबत काही संघर्ष-प्रसंग आले याचा उल्लेख त्याने केला. या संबंधात बोलताना जब्बर म्हणाला, नाटक हे लेखकाचे तर चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे. चित्रपटकथेला आपल्याकडे साहित्याचा दर्जा लाभत नाही अशीही खंत त्याने व्यक्त केली.

विजयाबाई आणि जब्बार यांनी आपल्या विषयाचे प्रतिपादन करताना नाटककाराचे ( विशेषतः तेंडुलकरांचे ) व्यक्तिगत संबंध कसे आले, कसे राहिले किंवा संपले यांचा ठळकपणाने उल्लेख केला. स्वाभाविकच विजय तेंडुलकरांनाही तो व्यक्तिगत संबंधाचा धागा पकडूनच आपल्या विवेचनाला आरंभ करावा लागला. वास्तविक व्यक्ती म्हणून किंवा कलावंत म्हणून व्यक्तिसंबंधात बोलण्याचा तेंडुलकरांचा स्वभाव नाही; पण एकूणच परिसंवादाची दिशा त्या पद्धतीने गेल्याने त्यांनाही त्या वाटेने जावे लागले. या संदर्भातले आवश्यक तपशील देऊन तेंडुलकरांनी काही मुद्द्यांची मांडणी नेमकी आणि स्पष्टपणाने केली. नाटक-चित्रपट ही दोन्हीही माध्यमे किंवा क्षेत्रे सध्या लेखकांवरच अवलंबून आहेत हे स्पष्ट करून ते म्हणाले की, त्यामुळे नाटकाचा लेखक–दिग्दर्शकसंबंध यात फारसा फरक आहे असे मला वाटत नाही. दिग्दर्शकाच्या कलात्मक ताकदीबद्दल यथायोग्य आदर राखून ते म्हणाले की, दिग्दर्शक हा एखाद्या गायक, चित्रकाराप्रमाणे सृजनशील असतो; पण नाटकाच्या आशयाच्या बाबतीत माझ्या सृजनशीलतेवर एखादा दिग्दर्शक स्वार होण्याचा प्रयत्न करीत आहे असे मला वाटल तर माझे भांडण होते. माझ्या नाटकातल्या आशयाशी मी दिग्दर्शकाला खेळू देत नाही. कारण नाटक मी माझ्यासाठी लिहितो. माझ्या तब्येतीत लिहितो. कोणत्याही दिग्दर्शकासाठी लिहीत नाही.

नाटकाच्या संदर्भातले विवेचन करता-करताच ते चित्रपटांच्या विषयाकडे वळले. त्यावर अभिप्राय व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, दिग्दर्शक हाच चित्रपटाचा खरा लेखक असतो; पण भारतीय चित्रपटसृष्टी अजूनही चित्रपटासाठी कथालेखकांवरच अवलंबून राहिलेली आहे. चित्रपटसृष्टीत दिग्दर्शक अनेक आहेत; पण फिल्ममेकर एकच आहे. तो म्हणजे सत्यजित रे ! सत्यजित रेंच्याबद्दल तेंडूलकर थोडक्यात पण फारच जाणिवेने बोलले. त्यांच्यासाठी पटकथा लिहिण्याचे ठरले होते; पण ते घडले नाही. आता रेंच्या तब्येतीमुळे ते कितपत चित्रपटनिर्मिती करतील ही शंका आहेच. चित्रपटात सत्यजित रे आणि नाटकात पु. ल. देशपांडे हे दोन दिग्दर्शक आपल्याला लाभले नाहीत किंवा त्यांचा योग आला नाही याची खंतही तेंडुलकरांनी व्यक्त केली.

तेंडुलकरांनी अखेरीस सांगितलेला विचार विशेष मोलाचा वाटला. नुकताच त्यांना पद्मभूषण किताब मिळाला याबद्दल त्यांचा सत्कार करण्याचे थिएटर अँकॅडमीने ठरवले.

नेहमीचा सत्कार न करता त्या निमित्ताने चर्चा-परिसंवाद ठेवा असे तेंडुलकरांनी सुचवले. (हा परिसंवाद ठेवण्याचे तेही एक निमित्त होतेच.) या पद्मभूषण-सन्मानाबद्दल बोलताना तेंडुलकर म्हणाले की, माझा खरा सन्मान पद्मभूषणामुळे झालेला नाही तर 'घाशीराम कोतवाल' आणि 'सखाराम बाइंडर' ही माझी दोन नाटके जिद्दीने ज्या संस्थांनी-व्यक्तींनी चालवली, त्यासाठी मी जो लढा दिला तोच माझा सन्मान आहे !

परिसवादाचा समारोप करताना पु. ल. देशपांडे यांनी नाटककार-दिग्दर्शक यांच्या संदर्भात बोलताना नटाचे महत्त्व किती आणि कसे असते याची काही उदाहरणे सांगितली.

'नाटक-चित्रपटलेखक-दिग्दर्शक-संबंध' हा खरे तर परिसंवादापेक्षा चर्चेचा विषय आहे. अतिशय अलिप्त राहून या विषयाची चर्चा गांभीर्याने करणे महत्त्वाचे आहे; पण झाले असे की, हा कार्यक्रम जाहीरपणाने सर्वांसाठी ठेवला गेला. वक्ते लोकप्रिय आणि गर्दी खेचणारे असल्याने उदंड गर्दी झाली त्यात अशा गर्दीसाठी जी जागा अपुरी पडते ती टिळक स्मारक मंदिराच्या सभागृहाची जागा निवडली गेली. त्यामुळे चर्चा होऊन विचारांची देवाणघेवाण होणे, काही प्रश्नांचे, मुद्द्यांचे स्वरूप खोलवर शोधणे या गोष्टी अपेक्षित असतात; पण चर्चेचा परिसंवाद झाला की, त्याचे स्वरूपच पालटते. मग गर्दीसाठी म्हणून बोलावेच लागते. सारेच वेगळ्या स्तरावर जाते. म्हणूनच असे वाटले की, समारंभ वेगळे करावेत आणि चर्चा किंवा विचारांचे आदान-प्रदान या गोष्टी वेगळ्या ठेवाव्यात. थिएटर अॅकॅडमीचे संयोजक हे निश्चित करू शकतात इतक्या ताकदीचे आहेत. त्यांना आता केवळ गर्दीचे आकर्षण राहिले असावे असे वाटत नाही ! निदान ज्यांना नाटक-चित्रपट या कलामाध्यमांविषयी आस्था आहे अशा जिज्ञासूंसाठी, अभ्यासकांसाठी हे करता येईल.

चित्रपट

# विषय चांगला, मांडणी बरी

# लोग क्या कहेंगे

'जनाची नाही तर मनाची तरी बाळग' असं आपण म्हणतो, तर कधीकधी 'मनाची नाही तर जनाची तरी' असे म्हणायची वेळ येते; पण 'जनांचं' भय आपल्या मनातून कधीच जात नाही हे तितकेच खरे. एखादी गोष्ट करावीशी वाटली की, आपण सतरा वेळा विचार करतो. लोक काय म्हणतील ? 'लोक काय म्हणतील'चं हे भूत बऱ्याच वेळेला आपल्याला आपल्या मनाप्रमाणे वागू देत नाही. हे 'लोक' कोण याचा आपण विचार करतोच असेही नाही. लोकांचे नेहमीच बरोबर असते का याचाही विचार करण्याचे तारतम्य राहत नाही. 'लोक काय म्हणतील'च्या भयाने एकीच्या जिवाची कशी वाताहत झाली याचे चित्रण बी. आर. इशारांनी आपल्या नवीन 'लोग क्या कहेंगे' या चित्रपटात केले आहे.

चित्रपटाची कथा अतिशय विस्कळित आहे. रोमा ( शबाना आझमी )चे गोपाल (नवीन निश्चल) वर प्रेम आहे. रोमाच्या वडलांना ते मान्य नाही. तिचे जबरदस्तीने दुसऱ्याशी- डॉ. जीवनशी ( संजीवकुमार ) लग्न लावून दिले जाते. डॉ. जीवनला आधीचा एक गोपाल नावाचा मुलगा असतो. साधना ( अरुणा इराणी ) प्रेमी गोपालवर प्रेम करत असते. (दोन गोपालचा हा गोंधळ चित्रपटभर पिच्छा सोडत नाही.) तिने काही तरी खोटेनाटे सांगून रोमा-गोपालच्या प्रेमात बिब्बा घातलेला असतो. रोमाच्या लग्नानंतर गोपालची आणि तिची भेट होते. साधना खोटे बोलली होती हे कळल्यावर तिच्या अंगाचा तीळपापड होतो. समाजाने पवित्र मानलेला शरीरसंबंध-लग्न तिला मान्य नसतो. मनाने तिने गोपालशी लग्न केलेले असते. नवरा परदेशी गेलाय ही संधी साधून तिच्या आणि गोपालच्या गाठीभेटी सुरू होतात. मुलगा गोपाल या दोघांना बघून हे सगळं मी डॉ. जीवनना सांगेन अशी धमकी देतो.

इथेच पेचप्रसंगाला खरी सुरुवात. आपले आणि गोपालचे अनैतिक (जगाच्या दृष्टीने) संबंध उघडकीला आले तर लोक काय म्हणतील या विचाराने रोमा अस्वस्थ होते. एक तर मुलगा गोपाल तरी मेला पाहिजे किंवा आपण तरी जीवन संपवले पाहिजे, अशा निर्णयाप्रत रोमा काय वाटेल ते करायला तयार. तो मुलगा गोपालचा खून करायला तयार होतो. गोपालच्या आजीमुळे (नादिरा) गोपाल गोपालच्या प्रेतासकट सापडतो.

इथून पुढे हा चित्रपट शत्रुघ्न सिन्हाचा. तो वकील असतो. डॉ. जीवनचा मित्र. त्याचे नाव राम. साधनाच्या विनवणीवरून तो गोपालची केस घेतो. कसे कोण जाणे; पण गोपालने मुडदा गोपालचा खून केला असून रोमाने त्यापूर्वीच गोपालला मारले होते हे वकील रामच्या लक्षात येते. तो प्राणपणाने गोपालची केस लढवतो; पण गोपालला फाशीची शिक्षा होतेच.

इथेही, आपले व गोपालचे संबंध होते आणि त्यातूनच गोपालने गोपालचा खून केला हे उघडकीला आले तर लोक काय म्हणतील या विचाराने रोमा अस्वस्थच. आपल्या गोपालचा खून रोमानेच केला

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

असणार हे डॉ. जीवनच्याही लक्षात येते. रोमा त्याचे घर सोडून जाते. (कुठे जाते कळत नाही.) शेवटी रामचा युक्तिवाद पटून सत्यकथन करते, गोपालची फाशी चुकते वगैरे वगैरे.

या कथेत अनेक गोष्टी आपल्याला वारंवार खटकतात. रोमाच्या वागण्यात कुठंही सुसंगती नाही. लग्नानंतरचे तिचे वागणे—विशेषत: गोपालशी—सूडभावनेतून निर्माण झाल्यासारखे वाटते. तिच्या दृष्टीने प्रेमालाही फारशी किंमत दिसत नाही. कारण प्रेमी गोपाल आपल्यामुळे फाशी चढतोय हे दिसत असूनही ती अविचल राहते, स्वत:ला वाचवण्यासाठी खोटी साक्षही देते. मध्येच वेड लागल्यासारखी वागते तर दुसऱ्या क्षणी ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल तत्त्वज्ञासारखी बोलू लागते. गोपालचा खून करूनही परत प्रेमी गोपालला त्याचा खून करायला ती नेमके का सांगते त्याचा आपण अंदाज करू शकतो; पण चित्रपटात तिच्या विचारांचे द्वंद्व कुठेही दाखवलेले नाही, त्यामुळे शेवटपर्यंत तिला सदसद्विवेकबुद्धी डाचते आहे, का 'लोग क्या कहेंगे' चेच भय जाळते आहे हे कुठेच स्पष्ट होत नाही.

बी. आर. इशारा जनमताला किती मानतात. (लेखक, दिग्दर्शक सब कुछ इशाराच आहे) हेही स्पष्ट होत नाही. मुलगा गोपालचा खून गोपालने किंवा रोमाने केलेला नाही तर 'लोग क्या कहेंगे' च्या दुष्ट भुताने केला आहे, असली कातिल तोच आहे अशी वाक्ये रामच्या तोंडी आहेत, तर प्रेमी गोपाल आणि रोमाचे संबंध परत सुरू होतात त्या वेळेला 'कमसे कम इससे तो डरो कि लोग क्या कहेंगे' अशा अर्थाचे गाणे पार्श्वभूमीला आहे. म्हणजे याचा अर्थ काय समजायचा? 'लोग क्या कहेंगे' चे भय अनाठायी आहे, आपले दुबळे मन उगाचच त्याचे ओझे सहन करते, का 'लोग क्या कहेंगे'च्या भयाने तरी आपल्या वर्तनाला मर्यादा पडतात? पक्का निष्कर्ष काढण्यात चित्रपट अयशस्वी झाला आहे; पण जनमताचे महत्त्व काय याचा विचार करायला मात्र हा चित्रपट नक्कीच प्रवृत्त करतो.

चित्रपटाच्या कथावस्तूविषयी हे झाले; पण चित्रपटाची तांत्रिक बाजूही चांगली म्हणावी अशी नाही. दृश्ये इतकी भराभर बदलतात की, हे प्रत्यक्ष चालले आहे, का रोमाच्या मनाचा खेळ आहे हेच कळत नाही. प्रेमी गोपाल रोमाच्या सांगण्यावरून डॉ. जीवनची गादी फाडतो किंवा रोमा वेड्यासारखी बाहुल्यांशी बोलत असते तो प्रसंग—अशा प्रसंगांचा आगापीछाच आपल्याला उलगडत नाही. हा दोष पटकथेचाही असेल; पण अशा प्रसंगांनी प्रेक्षक बुचकळ्यात पडण्यापलीकडे काहीही साधत नाही. भरीस भर म्हणून 'इस गोपालने उस गोपालका खून किया' सारखी वाक्ये अशा तऱ्हेची 'गंमत' निर्माण करण्याचाच दिग्दर्शकाचा हेतू असावा.

अभिनयाला तसे म्हटले तर विशेष वाव कुणालाच नाही. तरीही शबानाने आपले काम नेकीने पार पाडले आहे. नवीन निश्चलला अभिनय येतच नसल्याने कुठलीही भूमिका असली तरी सारखेच. संजीवकुमार अगदीच थोडा वेळ आहे. शत्रुघ्न सिन्हा मात्र वकिलाच्या भूमिकेत विशेष भाव खाऊन जातो. शबाना, संजीव, शत्रुघ्न—अशा दमदार नावांमुळे चित्रपट गर्दी खेचणार हे नक्की!

उज्वला लेले


कलेकलेने
चंद्र वाढतो..




मिंटीच्या निरनिराळ्या बचत योजनात
सहभाग घेऊन आपल्या समृध्दीचा
चंद्र असाच वृध्दिंगत करा.
म्हणजेच सुखाच्या चांदण्याची
बरसात होईल.
बचतीने समृध्दी
बचतीसाठी महाबँक!

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी : "लोकमंगल" शिवाजीनगर पुणे – ४११ ००५

RAAS

# नाट्यपंढरी



## □ आग्र्याहून सुटका नि अच्युतराव !

'आग्र्याहून सुटका' च्या, मुंबईतल्या पहिल्याच प्रयोगाला रिपन थिएटरमध्ये दंगल झाल्याने कंपनीला (समर्थनाटकमंडळी) कोणताच खेळ लावण्याची ताकद होईना. दाते–औंधकर, वरिष्ठ पोलीस-अधिकाऱ्यांना तसेच काही पुढारी लोकांना सारखे भेटत होते; पण कोणीही प्रयोग करा, असे म्हणेना ! उलट, जाऊ द्या कशाला हो, करता तो खेळ ? उगीच दंग्याला कारणीभूत कशाला होता ? हाच उपदेश त्यांना ऐकावा लागे. अखेर पंधरा–वीस दिवसांनी परळच्या 'दामोदरहॉल' वर 'करीन ती पूर्व' चा प्रयोग लावला. कारण खेळ न करता कंपनी चालणार कशी ? नशिबाने खेळाला तुफान गर्दी होती. थिएटर ओव्हरफुल होते साडेनऊला नाटक सुरू होणार तोच प्रेक्षकांनी ओरडा करण्यास सुरुवात केली. सगळ्यांचा एकच गिल्ला 'आग्र्याहून सुटका पाहिजे, करीन ती पूर्व नको !' मॅनेजरने बाहेर येऊन सांगितले की, 'त्या खेळाची सर्व पात्रे इथे हजर नाहीत दात्यांचे या नाटकात काम नसल्याने ते हॉलवर आलेले नाहीत.' इ. तोच लोक ओरडले 'त्यांना आणा ! आग्र्याहून सुटकाच हवे !' प्रेक्षक काही केल्या ऐकनात. अखेर गिरगावातून केशवराव दात्यांना गाडीत घालून आणले. बाकी बहुतेक पात्रे होती. केशवरावांनी रंगाला बसण्यापूर्वी पाहिले, जर या जमावाचे, या मंडळींचे, म्होरक्ये–प्रमुख पुढारी होते– साहेब (दे. भ. अच्युतराव कोल्हटकर). मध्यंतरी परवाना पहाण्यासाठी एक मुसलमान पोलीसइन्स्पेक्टर हॉलवर थडकलाच होता; पण अच्युतरावांनी त्याची खरड काढून त्याला हाकलून लावला.

अखेर साडेअकराला सुरू झालेला खेळ (अर्थात 'आग्र्याहून सुटका' हाच) पहाटे पावणेपाचच्या सुमारास संपला ! प्रयोगाचा प्रत्येक प्रवेश रंगला. प्रेक्षक एकदम खूप आणि नटवर्गही !


या सगळ्या घटनेत, अच्युतरावांच्या पाठीशी होती परळ–लालबागची आखाडेवाली मंडळी. हॉलवर तर त्यांनी बंदोबस्त केला होताच; पण गिरगावपासून दादर ट्रामटर्मिनस ( दादर टी. टी) पर्यंत आपले आखाड्यातले पैलवान लोक पहाऱ्यावर ठेवले होते. नाटक आटोपल्यानंतर नटमंडळींनासुद्धा लॉरीतून आपल्या घरोघरी पोचते केले. दाते म्हणतात, 'इथे अच्युतरावांचे खरे पाणी दिसले. ते लिहितात, 'पश्चिम महाराष्ट्रात, संदेशकार दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांशिवाय कोणीही मोठा माणूस, आमच्यामागे खंबीरपणे उभा राहिला नाही !'

## □ गावरान भुईमुगाची शेंग

'महाराष्ट्र नाटक मंडळी' हे खऱ्या अर्थाने नाट्यविद्यापीठच होते. या संस्थेत नामवंत नटांची परंपराच निर्माण झाली· गणपतराव भागवत, टिपणीस बंधू, प्रधान, पोतनीस, केशवराव दाते, औंधकर, शाळिग्राम, वैशंपायन अशी किती म्हणून नावे सांगावी ? नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर सुद्धा, व्यावसायिक रंगभूमीवर प्रथम रंगले ते इथेच. त्यातही दाते–औंधकर–शाळिग्राम-वैशंपायन हे समकालीन नि बरोबरीचे. केशवरावांनी आपल्या नटमित्रांचे गुणविशेष मोठ्या आदराने नोंदविले आहेत. त्यांच्या विशेष मर्जीतले, त्यातलेच एक परशरामपंत शाळिग्राम.

नटात कामाची चुरस असणे वेगळे नि वैर असणे वेगळे. शाळिग्राम हे सरळ साधे नट होते. मनाने रसिक नि भूमिकेशी लवकर समरस होणारे. 'महाराष्ट्र मंडळी' त जसजशी त्यांना कामे मिळत गेली, तसतसे त्यांच्या कलागुणांचे दर्शन घडत गेले. 'महाराष्ट्र मंडळी' ची प्रभावळ गुणवंतांची असूनही ते आपल्या गुणांनी चमकले. जसे मनाने सरळ नि भोळे तसे बोलण्यातही गावरान. 'गावाबरोबर गाढव खावे लागते' चावडीवर बोंब मारायला पाटलाची परवानगी लागत नाही' असले वाक्‌प्रयोग ते सहजी करीत. असा हा मोकळा माणूस सर्वांचा आवडता होता. म्हणूनच दाते त्यांचा उल्लेख 'गावरान भुईमुगाची शेंग' असा करतात. दाते लिहितात, 'मला वाटते नाटकात सर्व तऱ्हेच्या भूमिका करू इच्छिणाऱ्या नटाच्या मनाची पाटी कोरी असावी लागते. त्या पाटीवर त्याच्या प्रकृतिधर्माचे ओरखडे नसावेत आणि असे असेल तरच तो निरनिराळ्या भूमिकांत निरनिराळा दिसतो. ही गोष्ट शाळिग्राम यांच्यात होती. म्हणूनच त्यांनी भिन्न प्रकृतीच्या नि वेगवेगळ्या ढंगांच्या भूमिका सारख्याच यशस्वी केल्या. कंकण–पुण्यप्रभाव, कमालखान–शिवसंभव, संभाजी–बेबंदशाही, अशा अनेक; पण त्यातही ते जणू संभाजीच्या भूमिकेसाठीच जन्माला आले होते. असा संभाजी आजपर्यंत मराठी रंगभूमीवर दिसला नाही. कंपनीच्या चालकांच्या विशिष्ट धोरणाशी त्यांचे पटले नाही म्हणून त्यांनी अखेर कंपनी सोडली. त्यांनी 'महाराष्ट्र' सोडून जाताना केशवरावांचा जीव खालीवर होत होता. आपला आवडता सहकारी संस्था सोडून जाणार म्हणून त्यांना चैन पडत नव्हते; पण ते काय करणार ? तरीही 'महाराष्ट्र मंडळी' च्या प्रथेच्या विरुद्ध जाऊन शाळिग्रामांचा निरोपसमारंभ घडवून आणला. 'बेबंदशाही' चा प्रयोग करून डॉ. भडकमकर यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला. पाचशे रुपयांची थैली दिली. मित्राने मित्राचा, नटाने नटाचा केलेला सत्कार -फुलाने फुलाचा घेतलेला सुगंध !

इतकेच नव्हे तर कीचकवधावरची बंदी उठल्यानंतर ते नाटक बसविताना दात्यांना त्यांची सारखी आठवण येत होती. ते म्हणतात, 'कीचकवध' पुन्हा सुरू होऊन त्याच्या झालेल्या प्रयोगात, मी कीचकाच्या कामी शाळिग्रामचीच योजना केली असती. माझी खात्री आहे ही भूमिका त्यांनी अधिक गाजविली असती. त्यांच्या पगडीत आणखी एक मानाचा तुरा झळकला असता !



ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू

वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण -
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**

फिरोझ रानडे

पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.